इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४१ ▸ अंक - २८० ▸ गुरूवार,ता.१२ फेब्रुवारी २०२६ ▸ पाने १२
इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

www.emahasatta.com | e-mail : mahasatta@gmail.com | mahasattaadvt@gmail.com | किंमत ₹ ५.००

### कॅनडातील शाळेत गोळीबार; हल्लेखोरासह १० जणांचा मृत्यू

ओटावा,ता.११-
कॅनडाच्या ब्रिटिश कोलंबिया प्रांतात एका शाळेत झालेल्या गोळीबारात हल्लेखोरासह सुमारे १० जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. ही माहिती कॅनेडियन पोलीसांनी दिली.संशयित हल्लेखोर मृत अवस्थेत आढळला आहे.पोलीसांच्या मते त्याने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली असावी. मात्र या घटनेत आणखी कोणी संशयित सहभागी होता का, याची चौकशी अधिकारी करत आहेत.

गृहकर्ज
व्याजदर ७.२०% पासून सुरुवात
१) N.A.जागा, कौलारु घर
२) R.C.C. घर, औद्योगिक शेड
३) पत्रा घर, दुकानगाळे
विकत घेण्यासाठी ५ लाख ते ५० कोटी
✻ २.५० लाख सबसिडी
- संपर्क -
9130690010, 9595919625

## राष्ट्रगीताआधी ‘वंदे मातरम्’ बंधनकारक

### केंद्राची नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी

■ नवी दिल्ली,ता.११

केंद्र सरकारने वंदे मातरम्‌बाबत नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. गृह मंत्रालयाच्या आदेशानुसार, वंदे मातरम् आता सरकारी कार्यक्रम, सरकारी शाळेतील कार्यक्रम आणि इतर औपचारिक मेळाव्यांमध्ये म्हटले जाईल.

या काळात सर्वांनी आदराने उभे राहणे बंधनकारक असेल.जर राष्ट्रगीत एकाच वेळी गायले किंवा वाजवले गेले तर प्रथम वंदे मातरम् म्हटले जाईल. राष्ट्रीय भावनेचा स्पष्ट संदेश (पान २ वर)

गेल्या वर्षी, केंद्र सरकारने संसदेच्या हिवाळी अधिवेशनात ‘वंदे मातरम्’च्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त विशेष चर्चा आयोजित केली होती.या मुद्यावरून लोकसभा,राज्यसभेत गदारोळ झाला होता.पश्चिम बंगालमधील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सरकार राष्ट्रगीताचा वापर करत असल्याचा आरोप काँग्रेसने केला होता. भाजपने काँग्रेसवर तुष्टीकरणाच्या राजकारणाचा भाग म्हणून वंदे मातरम्चे काही भाग कापल्याचा आरोप केला.

## केंद्राने भारत विकला

### लोकसभेत राहुल गांधींची केंद्रावर टीका

■ नवी दिल्ली,ता.११-

लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ वरील चर्चेत भाग घेतला. यावेळी ते अत्यंत आक्रमक भूमिकेत दिसून आले. त्यांनी हा अर्थसंकल्प आजच्या काळाच्या गरजांनुसार अपुरा असल्याचे म्हटले. तसेच अमेरिकेचे वाढते वर्चस्व आणि भारतासोबत झालेल्या अलीकडील व्यापार करारावरही त्यांनी सभागृहात भाष्य केले. राहुल गांधी यांनी एपस्टीन फाइल्सपासून ते अमेरिकेच्या दबावाच्या राजकारणापर्यंत अनेक मुद्दे उपस्थित केले. याशिवाय सरकारला घेरताना त्यांनी अदाणी-अंबानी यांचाही उल्लेख करत टीका केली.



अमेरिकेसोबत झालेल्या व्यापार करारावरून राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. त्यांनी आरोप करत म्हटले, ‘मी म्हणतो आहे की तुम्ही भारत विकला आहे. तुम्हाला भारत विकताना लाज वाटत नाही का? तुम्ही आपल्या आईला, भारत मातेला विकले आहे. गंमतीची गोष्ट म्हणजे मला माहिती आहे की सामान्य परिस्थितीत पंतप्रधान भारत विकणार नाहीत. पण त्यांनी भारत का विकला? कारण त्यांच्यावर दबाव आहे. त्यांची मान पकडलेली आहे. आम्हाला पंतप्रधानांच्या डोळ्यांत भीती दिसत आहे. यामागे एपस्टीन प्रकरण आहे. अजूनही ३० लाख फाइल्स बंद आहेत.’

व्यापार कराराबाबत पुढे बोलताना राहुल गांधी म्हणाले की, जर ‘इंडिया’ आघाडी अध्यक्ष ट्रम्प यांच्याशी चर्चा करत असतील, तर आम्ही त्यांना सर्वप्रथम सांगितले असते की या समीकरणातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारतीयांचा डेटा. तुम्हाला तुमचा डॉलर वाचवायचा आहे? आम्ही तुमचे (पान २ वर)



महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांनी नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी पार्थ पवार, प्रफुल्ल पटेल, सुनिल तटकरे व जय पवार.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पंतप्रधान मोदी,शहांची भेट घेतली

■ नवी दिल्ली,ता.११-

उपमुख्यमंत्रिपदाचा पदभार स्विकारल्यानंतर बुधवारी सुनेत्रा पवार यांनी राजधानी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री शहा यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत खास. सुनिल तटकरे, प्रफुल्ल पटेल, जय पवार, पार्थ पवार हे सुध्दा होते.

दिवंगत अजित पवार यांच्या निधनानंतर पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाचा पदभार स्विकारला.पंतप्रधान मोदी,अमित शहा यांची पहिलीच भेट होती.यावेळी त्यांनी मोदी यांच्यासोबत ४० मिनिटे, तर शहा यांच्यासोबत अर्धा तास चर्चा केली. सुनेत्रा पवार यांनी संसदेतील पंतप्रधान कार्यालयात मोदींची भेट घेतली आहे. एनडीएचा घटक पक्ष म्हणून आम्ही कायम एनसीपीसोबत आहोत, अशी ग्वाही यावेळी पंतप्रधानांनी दिली.उपमुख्यमंत्री म्हणून काम करत असताना भाजप ठामपणे सोबत राहील, असा शब्दही त्यांनी दिला. यावेळी मोदी यांनी अजित पवार यांच्या निधनावर शोक देखील व्यक्त केला आहे.

## अजित पवारांचा मृतदेह खूप जास्त सुजलेला होता

### दिल्लीत आम.रोहित पवार यांचे वक्तव्य

■ नवी दिल्ली,ता.११(प्रतिनिधी)-

माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असतानाच, आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणावर मोठे खुलासे करण्यास सुरुवात केली आहे.



अजित दादांचा मृतदेह असामान्यपणे खूप जास्त सुजलेला होता, असा धक्कादायक खुलासा राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार गट) नेते रोहित पवार यांनी बुधवारी दिल्लीतील पत्रकार परिषदेत केला आहे. रोहित पवारांनी (पान २ वर)

## जमीन महसूल कायद्यात बदल

### बिगर कृषी वापरासाठी एनए परवानगीची गरज नाही; लाखो शेतकऱ्यांना दिलासा

■ मुंबई,ता.११(प्रतिनिधी)-

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने राज्याच्या जमीन महसूल कायद्यात मोठा बदल केला आहे. त्यानुसार, आता शेतकऱ्यांना बिगर कृषी (एनए) वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घेण्याची कोणतीही गरज नाही. आता बांधकाम आराखडा मंजुरीलाच एनए मानले जाणार आहे.

सरकाच्या या निर्णयाचा राज्यातील हजारो शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. (पान २ वर)

#### जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची गरज संपली

राज्यात कृषी क्षेत्र अकृषक करताना एन.ए. परवानगीची अट रद्द करण्यात आली असून, एन.ए. करताना आता नगर रचना विभाग आणि स्थानिक प्राधिकरणाने दिलेली बांधकाम नकाशा परवानगी हीच आता एन.ए. परवानगी असणार आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून स्वतंत्र बांधकाम परवानगी घेण्याची आवश्यकता असणार नाही.

## लोकसभा अध्यक्ष बिर्ला यांना काँग्रेस खासदारांची शिवीगाळ

### संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजूंचा आरोप

■ नवी दिल्ली,ता.११-

केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी काँग्रेस खासदारांवर गंभीर आरोप केले आहेत. ते म्हणाले की, काँग्रेस खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिला यांच्या दालनात घुसून त्यांना शिवीगाळ केली.



कमीतकमी २० ते २५ काँग्रेस खासदारांनी लोकसभा अध्यक्षांच्या दालनात घुसून त्यांना शिवीगाळ केली. मी ही त्यावेळी उपस्थित होतो.सभापती हे अतिशय मृदू स्वभावाचे व्यक्ती आहेत, अन्यथा कठोर कारवाई झाली असती.त्यावेळी प्रियंका गांधी वाड्रा आणि के.सी. वेणुगोपाल यांच्यासह काँग्रेसचे वरिष्ठ नेते (पान २ वर)




### देशभरात आज बँक कर्मचाऱ्यांचा संप

■ नवी दिल्ली,ता.११-

देशभरातील सर्व बँक कर्मचारी आज संपावर जाणार आहेत.ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशन (एआयबीईए),ऑल इंडिया बँक ऑफिसर्स असोसिएशन (एआयबीओए) आणि बँक एम्प्लॉईज फेडरेशन ऑफ इंडिया (बीईएफआय) या प्रमुख संघटनांनी संपाची घोषणा केली आहे.

या पार्श्वभूमीवर स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) आणि (पान २ वर)

## मुंबईत ४४ वर्षांनंतर भाजपचा महापौर

### रितू तावडे महापौर;संजय घाडी उपमहापौर

■ मुंबई,ता.११ (प्रतिनिधी)-

देशातील सर्वांत श्रीमंत महानगरपालिका असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेवर अखेर भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) महायुतीने आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

भारतीय जनता पक्षाच्या रितू तावडे यांची मुंबईच्या महापौरपदी तर शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षाचे संजय घाडी यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड



झाली आहे. या निवडीमुळे भाजपने तब्बल ४४ वर्षांनंतर महापौरपद आपल्याकडे खेचून आणले आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदासाठी ७ फेब्रुवारी २०२६ रोजी अर्ज भरण्याची प्रक्रिया पार पडली.भाजपकडून रितू तावडे आणि शिंदे गटाकडून संजय घाडी यांनीच केवळ आपले अर्ज दाखल केले होते. विरोधी पक्षांनी आपला उमेदवार उभा न केल्याने ही प्रक्रिया बिनविरोध पार पडली.यानंतर ११ फेब्रुवारी रोजी अधिकृतपणे या नावांची घोषणा करण्यात आली. रितू तावडे या भाजपच्या मुंबईतील एक आक्रमक (पान २ वर)

### नोकरी लावण्याच्या आमिषाने फसवणूक

■सांगली,ता.११(प्रतिनिधी)-

शासकीय नोकरी लावण्याचे आमिष दाखवून शहरातील दोघांची तब्बल ९ लाख ८ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सांगली शहर पोलिसांनी सुनील मधुकर पाटील (वय ५३, रा.सांगली) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी श्रीकांत कोंडिबा पवार (रा.वारणाली, सांगली) यांची आणि संशयित सुनील पाटील यांचा परिचय होता.फिर्यादी श्रीकांत पवार यांचा मुलगा प्रज्वल यास (पान २ वर)

## सांगली जिल्हा परिषदेचा अध्यक्ष महायुतीचाच होणार

### - पालकमंत्री चंद्रकांत पाटील

■ सांगली,ता.११(प्रतिनिधी)-

सांगली जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये अपेक्षेपेक्षा कमी यश मिळाले आहे. तरीही आम्ही मिळालेल्या यशावर समाधान मानून चिंतन करत पाऊल पुढे टाकत आहोत. महापालिकेमध्ये ज्याप्रमाणे महापौर भाजपचा झाला त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेचा अध्यक्ष महायुतीचाच होणार असल्याचा ठाम विश्वास पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी पत्रकार बैठकीत व्यक्त केला.




जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी सकाळी नियोजन समितीची सभा पार पडली. त्यानंतर मंत्री पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधला. पालकमंत्री पाटील म्हणाले, राजकारणात चढ-उतार येत असतात. प्रत्येकवेळी आपला अंदाज बरोबर येईल असे नाही. जिल्हा परिषदेत भाजपला अवघ्या १६ जागा मिळाल्या आहेत. महापालिकेत (पान २ वर)

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १५८५०० रु. | २७३००० रु. |

अंडी ५७० रुपये शेकडा

### हास्यतुषार




## दावोसमधील ७५ टक्के करारांचे उद्योगात रूपांतर-मुख्यमंत्री

### महाराष्ट्रात विक्रमी परकीय गुंतवणूक

■ मुंबई, ता.११-

देशातील सर्वात जास्त थेट परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात होत असते. मात्र आता ही गुंतवणूक देशात जास्तच नाही, तर रेकॉर्ड मोडणारी ठरत आहे. आर्थिक व्यवस्थेला उत्सवाचे स्वरूप दिल्यामुळेच उद्योगस्नेही वातावरण राज्यात तयार झाले आहे. यामुळेच महाराष्ट्रात रेकॉर्ड तोड गुंतवणूक होत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



यावेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, स्वित्झर्लंड मधील दावोस येथे जागतिक अर्थ परिषदेत ३० लाख कोटींचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. तसेच १२ लाख कोटींचे करार अंतिम करण्यात (पान २ वर)

## एसटी-पिकअपचा अपघात चालक ठार,६ विद्यार्थी जखमी

■ पंढरपूर,ता.११(प्रतिनिधी)-

मंगळवेढा-पंढरपूर मुख्य मार्गावर आज सकाळी एसटी बस आणि पिकअप वाहनांची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. यामध्ये पिकअप चालकाचा जागीच मृत्यू झाला असून सहा शाळकरी विद्यार्थी जखमी झाले आहेत.



अपघाताची तीव्रता इतकी जबर होती की अपघाता दरम्यान मोठा आवाज झाला. दोन्ही वाहनांच्या पुढील बाजूस जोराची धडक झाल्याने समोरील भाग पूर्णपणे चेंदामेंदा झाला. दरम्यान पीकअप वाहन पलटी झाल्याने वाहनातील सामान रस्त्यावर विखुरले व वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे.

माहितीनुसार एसटीतील सहा विद्यार्थी जखमी झाले असून तातडीने त्यांना उपचारासाठी पाठविण्यात आले. पिकअप वाहनाने समोरून येणाऱ्या एसटी बसला समोरुन (पान २ वर)

## विकासवाडी क्रिकेट स्टेडियमला अजित पवार यांचे नाव द्यावे

### जिल्हा नियोजन समिती बैठकीत मागणी

■ कोल्हापूर ता.११ (प्रतिनिधी)

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासंदर्भातील विविध विषयांवर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. ताराराणी सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय येथे पालकमंत्री प्रकाश आबिटकर आणि सहपालकमंत्री माधुरीताई मिसाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली.

बैठकीपूर्वी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर विषयसूचीचे वाचन करण्यात आले आणि मागील बैठकीतील निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी सादर केला.

करवीर तालुक्यातील विकासवाडी येथे उभारण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट स्टेडियमला स्वर्गीय अजित पवार यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी आमदार अमल महाडिक यांनी केली. राज्य मंत्रिमंडळाने स्टेडियमसाठी (पान २ वर)

(पान १ वरून)

## 'वंदे मातरम्' बंधनकारक

देण्यासाठी यावेळी लक्षपूर्वक उभे राहणे आवश्यक असेल.नवीन नियमांनुसार, सहा परिच्छेद असलेले वंदे मातरम्‌चे पूर्ण रूप आता ३ मिनिटे आणि १० मिनिटांसाठी वाजवले जाईल. त्यात दुर्गासह तीन हिंदू देवींचा उल्लेख आहे. आतापर्यंत, मूळ वंदे मातरम् गाण्याच्या सहा परिच्छेदांपैकी फक्त पहिले दोनच गायले जात होते. राष्ट्रध्वज फडकवणे, राष्ट्रपतींचे कार्यक्रमांमध्ये आगमन, राष्ट्राला उद्देशून भाषण देण्यापूर्वी आणि नंतर, राज्यपालांचे आगमन आणि भाषण देण्यापूर्वी आणि नंतर अशा अनेक अधिकृत प्रसंगी वंदे मातरम् वाजवणे अनिवार्य करण्यात आले आहे.

केंद्र सरकारने २८ जानेवारी रोजी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. १० पानांच्या आदेशात, सरकारने असेही म्हटले आहे की,पद्म पुरस्कार सोहळ्यासारख्या नागरी पुरस्कार समारंभात किंवा राष्ट्रपती उपस्थित असलेल्या कोणत्याही कार्यक्रमात वंदे मातरम् वाजवले जाईल. तथापि, सिनेमागृहांना नवीन नियमांमधून सूट देण्यात आली आहे. याचा अर्थ असा की,चित्रपटगृहांमध्ये 'वंदे मातरम्' वाजवणे आणि चित्रपट सुरू होण्यापूर्वी उभे राहणे अनिवार्य राहणार नाही. 'वंदे मातरम्'बद्दल स्पष्ट मार्गदर्शन करण्यासाठी नवीन सूचना देण्यात आल्या आहेत.

## आज बँक कर्मचाऱ्यांचा संप

आयडीबीआय (आयडीबीआय) बँकेने ग्राहकांना सूचित केले आहे की, संपामुळे शाखांतील कामकाजावर परिणाम होऊ शकतो. आरबीआय किंवा इतर बँकांनी अधिकृत सुट्टी जाहीर केलेली नसली, तरी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे बँकींग सेवा विस्कळीत होण्याची शक्यता आहे.

केंद्र सरकारने लागू केलेल्या चार नवीन कामगार कायद्यांना विरोध हे संपाचे मुख्य कारण आहे. युनियनचे म्हणणे आहे की, हे कायदे २९ जुन्या कामगार कायद्यांची जागा घेतील आणि त्यामुळे कर्मचाऱ्यांचे हक्क कमी होतील तसेच ट्रेड युनियनची नोंदणी करणे अधिक कठीण होईल. यासोबतच बँक कर्मचाऱ्यांकडून पाच दिवसांच्या आठवड्याची मागणीही जोर धरत आहे. सध्या दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी सुट्टी असली तरी प्रत्येक शनिवारी सुट्टी देण्याची त्यांची मागणी आहे. वाढत्या कामाच्या तणावामुळे कर्मचाऱ्यांचा वर्क-लाईफ बॅलन्स बिघडत असल्याचे युनियनचे म्हणणे आहे. यापूर्वी २७ जानेवारी रोजीही याच मागणीसाठी बँक कर्मचाऱ्यांनी संप केला होता.तथापि, काही सेवा सुरू राहणार आहेत. यूपीआयद्वारे होणारे डिजिटल व्यवहार,गुगल पे, फोनपे, पेटीएम आणि भीम यूपीआय यांसारखी ॲप्स नियमितपणे कार्यरत राहतील.इंटरनेट आणि मोबाईल बँकींगद्वारे आयएमपीएस,एनईएफटी आणि आरटीजीएससारखे पैसे ट्रान्सफर करता येतील तसेच बॅलन्स तपासणे आणि बिल पेमेंटही शक्य असेल.एचडीएफसी,आयसीआयसीआय आणि ॲक्सिससारख्या मोठ्या खाजगी बँका सुरू राहणार असल्याने त्यांच्या ग्राहकांची कामे नेहमीप्रमाणे होतील.एटीएम तांत्रिकदृष्ट्या बंद नसतील, त्यामुळे रोख उपलब्ध असल्यास कार्डद्वारे पैसे काढता येतील.

## खासदारांनी शिवीगाळ केली

देखील उपस्थित होते आणि ते त्यांना भांडण्यास प्रवृत्त करत होते.रिजिजू म्हणाले की, सभापतींना या घटनेने खूप दुःख झाले. त्यांनी सभागृहात बोलण्याच्या परवानगीशी संबंधित वादाचाही उल्लेख केला.सभापतींनी आदेश दिल्यानंतर त्याचे पालन केले गेले नाही. त्यांनी असा दावा केला की, राहुल गांधी म्हणाले की, त्यांना बोलण्यासाठी कोणाच्याही परवानगीची आवश्यकता नाही आणि ते त्यांना आवडेल तसे बोलतील.

## मृतदेह सुजलेला होता

व्हीएसआर विमान कंपनी आणि डीजीसीएसह विमानाचा वादग्रस्त पायलट यांच्यावर गंभीर आरोप केले होते. याआधी मंगळवारी त्यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेत अजित पवारांच्या विमान अपघात प्रकरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. बुधवारी त्यांनी दिल्लीत पत्रकार परिषद घेत नवा खुलासा केला आहे. मुंबईतील पत्रकार परिषदेत ही बाब टाळली होती, असे सांगत रोहित पवारांनी दिल्लीत डॉक्टरांसोबत झालेल्या चर्चेचा दाखला दिला. मी जेव्हा डॉक्टरांना विचारले की, शरीर भाजल्यानंतर इतके सुजते का? तेव्हा त्यांनी हो असे उत्तर दिले. मात्र, दादांची बॉडी ही सामान्यापेक्षा खूप जास्त सुजलेली होती, असे डॉक्टर म्हणाले होते. ती इतकी का सुजली होती, याचे कारण शोधणे आता महत्त्वाचे आहे.

रोहित पवारांच्या या खुलाशामुळे एकूणच अपघाताच्या तीव्रतेबाबत आता नवीन प्रश्न उपस्थित होत आहेत. रोहित पवार यांनी उपस्थित केलेल्या या संशयामुळे आता तपासाची दिशा बदलण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. केवळ विमान अपघात की त्यामागे आणखी काही वेगळेच घडले होते, याबाबत आता राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. कॅप्टन कपूर यांच्या पूर्वीच्या नोंदींबाबत शंका उपस्थित करत रोहित पवार यांनी सांगितले की, त्यांच्यावर यापूर्वी शिस्तभंग आणि मद्यप्राशनासंबंधी वाद झाले होते. अशा परिस्थितीत व्हीआयपी उड्डाणासाठी त्यांची नियुक्ती का करण्यात आली, असा प्रश्न त्यांनी विचारला. पायलट बदलण्यामागे 'वाहतूक कोंडी'चे कारण दिले गेले. मात्र, इतक्या पहाटे मुंबईत ट्रॅफिक जाम असणे शक्य नाही, असे म्हणत त्यांनी या कारणावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

## एसटी-पिकअपचा अपघात

जोरात धडक दिल्याने अपघात घडला. हा भीषण अपघात होताच रस्त्यावर वाहनांच्या काचांचे तुकडे, सुटे भाग, नंबर प्लेट, सामान सर्वत्र विखुरलेले दिसत होते. या अपघातात पिकअप चालकाचा जागीच मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत असून जखमी विद्यार्थ्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले. काही विद्यार्थ्यांना किरकोळ तर काहींना मध्यम स्वरूपाच्या दुखापती झाल्याची प्राथमिक माहिती आहे. एसटी बसमधील प्रवाशांनाही किरकोळ मार लागल्याचे समजते.

## नोकरी लावण्याच्या आमिषाने नऊ लाखाची फसवणूक

पोस्ट खात्यात नोकरी लावण्याचे अमिष दाखवून संशयित सुनील पाटील याने पवार यांच्याकडून ४ लाख २१ हजार ६८५ रुपये उकळले. त्याचप्रमाणे फिर्यादी पवार यांचे मित्र राजकुमार गणपती खोत (रा.खणभाग, सांगली) यांना पोलीस खात्यात नोकरी लावण्याचे आमिष दाखविले. त्याला बळी पडून खोत यांनी संशयित

सुनील पाटील याच्याकडून ४ लाख ८६ हजार ३९० घेतले. मात्र नोकरी न लावल्याने दोघांनीही संशयित पवार याच्याकडे वारंवार विचारणा केली. मात्र त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. हा प्रकार दि. ८ डिसेंबर २०२२ पासून दि. २८ मार्च २०२५ या कालावधीत घडला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पोलीस ठाण्यात फसवणूकीची फिर्याद नोंदविण्यात आली.

# केंद्राने भारत विकला

(पान १ वरून)

मित्र आहोत. आम्ही तुमची स्तुती करतो. तुमचा डॉलर वाचवण्यात मदत करू इच्छितो. पण कृपया लक्षात ठेवा, जर तुम्हाला तुमचा डॉलर वाचवायचा असेल, तर त्यासाठी सर्वात मोठी संपत्ती भारतीय लोकांकडे आहे ती म्हणजे डेटा. त्यामुळे आमच्याशी समसमान अटींवर चर्चा करावी लागेल.राहुल गांधी म्हणाले, आमच्या मजबूत वस्त्रोद्योगावर १८ टक्के शुल्क लावले जात आहे. जर बांगलादेश अमेरिकेतून कापूस आयात करत असेल, तर त्यावर शून्य शुल्क आहे. म्हणजेच आपला वस्त्रोद्योग संपुष्टात येईल. आता अमेरिका ठरवते की आपण कोणाकडून तेल खरेदी करायचे. रशिया आणि इराणकडून खरेदीबाबतचे निर्णयही अमेरिका घेत आहे; आपले पंतप्रधान नाहीत. सुरुवातीला अमेरिका आपल्यावर ३ टक्के शुल्क लावत होती, आता ते १८ टक्क्यांवर गेले आहे. अमेरिकेकडून आपली आयात ४६ अब्ज डॉलरवरून १४६ अब्ज डॉलरपर्यंत वाढणार आहे. त्यांनी आपल्यासमोर कोणतीही बांधिलकी व्यक्त केलेली नाही; मात्र आपण अनेक बांधिलक्या केल्या आहेत. आपल्या वस्तूंवरील शुल्क वाढले आहे, तर त्यांच्या वस्तूंवरील शुल्क १६ टक्क्यांवरून शून्यावर आले आहे.

शेवटी राहुल गांधी म्हणाले, तुम्ही आपल्या शेतकऱ्यांना चिरडण्यासाठी अमेरिकन शेतकऱ्यांसाठी भारतीय बाजारपेठ खुली केली आहे. म्हणजे आपण एका वादळाला सामोरे जात आहोत आणि तुम्ही ते मान्य करत आहात. अमेरिका आपल्याला सांगते की आपण कोणाकडून तेल घ्यायचे, कोणाकडून नाही; शुल्क कधी वाढवायचे, कधी कमी करायचे याचा अर्थ त्यांनी ऊर्जा आणि वित्त यांना शस्त्र बनवले आहे. अशा व्यापार कराराबद्दल तुम्ही या सभागृहात येऊन कसे बोलू शकता? तुम्हाला लाज वाटत नाही का? मी म्हणतो आहे की तुम्ही भारत विकला आहे, आपल्या भारत मातेला विकले आहे. पंतप्रधानांनी भारत विकला, कारण त्यांच्यावर दबाव आहे. त्यांची मान पकडलेली आहे, म्हणून ते देश विकत आहेत. पंतप्रधानांच्या डोळ्यांत भीती दिसत आहे.



महापौरपदी निवड झाल्यानंतर श्रीमती रितू तावडे यांचा सत्कार करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे. (छाया-बाबा लोंढे)

## मुंबईच्या महापौरपदी रितू तावडे यांची निवड

(पान १ वरून)

आणि अनुभवी नेत्या म्हणून ओळखल्या जातात. वर्ष २०१२ मध्ये घाटकोपर प्रभाग क्रमांक १२१ मधून त्यांनी पहिल्यांदा निवडणूक लढवली होती आणि त्या निवडूनही आल्या होत्या.यानंतर वर्ष २०१७ मध्ये प्रभाग क्रमांक १२७ मधून त्यांनी विजय मिळवला होता. वर्ष २०२६ च्या निवडणुकीमध्ये रितू तावडे यांनी प्रभाग क्रमांक १३२ मधून विजय मिळवला आहे. यापूर्वी त्यांनी मुंबई महापालिकेच्या शिक्षण समितीचे अध्यक्षपदही भूषवले आहे

# जमीन महसूल कायद्यात बदल

(पान १ वरून)

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार जमीन महसूल कायद्यात बदल केला आहे.

या बदलानुसार, आता अकृषक कर आकारला जाण्याची सुविधा पूर्णतः रद्द करण्यात आली आहे. जमीन मालकांना फक्त एकरकमी रुपांतरण अधिमूल्य भरावे लागेल. या रकमेच्या भरपाईनंतर जमीन अकृषक वापरासाठी रुपांतरित करता येणार आहे. याशिवाय शेतकऱ्यांना सनद घेण्याची गरजही संपुष्टात आली आहे. बांधकाम आराखडा मंजुरीलाच एनए परवानगी मानली जाईल. यामुळे जमीन रुपांतर प्रक्रिया अधिक जलद, सोपी व पारदर्शक होईल.

उल्लेखनीय बाब म्हणजे आतापर्यंत अकृषक वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घेणे आवश्यक होते. यासाठी विविध दस्तऐवज गोळा करताना शेतकऱ्यांच्या नाकीनऊ येत होते. पण महसूल विभागाने तयार केलेल्या नवीन कार्यपद्धतीनुसार शेतकऱ्यांचे काम अधिक सुलभ व सोपे होणार आहे. ही कार्यपद्धती राजपत्रातही प्रकाशित करण्यात आली आहे.

शासनाच्या या निर्णयामुळे जमीन रुपांतर प्रक्रियेत सुलभता येईल. याशिवाय अकृषक कराचाही त्रास संपेल. महसूल विभागाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता येईल. जमीन मालकांच्या वेळेची बचत होऊन त्यांचा प्रशासनाकडे हेलपाटे मारण्याचा त्रास कमी होईल. विशेषतः यापुढे त्यांना जमिनीचा एनए मिळवण्यासाठी अनेक महिने किंवा वर्षांची प्रतिक्षा करावी लागणार नाही. केवळ रुपांतरण अधिमूल्य भरून ते आपली जमीन अकृषक वापरासाठी रुपांतरित करता येणार आहे.

## राजस्थानमध्ये अपघातात सहा ठार

■ जयपूर,ता.११-

**येथील दौसा जिल्ह्यातील जयपूर-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर कैलाई गावाजवळ काल रात्री सुमारे ११ वाजता भीषण रस्ते अपघात झाला. लग्न समारंभातून घरी परतत असलेल्या सहा मित्रांचा या अपघातात मृत्यू झाला.**

भरधाव वेगातील कार अनियंत्रित होऊन दुभाजक ओलांडत समोरून येणाऱ्या ट्रेलरमध्ये घुसली. धडक इतकी जोरदार होती की कार पूर्णपणे चिरडली गेली आणि युवक आतमध्ये वाईट रीतीने अडकले. अपघातानंतर कार क्रेनच्या साहाय्याने वेगळी करण्यात आली. जखमींना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले. सिकंदरा रुग्णालयात चार युवकांना मृत घोषित करण्यात आले, तर दोन गंभीर जखमींना दौसा जिल्हा रुग्णालयात रेफर करण्यात आले. त्यापैकी एकाचा दौसामध्येच मृत्यू झाला, तर दुसऱ्याचा जयपूरच्या एसएमएस रुग्णालयात उपचारा दरम्यान मृत्यू झाला.

## 'भारत बंद'ला काँग्रेसचा पाठिंबा

मुंबई,ता.११-

**केंद्रातील भाजपा सरकारने कामगार कायद्यात केलेल्या बदलाला देशभरातून तीव्र विरोध केला जात आहे. या कामगार कायद्यांविरोधात देशभरातील दहा कामगार संघटनांनी उद्या गुरुवार दि.१२ फेब्रुवारी २०२६ रोजी भारत बंदची हाक दिली आहे. शेतकऱ्यांच्या विविध संघटनांनीही या भारत बंदला पाठिंबा दिला असून अखिल भारतीय काँग्रेस कमिटीनेही उद्याच्या भारत बंदला पाठिंबा दिला आहे.**

केंद्र सरकारने कामगार कायद्यात केलेल्या बदलांमुळे कामगारांच्या समोर विविध प्रश्न व समस्या निर्माण झाल्या आहेत. कामगार कायद्यातील बदलामुळे कामगारांच्या हिताला बाधा पोहचलेली आहे, या नव्या बदलामुळे कामगारांच्या हाताला कमी संधी मिळणार आहे. केंद्रातील भाजपा सरकारचे धोरण हे शेतकरी व कामगार विरोधी असल्याने या बंदमध्ये काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सहभागी व्हावे, अशा सुचना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरून देण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष ॲड गणेश पाटील यांनी दिली आहे.

## दावोसमधील ७५ टक्के करारांचे उद्योगात रूपांतर-मुख्यमंत्री

(पान १ वरून)

आले आहे. या जागतिक परिषदेत परकीय गुंतवणूक असेल तेच करार करण्याचे शासनाने ठरविले आहे. त्यामुळे प्रत्येक करारातून राज्यात थेट परकीय गुंतवणूक येणार आहे. दावोस येथे महाराष्ट्राच्या दालनाला गुंतवणूकदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. तेथे १० राज्यांपैकी महाराष्ट्राचाच बोलबाला होता. या परिषदेत झालेल्या करारांचे प्रत्यक्षात उद्योगात रूपांतर होण्याचे राज्याचे प्रमाण ७५ टक्के आहे.

राज्यात इज ऑफ डूइंग बिझनेस करण्यासाठी हंड्रेड रिफॉर्म्स इन टू मंथ असा उपक्रम राबविण्यात येत आहे. विविध १०० सुधारणांनी उद्योगस्नेही वातावरण गुंतवणूकदारांना अधिकाधिक आकर्षित करणार आहे. तसेच मैत्री पोर्टलच्या माध्यमातून उद्योगांसाठी सिंगल विंडो सिस्टीम कार्यान्वित करण्यात आली आहे. राज्यात उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्यात येत आहे. राज्याच्या सर्व दूर भागात गुंतवणूक होत आहे. गडचिरोली स्टील सिटी ऑफ इंडिया म्हणून समोर येत आहे. ऑटोमोबाईल उद्योगांमध्ये नागपूर नाव ठळकपणे पुढे आले आहे. महिंद्रा कंपनीने १५ हजार कोटींची गुंतवणूक नागपूर येथे केली आहे. या ठिकाणी भारताच्या इतिहासातील सर्वात मोठा ऑटोमोबाईल प्रकल्प महिंद्रा कंपनी उभारत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

देशात विजेवर चालणाऱ्या वाहनांच्या निर्मितीची सर्वात मोठी क्षमता छत्रपती संभाजीनगरमध्ये तयार होत आहे. पुढील पिढीची विद्युत वाहने संभाजीनगरमध्ये उत्पादित केल्या जाणार आहे. धुळे जिल्ह्यातील नरडाणा औद्योगिक वसाहत भविष्यातील उद्योगांचे मॅग्नेट ठरणार आहे. नंदुरबारसारख्या मागासलेल्या जिल्ह्यात उद्योग येत आहेत. केवळ औद्योगिकीकरणावर शासनाचा भर नाही तर त्यामुळे एक चांगली परिसंस्था निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. राज्यात विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक वर्तमानपत्र वाचले पाहिजे. याकरिता वर्तमानपत्र वाचनावर आधारित उपक्रम सुरू करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

# जि.प.अध्यक्ष महायुतीचाच होणार

(पान १ वरून)

जशी सत्ता स्थापन करुन भाजपचा महापौर झाला तशी सत्ता जिल्हा परिषदेतही स्थापन करु. मात्र, महापालिकेएवढे हे सोपे नक्कीच नाही. जिल्हा परिषदेत सत्ता स्थापन करण्यासाठी मित्रपक्षांशी आपली बोलणी सुरु आहे. शिवसेनेशी भाजपची नैसर्गिक युती आहे. त्यामुळे शिवसेना ही महायुती म्हणून सत्तेत सहभागी होईल. जिल्हा परिषदेत सत्ता स्थापन करणे हे महापालिकेइतके सोपे नसले तरी शेवटी महायुतीचाच अध्यक्ष होईल असा विश्वास पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.सांगली जिल्हा परिषद निवडणुकीत महाविकास आघाडी तसेच भाजप या दोघांनाही सत्तेसाठी स्पष्ट बहुमत मिळाले नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेत सत्तेचे त्रांगडे निर्माण झाले आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने सर्वाधिक १८ जागा जिंकल्या आहेत. त्या खालोखाल भाजपने १६, काँग्रेसने ११, शिंदेसेनेने ७, राष्ट्रवादी अजित पवार गटाने ६, तर शिवसेना ठाकरे गट, रयत क्रांती आणि जनसुराज्य शक्तीने प्रत्येकी एक जागा जिंकली आहे. एकूण ६१ जागा असल्याने सत्ता स्थापनेसाठी ३१ जागांचे बहुमत असणे आवश्यक आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीला बहुमतासाठी एका जागेची गरज आहे. त्यामुळे आघाडीकडून राष्ट्रवादी काँगेसच्या नेत्यांसोबत बोलणी सुरु आहे. राष्ट्रवादी आणि शिवसेना यांना सोबत घेऊन सत्ता स्थापन करण्यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांचे प्रयत्न सुरु आहे. तर दुसरीकडे जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा महायुतीचाच होणार असा विश्वास पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद अध्यक्ष कोणाचा होणार हे पाहणे रंजक ठरणार आहे.

## २ मार्चपासून दोन सत्रात कोल्हापूर-मुंबई मार्गावर विमानसेवा

कोल्हापूर,ता.११(प्रतिनिधी)-

**सध्या कोल्हापूर ते मुंबई या मार्गावर सकाळच्या सत्रात विमानसेवा सुरू आहे. प्रवाशांच्या मागणीवरून खासदार धनंजय महाडिक यांनी पाठपुरावा केला आणि दोन मार्चपासून सायंकाळच्या सत्रातही कोल्हापूर-मुंबई-कोल्हापूर अशी विमान सेवा सुरू होत आहे.**

सुरुवातीला आठवड्यातील दोन दिवस सायंकाळची कोल्हापूर-मुंबई विमान सेवा असेल, पण लवकरच संपूर्ण आठवडाभर सायंकाळची विमानसेवा सुरू करण्याचा प्रयत्न असल्याचे खासदार महाडिक यांनी स्पष्ट केले आहे.कोल्हापूर विमानतळ झपाट्याने विकसित होत आहे. सध्या कोल्हापुरातून मुंबई, बेंगलोर, हैद्राबाद, तिरुपती आणि अहमदाबाद या मार्गावर प्रवासी विमानसेवा सुरू आहे. खासदार धनंजय महाडिक यांच्या प्रयत्नातून दोन मार्चपासून कोल्हापूर ते मुंबई या मार्गावर सकाळी आणि सायंकाळी अशा दोन्ही वेळी विमानसेवा सुरू होत आहे. दर मंगळवारी आणि गुरुवारी सायंकाळी साडेचार वाजता मुंबईतून स्टार एअरवेजचे विमान कोल्हापूरच्या दिशेने उड्डाण करेल, आणि पाच वाजून ३५ मिनिटांनी हे विमान कोल्हापुरात येईल. तर सायंकाळी सहा वाजून पाच मिनिटांनी कोल्हापूर विमानतळावरून पुन्हा मुंबईच्या दिशेने विमानाचे उड्डाण होईल आणि सात वाजून दहा मिनिटांनी हे विमान मुंबईला पोहोचेल. दोन मार्चपासून ही नवी प्रवासी हवाईसेवा सुरू होत असून, पहिल्या टप्प्यात दर मंगळवारी आणि गुरुवारी सायंकाळच्या सत्रातील स्टार एअरवेजचे विमान प्रवासी सेवा देईल. लवकरच आठवड्यातील सातही दिवस सायंकाळच्या सत्रातील कोल्हापूर मुंबई विमानसेवा सुरू करण्याचा प्रयत्न असेल, तसेच सायंकाळी साडेचार ऐवजी सायंकाळी सात-साडेसात नंतर मुंबईहून विमान उड्डाण करेल यासाठी प्रयत्नशील असल्याचे खासदार धनंजय महाडिक यांनी स्पष्ट केले आहे.

# विकासवाडी क्रिकेट स्टेडियमला अजित पवार यांचे नाव द्यावे

(पान १ वरून)

जमीन देण्यास मंजुरी दिली असून, प्रारंभी निश्चित केलेल्या जागेपेक्षा अधिक जमीन त्यांच्या सूचनेनुसार उपलब्ध करून देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले. त्यांच्या योगदानाचा सन्मान म्हणून स्टेडियमला त्यांचे नाव देण्यासंदर्भात बैठकीत ठराव करण्यात आल्याची माहिती पालकमंत्री आबिटकर यांनी दिली.

पालकमंत्री आबिटकर यांनी मंजूर निधीचा प्रभावी आणि पारदर्शक वापर करून विकासकामे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले. चालू आर्थिक वर्षातील ७६४ कोटी रुपयांच्या निधीपैकी आतापर्यंत ३०७ कोटी रुपये खर्च झाले असून उर्वरित निधी मार्च अखेरपर्यंत खर्च करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ६४२ कोटींपैकी २२९ कोटी रुपये, तर विशेष घटक योजनेतील १२० कोटींपैकी ७७ कोटी रुपये खर्च झाले आहेत. पुढील सन २०२६-२७ साठी ५५४ कोटी रुपयांची अतिरिक्त मागणी करत एकूण १०९३ कोटी रुपयांची मागणी राज्य शासनाकडे करण्यात आली असून यासंदर्भात मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत बैठक होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सहपालकमंत्री माधुरीताई मिसाळ यांनी मंजूर निधी पूर्णपणे खर्च करण्याचे निर्देश देत, ज्या विभागांना अतिरिक्त निधीची गरज आहे त्यांनी प्रस्ताव सादर करावेत, असे सांगितले. मंदिर विकास आराखडे, शाहू स्मारक तसेच केएमसी बसेससाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे त्यांनी नमूद केले.

बैठकीत सहा नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या बांधकामासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात आली. शिक्षण क्षेत्रात 'समृद्ध शाळा' योजना २०२५-२६ अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या २१३ शाळांसाठी ६४ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. अंगणवाडी केंद्रांचे अद्ययावतीकरण सुरू असून 'क' वर्ग तीर्थक्षेत्रांमध्ये सहा नवीन यात्रास्थळांचा समावेश करण्यास मान्यता देण्यात आली.

बैठकीत रोजगार हमी योजना, पाणंद रस्ते, पूरस्थिती, वन्यप्राण्यांपासून नागरिकांचे संरक्षण, शाळा व अंगणवाड्यांसाठी निधी उपलब्धता आदी विषयांवर चर्चा झाली. मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी सर्वंकष आराखडा तयार करण्याचे निर्देश वनविभागाला देण्यात आले. रेस्क्यू फोर्स वाढविणे, टास्क फोर्स नियुक्ती आणि आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## गोपाळपुरातून चोरीस गेलेले आठ लाखाचे सोने जप्त

■ पंढरपूर,ता.११(प्रतिनिधी)-

**गोपाळपूर येथील हळदी कुंकूच्या कार्यक्रमातील चोरीस गेलेले आठ लाख २५ हजार रुपयांच दागिने जप्त करून पंढरपूर तालुका पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे.**

याबाबत पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी कि, गोपाळपूर येथे राहणारे आबासाहेब आसबे यांनी ३० जानेवारी २०२६ रोजी आपली पत्नी हळदी कुंकू च्या कार्यक्रमासाठी जात असताना तिच्या दागिन्यांची चोरी झाल्याची फिर्यादी होती.

सदर गुन्ह्याच्या तपासात आबासाहेब आसबे यांच्याकडे सखोल तपास करून त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे घटनेच्या दिवशी हळदी कुंकू च्या कार्यक्रमासाठी आलेल्या लोकांकडे विचारपूस करून सखोल चौकशी केली असता मंगळवेढा येथील व्यवसायिक अविनाश वाघमारे याला ताब्यात घेऊन पोलीसी खाक्या दाखवला असता सुरुवातीला त्याने उडवा उडवीची उत्तर दिली.

मात्र नंतर अविनाश वाघमारे याने गोपाळपूर येथील त्याचा मित्रांकडून चोरीस गेलेले आठ लाख २५ हजार रुपये किमतीचे सर्व सोन्याचे दागिने काढून दिले ते पंचायत समक्ष जप्त करण्यात आले आहे.

## दारात लावलेली दुचाकी लंपास

■ सांगली,ता.११( प्रतिनिधी)

संजयनगर येथील एका घरासमोर लावलेली दुचाकी चोरट्याने लंपास केली. याप्रकरणी सूर्यकांत भगवान यमगर (रा.संजयनगर) यांनी संजयनगर पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविली आहे. फिर्यादी सूर्यकांत यमगर यांनी त्यांची दुचाकी (क्र.एमएच १० सीवाय ७४४३) नेहमीप्रमाणे घरासमोर लावली होती. चोरट्याने मध्यरात्रीच्या सुमारास दुचाकीचे कुलूप तोडून ती लंपास केली.

## दुचाकीच्या धडकेत विद्यार्थी जखमी

■ सांगली,ता.११( प्रतिनिधी)-

**भरधाव वेगाने जाणाऱ्या दुचाकीस्वाराने पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात शाळकरी विद्यार्थीनी गंभीर जखमी झाली आहे. हा अपघात हरिपूर ते सांगली रस्त्यावर घडला. तन्वी शरद बावधनकर (वय ११, रा.गंगानगर, हरिपूर) असे जखमी विद्यार्थीनीचे नाव आहे.**

याप्रकरणी शरद वसंत बावधनकर यांनी सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविली आहे. फिर्यादी शरद यांची मुलगी तन्वी खाजगी शिकवणी सुटल्यावर सायकलने घरी येत होती. त्यावेळी पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीने तीला धडक दिली. यामध्ये तन्वी गंभीर जखमी झाली. मात्र दुचाकीस्वार घटनास्थळी न थांबता तिला मदत न करता तेथून पसार झाला. उपस्थित नागरिकांनी तन्वी हिला तातडीने रुग्णालयात दाखल केले. पोलिसांनी दुचाकीचालकावर गुन्हा दाखल केला आहे.

# जाधववाडी रोडवरील अतिक्रमणे हटवली

**कोल्हापूर ता.११ (प्रतिनिधी)–**

हॉटेल रसिका ते जाधववाडी मेन रोड हा रस्ता नगरोत्थान योजनेअंतर्गत करण्यात येत आहे. या कामांतर्गत बाधित होणाऱ्या मिळकतींवरील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात आली. हॉटेल रसिका येथील रस्त्यात बाधित होणाऱ्या अतिक्रमित बांधकामावर विभागीय कार्यालय क्रं.४, नगररचना विभाग व अतिक्रमण विभागाच्या संयुक्त पथकामार्फत कारवाई करण्यात आली. या टप्प्यात १२ मिळकती बाधित होत असून या मिळकतींना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. याची मुदत संपलेने हि कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही आयुक्त के.मंजूलक्ष्मी, अतिरिक्त आयुक्त रविकांत आडसूळ, शहर अभियंता रमेश मस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

**CHANGE OF NAME**

MY OLD NAME
**JAYWANT GANGARAM AWALE**
DO HEARBY SOLEMNY DECLARE MY NEW NAME
**JAYWANTRAO GANGARAM AWALE**




## हार्दिक अभिनंदन!

हमारे परमस्नेही **श्री. अनिल देवकरणजी डाळ्या** इनकी इचलकरंजी महानगरपालिका के प्रथम उपमहापौर पद पर चयन होने के उपलक्ष में हार्दिक शुभकामनाए!

मा. श्री. अनिल देवकरणजी डाळ्या

शिवप्रसाद तापडिया
जितेंद्र मर्दा
रसिक आगीवाल
मुकेश खाबाणी
जुगल भांगडिया
इचलकरंजी.

आमचे नेते



आम.डॉ.राहूल आवाडे

## हार्दिक अभिनंदन!

आमचे मार्गदर्शक नेते, सहकारी श्री. महेश उर्फ दरगोंडा बसगोंडा पाटील यांची पट्टणकोडोली जि.प.मतदार संघातून प्रचंड मताधिक्याने विजय झालेबद्दल हार्दिक अभिनंदन व भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!



मा. श्री.महेश उर्फ दरगोंडा बसगोंडा पाटील



**CA श्री. संजय विठ्ठल जिंदे**
(मा. उपसरपंच), चंदूर



## हार्दिक अभिनंदन!

आमचे परममित्र मा. श्री. महेश उर्फ दरगोंडा बसगोंडा पाटील यांची कोल्हापूर जिल्हा परिषदच्या पट्टणकोडोली मतदार संघातून प्रचंड मताधिक्याने विजयी झालेबद्दल अभिनंदन व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा!

मा. श्री. महेश उर्फ दरगोंडा बसगोंडा पाटील

अस्लम हैदर मुजावर (इंजिनिअर)
डॉ. वहिदा अस्लम मुजावर * अशपाक अस्लम मुजावर
क्रिएटीव्ह कॉंक्रीट, हातकणंगले
मुजावर परिवार, कबनूर.


दूरध्वनी क्रमांक.०२३०(२४४१७७६-२४४१७८०)

**देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि. गंगानगर – इचलकरंजी**
**लिज युनिट ऑफ श्री रेणुका शुगर्स लि.,**
ता. हातकणंगले जि. कोल्हापूर

## जाहीर निवेदन

आमचे कारखान्याकडे ऊसाची नोंद केलेल्या कार्यक्षेत्रातील तसेच कार्यक्षेत्राबाहेरील सर्व ऊस उत्पादकांना कळविणेत येते की, आमचे कारखान्याचा सन २०२५-२६ चा गळीत हंगाम फेब्रुवारी २०२६ मधील तिसऱ्या आठवडयाच्या दरम्यान बंद होत आहे. तरी ज्या ऊस उत्पादकांचा आमचे कारखान्याकडील नोंदविलेला ऊस अत्यंत खराब असलेने, रस्ता अडचण असलेने, न्यायालयीन / घरगुती वाद असलेने अथवा ऊस तोड स्विकारत नसलेने इत्यादी कारणांनी गळीताविना ऊस शिल्लक आहे. त्यांनी संबंधित शेती सर्कल ऑफिसशी संपर्क साधून आपला नोंदीतील ऊस खुद्द तोड व खुद्द वाहतुक करुन गळीत हंगाम बंद होणेपूर्वी कारखान्याकडे गळीतास पाठवून सहकार्य करावे. यानंतर गाळपाविना शिल्लक राहणाऱ्या ऊसाच्या नुकसानीची जबाबदारी कारखान्यावर अगर शासनावर राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

गंगानगर-इचलकरंजी
दि. ०९/०२/२०२६

सही/-
(एस.आर. नेर्लीकर)
एक्झीक्यूटीव्ह डायरेक्टर








## हार्दिक अभिनंदन

हमारे परमस्नेही, मा. श्री. अनिल देवकरणजी डाळ्या इनकी इचलकरंजी महानगरपालिका के **प्रथम उपमहापौर** पद पर चयन होने के उपलक्ष में हार्दिक अभिनंदन ! एवं भावी कार्यकाल के लिए हार्दिक शुभकामनाए!

**मा. श्री. अनिल देवकरणजी डाळ्या**
उपमहापौर, इचलकरंजी महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| **वेणुगोपाल मुंदडा**<br>न्यासी प्रमुख | **भंवरलाल लोहिया**<br>उपाध्यक्ष | **द्वारकाधीश सारडा**<br>अध्यक्ष |
| **श्रीकांत बंग**<br>कोषाध्यक्ष | **माधवनारायण राठी**<br>सहसचिव | **लक्ष्मीकांत बांगड**<br>सचिव |

* कार्यकारिणी सदस्य *

राजेश बालदी, सुरेश जाजू, राजेंद्र झंवर, अशोककुमार भूतडा, ओमप्रकाश दरक, हरीश सारडा, श्यामसुंदर धूत, रामअवतार सोनी, मिश्रीलाल जाजू, दिनेशकुमार मानधना

* न्यासी मण्डल *

राधेश्याम भूतडा, सत्यनारायण भांगडिया, धनराज डालिया, बालकिसन टुवाणी, पुरुषोत्तम चितलांगिया, श्यामसुंदर झंवर, सुबोधकुमार कांकाणी, बृजमोहन गट्टाणी, मेघराज बंग, भीकुलाल सारडा, नवलकिशोर बाहेती, कमलकिशोर मालपाणी, लक्ष्मीकांत मालपाणी, ओमप्रकाश तोतला

**श्री महेश सेवा समिती, इचलकरंजी.**

**समस्त माहेश्वरी समाज, इचलकरंजी.**



आमचे नेते







# अमृता अरुण डोंगळे

यांची क॥ तारळे जिल्हा परिषद मतदार संघातून प्रचंड मताधिक्याने **कोल्हापूर जिल्हा परिषद सदस्यपदी** निवड झाल्याबद्दल

## हार्दिक अभिनंदन

शुभेच्छुक -

दत्तात्रय वागरे (गुडाळ), शेखर पाटील (कोदवडे), राजेंद्र चौगले (आ. व्हरवडे), सचिन पाटील (क॥ तारळे ), पांडुरंग चव्हाण (आकनुर ), मुकुंद पाटील (आ. व्हरवडे) सुहास डोंगळे (घोटवडे ), संग्राम मगदूम (चुये ), योगेश खराडे (शिंदेवाडी), लक्ष्मण धनवडे (पुंगाव ), उदय पाटील आवळीकर , राजाराम खोत (चांदेकरवाडी), शिवाजी डोंगळे (घोटवडे), अनंत कसबले (राधानगरी) सुनिल पाटील (घोटवडे ), प्रशांत खराडे (शिंदेवाडी), शिवाजी चौगले (माजगांव), सुकुमार पाटील (म्हाळुंगे) निलेश पाटील (राशिवडे बु॥ ), कृष्णात फराकटे (कासारवाडा पा.), विकास डोंगळे (घोटवडे ), अभिजित डोंगळे (घोटवडे ), उत्तम पाटील (टिटवे), अतुल डोंगळे (घोटवडे ) अभिषेक पाटील (तारळे खुर्द), महेश पाटील आवळीकर, संग्राम डोंगळे (घोटवडे ), पवन गुरव (केळोशी बु॥ ), संतोष डोंगळे (पप्पू)(घोटवडे ), रोहित घाटगे (कापूरवाडी)

■ संपादकीय ■

# बांगला देशात काय होणार ?

शेजारील देश असलेल्या बांगलादेशात १२ फेब्रुवारी रोजी पार पडणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीमुळे दक्षिण आशियातील भू-राजकीय समीकरणे कमालीच्या वळणावर येऊन ठेपली आहेत. माजी पंतप्रधान शेख हसीना यांची सत्ता उलथवून लावल्यानंतर आणि त्यांच्या कट्टर प्रतिस्पर्धी खालिदा झिया यांच्या निधनानंतर होत असलेली ही पहिलीच निवडणूक असली, तरी लोकशाहीच्या नावाखाली सुरू असलेला हा केवळ एक फार्स असल्याची टीका आता आंतरराष्ट्रीय स्तरावर जोर धरू लागली आहे.ज्या अवामी लीगने बांगलादेशच्या जडणघडणीत आणि गेल्या १५ वर्षांच्या सत्तेत महत्त्वाची भूमिका बजावली, त्या पक्षालाच निवडणूक लढवण्यापासून प्रतिबंधित करण्यात आले आहे. एखाद्या मोठ्या राजकीय शक्तीला प्रक्रियेतून पूर्णपणे बाद करून घेतली जाणारी निवडणूक ही केवळ आंतरराष्ट्रीय समुदायाच्या डोळ्यांत धूळफेक करणारी असून, यामुळे या निवडणुकीच्या विश्वासार्हतेवरच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारने या निवडणुकीला लोकशाहीचा उत्सव संबोधले असले, तरी प्रत्यक्षात मैदान केवळ भारतविरोधी विचारसरणीच्या पक्षांसाठी मोकळे करून देण्यात आले आहे. सध्या या निवडणुकीत खालिदा झिया यांचे पुत्र तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) आणि कट्टरपंथीयांची संघटना असलेली जमात-ए-इस्लामी यांच्यात मुख्य लढत असल्याचे चित्र रंगवले जात आहे. याशिवाय शेख हसीना यांच्याविरोधात उभ्या राहिलेल्या 'झेन-जी' पिढीच्या विद्यार्थी आंदोलनातून जन्मलेला 'नॅशनल सिटीझन पार्टी' (एनसीपी) हा नवा गटही रिंगणात उतरला आहे. अवामी लीगच्या अनुपस्थितीत मतदानाची टक्केवारी कमालीची घटण्याची भीती व्यक्त केली जात असून, विशेषतः वांशिक आणि धार्मिक अल्पसंख्याकांमध्ये असलेल्या दहशतीच्या वातावरणामुळे निष्पक्ष मतदानाबाबत साशंकता व्यक्त होत आहे. यावेळच्या निवडणुकीचे आणखी एक वेगळेपण म्हणजे मतदानासोबतच देशात घेतला जाणारा जनमत संग्रह. पंतप्रधानपदाच्या अमर्याद अधिकारांना लगाम घालणे आणि राष्ट्रपतींच्या अधिकारांत वाढ करणे, हा या जनमत संग्रहाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले जात आहे. 'जुलै चार्टर' मधील शिफारशींनुसार राज्यघटनेतील 'बंगाली' हा शब्द बदलून त्याऐवजी 'बांगलादेशी ' असा बदल करण्याचा घाट घातला जात आहे. मात्र, या जनमत संग्रहाच्या तांत्रिक बाजू आणि त्याचे दीर्घकालीन परिणाम यांबाबत सर्वसामान्यांमध्ये अनभिज्ञता असून, या प्रक्रियेमुळे देशात राजकीय अस्थिरता अधिक वाढण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे. निवडणूक प्रचारात सर्वच राजकीय पक्षांनी भारतविरोधी भावनेचे भांडवल करण्यास सुरुवात केली आहे. सोशल मीडियावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करून भारतविरोधी आशय मोठ्या प्रमाणात पसरवला जात आहे. अगदी क्रिकेटमधील पराभवाचा संबंधही राष्ट्रीय अस्मितेशी जोडून भारताला लक्ष्य केले जात आहे. जमात-ए-इस्लामी आणि एनसीपी यांसारख्या संघटनांनी सीमा प्रश्न, नद्यांच्या पाणीवाटपाचा वाद आणि बांगलादेशच्या अंतर्गत बाबींमधील भारताचा कथित हस्तक्षेप या मुद्द्यांवरून रान उठवले आहे. तारिक रहमान यांच्या भाषणांतील 'पद्मा बॅराज'चा उल्लेख हा फक्का धरणासारख्या प्रकल्पांना आव्हान देणारा असून, तो भारतासाठी चिंतेचा विषय ठरू शकतो. भारतासाठी ही निवडणूक केवळ शेजारील देशातील सत्तांतर नसून ती सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची परीक्षा आहे. शेख हसीना यांच्या काळात भारत-बांगलादेश संबंध सुवर्णकाळात होते, मात्र त्यांच्या पदच्युतीनंतर हिंदू अल्पसंख्याकांवर झालेले हल्ले आणि मंदिरं जाळण्याच्या घटनांनी भारताची चिंता वाढवली आहे. बांगलादेश आता भारताच्या उपकारांची विसर पडल्यागत पाकिस्तानच्या जवळ जाऊ लागला आहे. १९७१ च्या फाळणीनंतर ज्या पाकिस्तानशी बांगलादेशचे संबंध तणावाचे होते, त्याच पाकिस्तानला आता व्हिसा नियमात सवलती दिल्या जात आहेत. चीननेही युनूस सरकारच्या काळात आपली गुंतवणूक वाढवून बांगलादेशला आपल्या कर्जजाळ्यात ओढण्यास सुरुवात केली आहे. दक्षिण आशियातील शक्ती संतुलनाच्या दृष्टीने बांगलादेशचे स्थान केंद्रस्थानी आहे. भारत आपली सुरक्षा आणि ईशान्येकडील राज्यांच्या स्थिरतेसाठी बीएनपीच्या रूपाने एक मध्यममार्गी सरकार सत्तेत येईल, अशी आशा धरून आहे. मात्र, जर जमात-ए-इस्लामी सारख्या कट्टरपंथी शक्तींनी अनपेक्षित यश मिळवले, तर या भागात दहशतवाद आणि धार्मिक कट्टरतावादाचा धोका वाढू शकतो. भारत, चीन आणि पाकिस्तान या तिन्ही देशांच्या नजरा या निवडणुकीच्या निकालांकडे लागल्या असून, बांगलादेश भारतासोबतचे संतुलन राखतो की पूर्णपणे पाकिस्तान-चीनच्या गोटात सामील होतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. सध्याचे चित्र पाहता, बांगलादेशचा राजकीय प्रवास एका अनिश्चित आणि धोकादायक वळणावरून सुरू असल्याचे स्पष्टपणे जाणवते. बांगलादेशातील या निवडणुका केवळ सत्तांतराची प्रक्रिया नसून त्या संपूर्ण दक्षिण आशियाच्या भू-राजकीय नकाशावर दूरगामी परिणाम करणाऱ्या ठरतील.

# केरळ सरकारचा क्रांतिकारी निर्णय

**देशातील सर्वात साक्षर राज्य असलेल्या केरळने शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये एक नवा पॅटर्न आणला आहे, ज्याचे अनुकरण देशातील इतर राज्यांनी करायलाही हरकत नाही. केरळ राज्य सरकारचा वार्षिक अर्थसंकल्प नुकताच सादर झाला. त्यामध्ये शिक्षण क्षेत्राला सर्वाधिक महत्त्व देण्यात आले असून राज्यामध्ये पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या राष्ट्रीय पातळीवर बारावीपर्यंतचे शिक्षण मोफत दिले जाते. पण पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेणारे केरळ हे पहिलेच राज्य असल्याने त्यांचा हा पॅटर्न निश्चितच अभिनंदनास पात्र आहे.**

केरळ सरकारने आजपर्यंत नेहमीच शिक्षणाला सर्वाधिक महत्त्व दिले आहे. राज्यात कौशल्य विकास क्षेत्र असो, तंत्र विकास क्षेत्र असो किंवा नियमित पद्धतीने दिले जाणारे शिक्षण असो या सर्वच क्षेत्रांना प्राधान्य देण्याचे काम आजपर्यंत केरळ सरकारने केले आहे. आता पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करून शैक्षणिक धोरणातील सर्वसमावेशकता वाढवण्याचे काम केरळ सरकारने केले आहे. एकीकडे अनेक राज्यांमध्ये थेट आर्थिक फायदा देण्याच्या योजनांना प्राधान्य दिले जात असताना म्हणजेच लाडकी बहीण किंवा अशा स्वरूपाच्या योजना राबवण्यास प्राधान्य दिले जात असताना केरळ सरकारने मात्र थेटपणे पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे केरळच्या तिजोरीला मोठा फटका निश्चितच बसणार आहे. पण मनुष्यबळाच्या विकासाचा विचार करता हा निर्णय दूरगामी परिणाम करणारा ठरणार आहे. बारावीपर्यंतचे शिक्षण मोफत असल्यामुळे साक्षरतेचे प्रमाण किमान बारावी पास या निकषावर मोजले जात होते. पण केवळ केरळ राज्य नाही तर देशाच्या इतर भागांमध्येसुद्धा बारावीनंतर शिक्षण सोडून देऊन रोजगारामागे लागण्याचा अनेक विद्यार्थ्यांचा कल असतो. त्यामागे पदवीपर्यंतचे शिक्षण न परवडणे हे एक महत्त्वाचे कारण असते. पण आता पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत दिले जाणार असल्याने विद्यार्थ्यांवर कोणताही आर्थिक भार पडणार नाही. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे




पदवीपर्यंतच्या ज्या सर्वात महत्त्वाच्या लोकप्रिय शाखा आहेत अशा विज्ञान, कला आणि वाणिज्य या क्षेत्रातील पदवीसाठीसुद्धा मोफत शिक्षणाचे धोरण राबवण्यात येणार आहे.

एकीकडे महाराष्ट्रासारख्या मोठ्या आणि शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेल्या राज्यामध्ये आणि इतरही काही राज्यांमध्ये शिक्षण सम्राटांचे महत्त्व आणि प्रभाव वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर केरळ सरकारचा हा निर्णय निश्चितच वेगळा वाटतो. शिक्षण संस्थांची स्थापना करणे हा एक व्यवसाय मानून स्वतःला शिक्षण सम्राट हा किताब लावून घेण्यास धन्यता मानण्याच्या कालावधीमध्ये केरळ सरकारने हा निर्णय घेतला आहे हे विशेष. आधुनिक काळात शिक्षण घेणे हे काही सोपे राहिलेले नाही. सर्वसामान्य पालकांना आपल्या पाल्याने चांगले शिक्षण घ्यावे असेच वाटत असल्याने अगदी नर्सरी, केजीपासून लाखो रुपये खर्च करून खासगी शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेतला जातो. सरकारी शाळांमध्ये सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध असूनही या उपक्रमांकडे पाठ फिरवण्याचाच आधुनिक काळातील पालकांचा आणि विद्यार्थ्यांचाही कल असतो. या पार्श्वभूमीवर केरळ सरकारचा हा जो मोफत शिक्षणाचा निर्णय आहे तो सरकारमान्य शैक्षणिक संस्थामध्येच शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू होणार आहे हीसुद्धा अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. एकीकडे तथाकथित शिक्षणसम्राट यांच्या शिक्षणसंस्था फोफावत असताना सरकारी शैक्षणिक उपक्रम मात्र रोडावत आहेत हे वास्तव समोर असताना हा निर्णय निश्चितच महत्त्वाचा ठरतो. शिक्षण क्षेत्रामध्ये नेहमीच पॅटर्न हा शब्द वापरला जातो. म्हणजे एखाद्या राज्याने,शहराने किंवा कोणत्याही संस्थेने शिक्षण क्षेत्रामध्ये एखादा आमूलाग्र बदल करून तो यशस्वी करून दाखवला तर त्यांचा तो उपक्रम 'पॅटर्न' या नावाने ओळखला जातो आणि अनेक जण नंतर या पॅटर्नचे अनुकरण करू लागतात. याच पार्श्वभूमीवर मोफत शिक्षणाचा हा 'केरळ पॅटर्न'

दैनंदिनी

निश्चितच अनुकरणीय आहे आणि इतर राज्यांनीसुद्धा या निर्णयाचा अभ्यास करून आपल्या राज्यांमध्ये अशा प्रकारचा उपक्रम राबवता येतो का हे पाहायला हरकत नाही. आधुनिक काळात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा निर्णय महत्त्वाचा असल्याने भारताच्या भविष्यातील पिढीची रचना लक्षात घेऊन हा निर्णय निश्चितच दूरगामी परिणाम करणारा ठरणार आहे.निवडणुकीत यश मिळवण्यासाठी अनेक मोफत आणि लोकप्रिय योजना राबवण्याकडे कल असणाऱ्या सत्ताधारी पक्षांनी मनुष्यबळ विकास करण्यासाठी महत्त्वाचे असलेल्या शैक्षणिक क्षेत्रालाही प्राधान्य द्यायला हवे, असा संदेश निश्चितच केरळ सरकारच्या या महत्त्वपूर्ण निर्णयाने दिला आहे.

लाडकी बहीण योजना असो किंवा मोफत वीज देण्याची योजना असो किंवा मोफत कोणतीही गोष्ट देण्याची योजना असो, अशा प्रकारच्या योजनांसाठी कोट्यवधी रुपयांची तिजोरी खुली करणाऱ्या राज्य सरकारांना शैक्षणिक क्षेत्रातील ही मोफत योजना राबवताना तेवढा मोठा भार तिजोरीवर पडणार नाही हेसुद्धा लक्षात घ्यावे लागेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मनुष्यबळातील ही गुंतवणूक आगामी कालावधीमध्ये सर्वात फायदेशीर ठरणार आहे. मोफत योजना जरी निवडणुकीसाठी फायदेशीर ठरत असल्या तरी राज्याच्या आणि देशाच्या विकासासाठी 'केरळ पॅटर्न' सारख्या मनुष्यबळ विकासाच्या योजनाच महत्त्वाच्या ठरणार आहेत हे कोणालाही विसरून चालणार नाही.

# मुलांच्या मोबाईल वापरावर हवा अंकुश

## पालकांनी सजग राहण्याची गरज

**या देशातील राजकीय परिस्थिती पूर्ण बिघडली आहे.सामाजिक परिस्थिती ही विस्कळीत झाली आहे,पण त्याहीपेक्षा कौटूंबिक परिस्थिती पाहिल्यास कुटूंबातील मातापित्यांचे नियंत्रण संपूर्ण कुटूंबावर राहिले नाही हे दुर्दैव आहे. विभक्त कुटूंब पद्धती सुरु झाली हे मानावे लागेल. वाढते शहरीकरण झाल्यानंतर ती अत्यंत जरुरीची गोष्ट बनली आहे.**

या विभक्त कुटूंब पध्दतीमुळे व वाढत्या शहरीकरणामुळे आणि शहरीकरणातील नव्या चंगळवादी जीवनामुळे माणसाला पैसा अपुरा पडू लागला आहे. पती पत्नी जरी काम करत असले तरी त्यांना आर्थिक टंचाई भासते, इतके प्रचंड चंगळ प्रवृत्तीचे जीवन चालू झाले आहे. प्रत्येकाच्या घरात दूरदर्शन आहे,दोन चाकी,चार चाकी गाडी आहे त्या सर्वांचे हप्ते आहेत. महागडी घरे आहेत, त्यांचे हप्ते चालू आहेत आणि हे सगळे करताना मुलांवर लक्ष कमी करत पण जीवनाशी तडजोड न करता पैसा मिळवण्याचे काम सुरु आहे. याचा परिणाम वृद्धांवर तर लक्ष नाहीच ते बरोबर नाहीतच पण लहान मुले हाताबाहेर गेली आणि त्यांच्या असलेल्या प्रवृत्तीचे होणारे परिणाम हे भावनाविवश सामाजिक दु:खात मोठ्या प्रमाणावर होत आहेत.

लहान मुलांच्या किंवा मुलींच्या हातात आपण मोबाईल देतो, त्या मुलांनाही कुतूहल असते,ते जाहिराती वाचत असतात, दूरदर्शन पहात असतात आणि त्यातून त्यांच्या डोक्यात अनेक निरनिराळ्या कल्पना असतात. आपल्याला त्रास नको ही मुले आपल्या नादात असावीत म्हणून आई बाप मोबाईल देतात आणि त्या मोबाईलचा उपयोग ज्ञानापेक्षा चुकीच्या ज्ञानाकडे ही लहान मुले करत असतात. परवा एका तेरा वर्षाच्या मुलाने पंचवीस लाख रुपये घालवले, बापाच्या खात्यावरुन ते कमी झाले आणि तो मुलगा बेपत्ता झाला. कुटूंब उद्ध्वस्त झाले.अशाच तीन भगिनींची कथा अलिकडे वाचनात आली. दूरदर्शनवर पाहण्यात आली, दहा



अकरा वर्षाच्या या तिन्ही भगिनी, आई वडिलांनी मोबाईल दिलेला, हे आईवडील इतका महागडा मोबाईल या मुलांना का देतात ते समजत नाही. श्रीमंतीचे प्रदर्शन म्हणून देतात की आपल्याला वेळ मिळावा म्हणून देतात हे काहीच समजत नाही. कुणीकडून तरी परस्पर मुले थंड बसावीत हा त्या मागचा हेतू असतो. पण ती काय करतात हे समजत नाही. नवे जग हे लुटारु, फसवे, खिसेकापू असे आहे. कसा पैसा मिळवावा हे त्यांना समजत नाही पण लोकांना लुबाडून पैसा मिळवणे हा त्यांचा धंदा असतो आणि त्यासाठी मोबाईलवर अनेक नवे प्रकल्प चालू आहेत. समोरची पार्टी कोण आहे,ती किती प्रामाणिक आहे, त्याचे कोणतेही सोयरसुतक त्यांना नाही. लुटणे, लुबाडणे आणि खाणे इतकेच त्यांना माहित आहे. समोर लहान मूल आहे की टग्या माणूस आहे हे ते पहात नाहीत. समाज गिळंकृत करण्याचे काम त्यांचे चालू असते आणि या बाबतीत शासन हताश आहे. गृहखाते थंड आहे, न्यायालय काहीही करु शकत नाही त्यामुळे गरीब माणूस हा अश्रू ढाळण्याशिवाय काहीही करु शकत नाही. या तीन मुलींच्या हातात मोबाईल दिल्यामुळे त्यांना गेम खेळण्याची उत्कंठा लागली, गेम खेळत गेल्या, किती पैसे गेले समजले नाही, आता वडील काय करणार, आई काय करणार, नंतरचा परिणाम काय होणार, त्यांना सांगायचे कसे, त्यांनी काय केले तर काय करायचे या भितीने या लहान मुलानी आत्महत्या करण्याचे ठरवले, ही लहान मुले त्यांचे मन अजान, त्यांचा विचार अजान, मनातील भिती, पर्याय सुचला नाही, धाडस देण्यासाठी कोणी नाही अशा परिस्थितीत मरण म्हणजे काय या लहान मुलींना कळणार काय.

आई वडिलांना काय वाटेल, पाहूण्यांना काय वाटेल, आपले वय काय, गुन्हा झाला कसा या सगळ्या चिंतेत पापा सॉरी, पापा सॉरी, पापा सॉरी असे लिहीत त्यांनी सूसाईड केले.परिणामला त्या घाबरल्या पण आईवडिलांचे काय, समाजाचे काय, करणाऱ्या या कंपन्या या निर्लज्य आहेत, शासन त्यांना काही करु शकत नाही, फसवणे, लुबाडणे आणि खाणे हा एक धंदा सुरु झाला. निगरगट्ट असे लोक आहेत परंतु ही मुले गेल्यानंतर सामान्य माणसाला फार वाईट वाटले हे कुठेतरी थांबले पाहिजे. हे वाचायला नको वाटते,हे ऐकायला नको वाटते,हे पाहताना या यातना होतात.

शाळा,कॉलेज,सामाजिक संस्था किंवा गृहखात्यासारख्या संस्था या सर्वांनी मिळून आता आईवडिलांना विनंती करणे गरजेचे आहे की,वीस वर्षाच्या आतील मुलांना मोबाईल देणे बंद करा, बारा तेरा वर्षाचा मुलगा किंवा मुलगी हातात दोन चाकी गाडी असते, त्याचे लायसन्स नसते, गाडी एका हाताने चालवतात आणि मोबाईलवर बोलत जातात, अपघात झाला तर जबाबदार कोण याचा विचारच नाही. आणि यातून अपघात होतातच,समाज शहाणा कधी होणार, पोलीस याला काही करु शकत नाहीत,फाजील श्रीमंती,श्रीमंती लाड आणि बडेपणाचे प्रदर्शन यामुळे हे सगळे चालू आहे.

समस्त जनहो..हे सरकारचे काम नाही,आता आपण सजग होणे गरजेचे आहे. लहान मुलांना मोबाईल देणे हे बंद केले पाहिजे. घरीसुध्दा मर्यादित मोबाईल हवा आणि शक्यतो दूरदर्शन वापरणे बंद करा यापेक्षा काय सांगणार.

■ शामराव कुलकर्णी



## अभ्यासक्रमात इंटरनेट सुरक्षेचा समावेश असावा

सर्व वयोगटामध्ये मोबाईल वापराचा अतिरेक झाला आहे.त्यातच इंटरनेटवर एआय चे जाळे व्यापक प्रमाणात वाढलेले दिसून येत आहे.सायबर फसवणूक वाढली असून दुर्भावनापूर्ण मजकूरापासून सर्वांचा विशेषत: मुलांचा बचाव व्हावा यासाठी शालेय अभ्यासक्रमात इंटरनेट सुरक्षेच्या धड्यांचा समावेश करणे अनिवार्य झाले आहे असे विद्यार्थी व पालक यांचे एका सर्वेक्षणात आग्रही भूमिका मांडली आहे.आठवड्यातून किमान दोन तासिकांचा शालेय वेळापत्रकात समावेश असावा,जेणेकरून इंटरनेट सुरक्षेचा धड्याचा समावेश केल्यास शालेय जीवनातच एआयद्वारे मिळणाऱ्या माहितीचा कसा वापर करावा, त्याचे फायदे-तोटे यांची माहिती मिळण्यास मदत होईल. केवळ विद्यार्थ्यांना पारंपारिक शिक्षण न देता इंटरनेट सुरक्षेबाबत सतर्क करणे ही आपली नैतिक जबाबदारी असून अभ्यासक्रमात या विषयाचा समावेश करावा यासाठी शिक्षण तज्ज्ञांनी पुढे यावे हीच अपेक्षा आहे.

■ शशिकांत जाधव

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**गुरूवार,ता.१२.२.२०२६,** विक्रमसंवत २०८२, शिवशक ३५२, शालिवाहन शके १९४७, विश्वावसु नाम संवत्सरे, उत्तरायणे,शिशिर ऋतो, माघ मासे, कृष्ण पक्षे, दशमी तिथी, १२.२३ नंतर एकादशी तिथी, ज्येष्ठा नक्षत्र, १३.४२ नंतर मूळ नक्षत्र, वृश्चिक रास,१३.४२ नंतर, धनु रास , हर्षण योग,२७.०६ नंतर वज्रयोग, विष्टी करण १२.२३, बव करण, २५.२८ पर्यंत, दिनमान ११.२६, सुर्योदय ७.०४, सुर्यास्त १८.३० (कोल्हापूरचे), राहू काळ दुपारी १.३० ते ३, रवि कुंभ राशीत २८.०९ वाजता.प्रयाग स्नान समाप्ती, घबाड १२.२३ पर्यंत,भद्रा १२.२३.पर्यंत.चिंतामणी महा. पु.दि.अरग, दुपारी १२.३० नंतर स्थावर व्यवहार.

**-ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## * राशीभविष्य

**मेष-** आपल्या कुटुंबियाबरोबर वेळ घालवा. दीर्घकाळ प्रलंबित असणारी थकबाकी आणि येणे अंतिमत: प्राप्त होईल. घरगुती कामे बराच काळ व्यस्त ठेवतील.

**वृषभ-** नको ते विचार मनात घोळतील. शारीरिक व्यायाम करा.आज गुंतवणूक योजनांचा नीटपणे विचार करायला हवा. आजचा दिवस तुमच्या आयुष्यातला सर्वात सुंदर दिवस असेल.

**मिथून-** आज तुम्ही सहजपणे भांडवल उभे कराल.नवीन प्रकल्पांसाठी निधी मागाल.तुमचे वैवाहिक आयुष्य साजरे करण्याच्या अनेक संधी आज तुम्हाला मिळतील.

**कर्क-** परीक्षेच्या भीतीमुळे ग्रासून जाऊ नका. तुमचे प्रयत्न तुम्हाला निश्चितपणे सकारात्मक निकाल मिळवून देतील. व्यवसायातील उत्पन्न चांगले राहील.

**सिंह-**तुमचे विनयशील वागण्याबद्दल कौतुक होईल. अनेक लोक तुमच्यावर स्तुतीसुमने उधळतील. आजचा दिवस मात्र चांगला आहे. ऑफिसच्या कुठल्याही कामात यशस्वी ठराल.

**कन्या-** तुम्ही तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे.आपल्या मित्रमैत्रिणींबरोबर आज तुम्हाला अचानक कुठे यात्रेवर जावे लागू शकते.घरगुती वातावरण चांगले राहील.

**तुळ-** विजयोत्सव साजरा केल्याने तुम्हाला अतीव आनंद मिळेल. मित्रमंडळींसमवेत हा आनंद साजरा करा.तुमचा दिवस निश्चितच चांगला जाईल.

**वृश्चिक-**स्थावर जंगम मालमत्ता गुंतवणूक लाभदायी ठरेल.तुम्हाला सरप्राइझ मिळण्याची शक्यता आहे. शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणूक फायदेशीर ठरेल.

**धनु-** पूर्वार्धात आर्थिक प्राप्ती जेमतेम राहील.उत्तरार्धात कामात यश मिळेल.कामासाठी प्रवास घडेल.विवाह जुळेल.शेतजमीनीची कामे होतील.नोकरीत बढती मिळेल.

**मकर-**आर्थिक प्राप्ती चांगली होईल.विपरीत घटनेतून लाभ संभवतो.सामाजिक कार्यात सहभाग घ्याल.गुरूकृपा राहील.कायदेशीर बाबी सांभाळा.अहंकार सोडा.

**कुंभ-**महिना यश देणारा आहे.भाग्याची साथ कर्माला मिळेल. शिक्षणाकडे दुर्लक्ष करू नका.बक्षीसे मिळवाल.राजकीय क्षेत्रात नको त्या गोष्टींचा मोह टाळा. मुलांची प्रगती होईल.

**मीन-** कौटुंबिक खर्च अवास्तव होईल. मोठे व्यवहार करू नका.शैक्षणिक प्रगती उत्तम राहिल.आर्थिक प्राप्ती वाढेल. जवळच्या व्यक्तींना दुखवू नका.अचानक धनलाभ होईल.

## वाचकांचा पत्रव्यवहार

### जागतिक पातळीवर भारतीय कंपन्या महसूलाच्या बाबतीत पिछाडीवर

जगात असलेल्या कंपन्या त्यांच्या स्थापनेनंतर व्यक्तिगत प्रगती करत बाजार भांडवल, काही कंपन्या त्यांच्या नफ्यात तर काही कंपनी महसूल कमाईतआघाडीवर पोहोचल्या आहेत.वॉलमार्ट,ॲमेझॉन आणि सौदी आरामको, सिनोपेक, युनायटेड हेल्थ आणि ॲपल या कंपन्या महसूलाचा विचार करता आघाडीवर आहेत, त्यानंतर बर्कशायर हॅथवे, पेट्रोचायना, सिव्हिएस हेल्थ,मॅकेशन या कंपन्यांची नांवे घेता येतील. महसूल बाबतीत अग्रणी असणाऱ्या प्रथम दहा कंपन्यांमध्ये अमेरिकन कंपन्यांचा दबदबा आहे.



प्रथम दहा स्थानी असणाऱ्या दोन चीनी कंपन्या आणि एक सौदी अरेबियन कंपनी यांनी व्यवसायात महसुलाच्या बाबतीत जगातील अनेक कंपन्यांना मागे टाकले आहे.ऑक्टोबर ते सप्टेंबर २५ या काळात देशातील रिलायन्स इंडिया कंपनीने महसुलाच्या बाबतीत ६५ वा क्रमांक प्राप्त केला असून एलआयसी हि भारतीय कंपनी ६८ व्या स्थानावर आणि इंडियन ऑईल या कंपनीने महसूलबाबत ९७ वा क्रमांक प्राप्त केला आहे. भारतीय कंपन्यांच्या प्रगती,भांडवल आणि उत्पन्नाच्या तुलनेत या जागतिक पातळीवर कंपन्यांना किती भरीव कामगिरी म्हणजेच मोलाचा टप्पा गाठायचा आहे याची जाणीव होते.आपण भारतीय नागरिक वृत्तपत्रीय जाहिराती, बातम्या यांच्यामार्फत जाहीर होणाऱ्या भारतीय कंपन्यांच्या कामगिरीवर खूश होऊन बसतो. प्रत्यक्षात मात्र एकही भारतीय कंपनी जागतिक पातळीवर प्रथम दहा कंपन्यांमध्ये स्थान मिळवू शकलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. यावरून भारतीय कंपन्यांना किती मोलाची कामगिरी करावी लागेल हे त्या कंपन्या आणि भारतीयांनी लक्षात घेतलेले बरे.

■ स्नेहा राज

### नवे वैभव कसे तयार होणार?

एकीकडे १४ वर्षांचा वैभव सूर्यवंशी आणि भारतीय युवा क्रिकेट संघ विश्वचषक जिंकतो, याचा आनंद साजरा करावा की राज्यातील तब्बल १२ हजारांहून अधिक शाळांमध्ये खेळाचे मैदानच नाही, याची खंत व्यक्त करावी असा प्रश्न आज उपस्थित होत आहे.



महाराष्ट्रातील सरकारी, अनुदानित, विनाअनुदानित तसेच स्व-वित्तीय शाळांमध्ये मूलभूत पायाभूत सुविधांचा मोठा अभाव असल्याचे शिक्षण विभागाच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. खेळाच्या मैदानांबरोबरच शौचालये, ग्रंथालये, वीज आणि इतर आवश्यक सुविधांचीही मोठ्या प्रमाणावर कमतरता आहे. राज्यात मुलांसाठी स्वतंत्र शौचालयांची सुविधा नसलेल्या शाळांची संख्या २,०५५ असून, त्यामध्ये सरकारी १,९४२, अनुदानित ८६, विनाअनुदानित ५ आणि स्व-वित्तीय २२ शाळांचा समावेश आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ३,९३२ शाळांमध्ये रॅम्प उपलब्ध नाहीत. खेळाच्या मैदानाची सुविधा १,२५० शाळांमध्ये नसल्याचे दिसून आले आहे. त्यामध्ये सरकारी ९९५, अनुदानित १,२०८, विनाअनुदानित १९४ आणि स्व-वित्तीय १,१९३ शाळांचा समावेश आहे. तसेच ९,९९१ शाळांमध्ये संरक्षक भिंत नसल्याचेही समोर आले आहे.शाळांची अशी अवस्था असताना देशाचे भविष्य किंवा भावी चॅम्पियन्स कसे तयार होणार? एकीकडे 'लाडक्या' योजनांची खैरात वाटली जाते आणि दुसरीकडे मुलांच्या शाळांमध्ये हात धुण्यासाठीही पाणी नसते ही बाब अत्यंत लाजिरवाणी असून मुलांप्रती असलेली अनास्था स्पष्टपणे प्रतिबिंबित करते. अशा परिस्थितीत नवे वैभव कसे तयार होणार? असा प्रश्न पडतो.

■ दत्तप्रसाद शिरोडकर

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.* कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# गारगोटीत दोन मंत्र्यांना ठरले के.पी., राहुल भारी

## भुदरगडात युतीच्या विजयाचा वारू देसाईंनी रोखला | आबिटकरांच्या विजयाला गावच्या पराभवाची किनार

गारगोटी,ता.११(आनंद चव्हाण)-

..........................................

**जिल्हा परिषद निवडणुकीत संपूर्ण भुदरगड तालुक्यात युतीचा म्हणजे पालकमंत्री ना. प्रकाश आबिटकर यांचा विजयाचा वारू दौडत असताना त्याला लगाम लावण्याचे काम आघाडीच्या राहुल देसाई आणि के.पी.पाटील यांनी केले आहे. ना.चंद्रकांतदादा पाटील व ना.प्रकाश आबिटकर यांच्या गारगोटी या त्यांच्याच गावात पराभव पत्करावा लागला आहे. गारगोटी जिल्हा परिषद व दोन पंचायत समिती गणात नामुष्कीजनक पराभव झाल्याने हा घरचा पराभव युतीच्या जिव्हारी लागला आहे. ''गारगोटीत राज्याचे दोन कॅबिनेट मंत्री पण त्यांना ठरले राहुल देसाईच भारी'' अशी गत युतीची झाली आहे.**



चंद्रकांत पाटील प्रकाश आबिटकर के.पी.पाटील राहुल देसाई

भुदरगड तालुक्यात चार जिल्हा परिषद व आठ पंचायत समितीचे गण आहेत. भुदरगड तालुक्याला दोन मंत्री लाभले आहेत. जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर व मूळ भुदरगड तालुक्यातील खानापूर गावचे ना.चंद्रकांतदादा पाटील.तालुक्यात या मंत्र्यांनी शिवसेना भाजपा युती केली होती तर राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आ.के.पी.पाटील व काँग्रेसचे राहुल देसाई यांनी शिवशाहू आघाडी केली होती. या तालुक्यात युती विरुद्ध शिवशाहू आघाडी अशी दुरंगी सरळ लढत झाली. तालुक्यात जि.प.च्या सर्व जागा शिवसेनेने लढवल्या होत्या तर पंचायत समितीच्या सहा जागा लढवल्या होत्या. भाजप दोन जागेवर लढत होती. ना पाटील यांचे कट्टर समर्थक खानापूर येथील प्रविणसिंह सावंत यांच्या पत्नी विद्या सावंत गारगोटी गणातून लढत होत्या. त्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी गारगोटीत कमळ फुलवण्यासाठी ना. पाटील यांनी गारगोटीत घरोघरी प्रचार केला. आवश्यक ती ''रसद'' पुरवली होती. ही निवडणूक जिंकण्यासाठी त्यांनी प्रतिष्ठा पणाला लावली होती. ना.आबिटकर यांच्या साथीने गारगोटीचा गड सर करू असा त्यांना विश्वास होता. शिवाय ना.पाटील यांना पूर्वीचे भाजपा जिल्हाध्यक्ष राहुल देसाई यांच्या पत्नीचा गारगोटी जि प गटात पराभव करणे व सावंत यांचा विजय खेचून घेणे असा एका दगडात दोन पक्षी मारण्याची त्यांची इच्छा होती आणि हा गट व गण गारगोटीचा म्हणजे ना.आबिटकर यांच्या घरातील होता.पालकमंत्री असल्याने त्यांनीही प्रतिष्ठा पणाला लावली होती. ना आबिटकर यांनीही मोटार सायकलने घराघरात जाऊन प्रचार केला होता.ना.पाटील यांनी आबिटकर यांच्यावर गारगोटी गट व गणाची जबाबदारी सोपवली होती, त्यामुळे ना.आबिटकर ताकदीनिशी मैदानात उतरले होते. मैदान मारण्यासाठी सर्व अस्त्रे वापरण्यात आली होती.

गारगोटी गट व गणाच्या मतमोजणीस सुरुवात झाली आणि युतीच्या विजयाचा वारू राहुल देसाई यांनी रोखला आणि आपला गड सुद्धा पुन्हा ताब्यात घेतला. दोन वजनदार मंत्र्यांचे मनसुबे इथे उधळले गेले. त्यांचे पानीपत झाले आणि गारगोटी गटातील त्यांच्या पत्नी रेश्मा राहुल देसाई १८०० मतांनी अजिंक्य ठरून दोन्ही गणातील ठाणेदारही विजयी झाले.

गारगोटी हे भुदरगड तालुक्याचे मुख्यालय आहे. त्यामुळे दोन मंत्र्यांना गारगोटीतील विजय अपेक्षित आणि महत्वाचा वाटत होता पण जनतेने पुन्हा एकदा राहुल देसाई यांना संधी दिली आहे. त्यांच्या संयमी आणि शांत नेतृत्वावर पुन्हा विश्वास दाखवला आहे. हा पराभव दोन्ही मंत्र्यांना जिव्हारी लागणारा आणि नामुष्कीजनक आहे.

युतीच्या तालुक्यातील विजयाला गारगोटीतील पराजयाची किनार लाभली आणि त्यामुळेच भुदरगड पंचायत समितीवर झेंडा रोवूनही युतीच्या विजयाचे ना फटाके वाजले, ना गुलाल उधळला गेला. त्या तुलनेत गारगोटीचा गड सर केल्याने काँग्रेस व राष्ट्रवादीने शहरात मोठी मिरवणूक काढून आपला आनंद व्यक्त केला.कडगाव जिल्हा परिषद गटात बिद्री साखर कारखान्याचे संचालक सत्यजित जाधव आणि धनाजीराव देसाई जिकडे जातील तिकडे 'जय' असे गेल्या दोन दशकातील समीकरण होते, पण त्याला छेद देण्याचे काम यंदा झाले. यशवंत नांदेकर यांनी आपल्या पत्नीचा विजय खेचून आणला. या विजयाने कडगाव-पाटगाव भागात आता नांदेकर यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब झाले.

आकुर्डे जिल्हा परिषद गटात माजी जि.प.सदस्य व श्री मौनी विद्यापीठाचे चेअरमन मधुकर देसाई यांच्या पत्नी व माजी जि.प.सदस्या उज्वला देसाई यांचा मोठ्या मताधिक्याने झालेला पराभव आत्मचिंतन करायला लावणारा ठरला आहे. आबिटकर यांचे विश्वासू सहकारी कल्याण निकम यांच्या संयमी नेतृत्वाला मिणचे खोरीने या निमित्ताने पसंती दिल्याचे दिसत आहे तर पिंपळगाव गटात ना.आबिटकर यांच्या भावजय रोहिणी आबिटकर यांचा अपेक्षेप्रमाणे विजय झाला पण पुष्पनगर पंचायत समिती गणात शिवशाहू आघाडीच्या राजश्री बाळासाहेब जाधव यांनी दिलेली लढत विचारमंथन करायला लावणारी आहे.

# यमकनमर्डीत भावी आमदार भाजपचाच

## रमेश कत्ती; भाजपच्या कार्यकर्त्यांना तयारीला लागण्याच्या सुचना

संकेश्वर,ता.११(प्रतिनिधी)-

..........................

**यमकनमर्डी विधानसभा मतदारसंघातील परकनट्टी पीकेपीएस कार्यक्रमात माजी खासदार व बेळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक रमेश कत्ती यांनी जारकीहोळी विरोधात रणशिंग फुंकले आहे.**



कार्यक्रमात बोलताना रमेश कत्ती म्हणाले, यमकनमर्डी मतक्षेत्रातील आगामी ग्रामपंचायत ,तालुका पंचायत आणि जिल्हा पंचायत निवडणूक एकजुटीने लढवून विजयाचा पताका फडकविण्याबरोबर आगामी यमकनमर्डी विधानसभा निवडणुकीत येथे भाजपा उमेदवाराला विजयी करण्याचा निर्धार करुया.याकरिता येथील भाजपचे नेते मारुती अष्टगी, बसवराज उंदरी यांनी एकत्र येऊन आतापासून तयारीला लागायला हवे आहे.दोघांनी येथील लोकांचा तसेच भाजपा हायकमांडचा विश्वास संपादन करुन आगामी ग्रामपंचायत,तालुका पंचायत, जिल्हा पंचायत निवडणुकीत भाजपचा 'झेंडा' फडकविणे बरोबर विधानसभा निवडणुकीत येथील आमदाराला ( सतीश जारकीहोळी यांचा नामोल्लेख न करता) बाहेर घालविण्याचे कार्य करायला हवे आहे.याकरिता आपण त्यांना खंबीरपणे साथ देण्याचा मनस्वी निर्धार केला आहे. भाजपा कार्यकर्ते आणि सूज्ञ मतदारांनी यमकनमर्डी विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी आपापसातील मतभेद प्रतिष्ठा बाजुला सारुन मारुती अष्टगी, बसवराज उंदरी यांना साथ देण्याची आवश्यकता आहे. यमकनमर्डीचा भावी आमदार भाजपचाच राहणार यात तिळमात्र शंका नसल्याचे त्यांनी सांगितले.

# निपाणीत ४,२६४ विद्यार्थी देणार दहावीची परीक्षा

निपाणी,ता.११(प्रतिनिधी)-

..........................

**राज्यामध्ये यंदा एसएसएलसीची (दहावी) परीक्षा १८ मार्च ते २ एप्रिलअखेर होणार आहे. निपाणी गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडून परीक्षेची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. या परिक्षेदरम्यान गैरप्रकार होऊ नयेत, यासाठी भरारी पथके, बैठी पथके कार्यरत राहणार आहेत तसेच सीसीटीव्हीचा वॉच राहणार आहे.**




निपाणी विभागात एकूण १२ केंद्रांवर या परीक्षा होणार असून त्यामध्ये शहरातील ४ आणि ग्रामीण भागातील ८ केंद्रांचा समावेश आहे. निपाणी विभागातून ४ हजार २६४ विद्यार्थी दहावीची परीक्षा देणार आहेत, अशी माहिती गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने दिली.

यावर्षी शिक्षण विभागाने कॉपीमुक्त परीक्षेसाठी कडक आदेश जारी केले आहेत.संवेदनशील व अतिसंवेदनशील केंद्रांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर तालुका स्तरावर विशेष तपास पथके, भरारी पथके तसेच केंद्र प्रमुखांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिक्षण विभागाच्या पथकांमार्फत परीक्षांवर सीसीटीव्हीच्या माध्यमातून सतत वॉच ठेवण्यात येणार आहे. यामध्ये परीक्षा सुरळीत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी प्रशासन, शिक्षण विभाग आणि पोलिस विभाग यांच्यात समन्वय ठेवण्यात आला आहे. संपूर्ण नियोजन अंतिम टप्प्यात आल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे. प्रत्येक परीक्षा केंद्रावर पोलिस, होमगार्ड नियुक्त करण्यात येणार आहेत.याशिवाय परीक्षा केंद्राबाहेर पोलिसांचे पेट्रोलिंग राहणार असून संवेदनशील व उपद्रवी केंद्रांवर अतिरिक्त पोलिस कर्मचारी राहणार आहे. शिवाय परीक्षा केंद्राच्या २०० मीटर आवारात झेरॉक्स सेंटरना बंदी घालण्यात आली आहे.

# जीवनाचे सार्थक होण्यासाठी सत्संग गरजेचा

### श्रद्धानंद महास्वामी

बारवाड,ता.११(वार्ताहर)-

..........................

**मानव जन्म हा सर्वात श्रेष्ठ जन्म आहे.पण याचा कोणी विचारच करत नाही.जो तो स्वार्थच पाहताना दिसत आहे.या स्वार्थासाठी मानव धर्म विसरत चालला आहे.त्यामुळे जीवनात सुख समाधान मिळेनासे झाले आहे.जर जीवनाचे सार्थक करून घ्यायचे झाल्यास सत्संग केला पाहिजे.**



कुन्नुर येथे महाशिवरात्र उत्सवाच्या प्रवचन सेवेची दीपप्रज्वलनाने सुरुवात करताना श्रद्धानंद स्वामी,प्राणलिंग स्वामी व इतर.

जीवनाचे सार्थक होण्यासाठी सत्संग गरजेचा आहे,असे मत शिवानंद मठ गीताश्रम सदलग्याचे प.पू.डॉ.श्रद्धानंद महास्वामीजी यांनी व्यक्त केले.कुन्नुर (ता.निपाणी) येथे श्री शंभू महादेव देवस्थान व तावदारे परिवार यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या महाशिवरात्री उत्सवात आशीर्वचनपर प्रवचन सेवेत बोलताना श्रद्धानंद स्वामीजींनी वरील मत व्यक्त केले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, माणसाचं सौंदर्य जोपर्यंत आहे तोपर्यंत ते चांगले आहे. तेव्हा सौंदर्याचा, संपत्तीचा, पदाचा अभिमान न बाळगता चांगले विचार ठेवून आपल्याबरोबर इतरांचेही चांगले व्हावे ही भावना ठेऊन जीवन जगावे.येताना आपण काही आणले नाही व जाताना काही घेऊन जाणार नाही.याचा विचार करून जीवनात समाधानी रहा.सत्संगाशिवाय सद्गती नाही म्हणून प्रपंचात एक तास सत्संगाला द्या.जोपर्यंत मन निर्मळ होत नाही तोपर्यंत देवाजवळ आपल्याला जागा नाही व मी पणा जोपर्यंत जात नाही तोपर्यंत मुक्ती नाही.

यावेळी विरूपाक्षलिंग देवस्थान समाधी मठ निपाणीचे प.पू.प्राणलिंग महास्वामी यांनीही आशीर्वचनपर मार्गदर्शन केले.प्रारंभी स्वामीजींची पादपूजा करण्यात आली.त्यानंतर महात्मा बसवेश्वर, प.पू.सिद्धेश्वर महास्वामीजींच्या फोटोंचे पूजन व दीपप्रज्वलन स्वामीजींच्या हस्ते करण्यात आले.यावेळी स्वामीजींचा व अन्य मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.महाआरती होऊन महाप्रसाद वाटप करण्यात आला.

# गडहिंग्लजमध्ये दळप व्यावसायिकांचा स्मार्ट मीटरला तीव्र विरोध

गडहिंग्लज,ता.११(प्रतिनिधी)-

..............................

**वीज वितरण यांच्याकडून प्रत्येक घरघुती वीज ग्राहकांना जुने मीटर काढून नवीन स्मार्ट मीटर बसवले जात आहे.त्याला दळप व्यावसायिक व ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात विरोध केला आहे.**



त्यानंतर आता ज्यांची थ्री फेज कनेक्शन आहेत. त्या ठिकाणी सुध्दा स्मार्ट मीटर बसवत आहेत.पण स्मार्ट मीटर बसवल्यास त्यापासून अनेक प्रकारच्या अडचणी येत आहेत.याचा विचार करून स्मार्ट मीटर बसवू नये, अशी मागणी युवामंचचे अध्यक्ष काशिनाथ गडकरी व सागर कांबळे यांनी, कार्यालयाचे उपकार्यकारी अभियंता राम सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे. निवेदनावर सचिन गूंडप, फैयाज शेख, अशोक दोनवाडे, पांडू दळवी, पांडू गूंडप यांच्या सह्या आहेत.



# मंडलिक महाविद्यालयात पारितोषिक वितरण संपन्न

मुरगूड,ता.११(प्रतिनिधी)-

..............................

**सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूडचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शिवाजी विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ रघुनाथ ढमकले यांच्या हस्ते पार पडला.**

यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य स्वागत परुळेकर, राष्ट्रकुल कुस्ती स्पर्धा सुवर्णपदक विजेता रणजित नलवडे व व्हॉलीबॉल मार्गदर्शक महादेव कानकेकर, संभाजी मांगले, आंतरराष्ट्रीय कुस्ती मार्गदर्शक दादा लवटे या मान्यवरांचा सत्कार प्रा.डॉ.शिवाजी होडगे व उपप्राचार्य शिवाजी पोवार यांच्या हस्ते शाल व बुके देऊन करण्यात आला.

यावेळी डॉ.रघुनाथ ढमकले यांनी मार्गदर्शनपर मनोगतांमध्ये खेळाडूंसह सर्वच विद्यार्थ्यांनी खेळासह सर्वच क्षेत्रात अपयशावर मात करत यशाची शिखरे गाठण्यासाठी मौलिक शुभेच्छा दिल्या.प्रा.संजय हेरवाडे यांनी सूत्रसंचालन केले.यावेळी खेळाडूंना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते टी-शर्ट व शूज देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्राध्यापक, प्रशासकीय सेवक,विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# बीडीसीसी बँकेच्या ठेवींवरुन राजकारण तापले

## आम.भालचंद्र जारकीहोळींचे विरोधकांना थेट चर्चेचे खुले आव्हान

बेळगाव,ता.११(प्रतिनिधी)-

..............................

**बेळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील (बीडीसीसी बँक) ठेवी व कर्ज व्यवहारांवरून जिल्ह्यातील राजकारण पुन्हा एकदा तापले आहे. अरभावीचे आमदार व बेळगाव जिल्हा दूध उत्पादक संघ (बेमुल) अध्यक्ष भालचंद्र जारकीहोळी यांनी बीडीसीसी बँकेच्या ठेवींबाबत सुरू असलेल्या आरोपांना जोरदार प्रत्युत्तर देत विरोधकांना थेट चर्चेचे खुले आव्हान दिले आहे.**

पत्रकार परिषदेत बोलताना आमदार जारकीहोळी यांनी डॉ. महांतेश कडाडी व माजी खासदार रमेश कत्ती यांच्यावर टीका केली. बीडीसीसी बँकेच्या ठेवी व कर्ज व्यवहारांबाबत ते चुकीची व दिशाभूल करणारी आकडेवारी मांडत असल्याचा आरोप त्यांनी केला. सौभाग्य लक्ष्मी साखर कारखान्यासाठी एकूण १६० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले आहे. त्यापैकी



८० कोटी रुपये कोल्हापूर येथून तर उर्वरित ८० कोटी रुपये बीडीसीसी बँकेतून दिले आहेत. अशी स्पष्ट माहिती त्यांनी दिली. या कर्जासाठी सुमारे ३०० कोटी रुपयांची मालमत्ता तारण ठेवली असून, ४३२ एकर जमीन आणि सुमारे २३२ कोटी रुपये किंमतीची प्लांटेशन मालमत्ता बँकेकडे सुरक्षिततेसाठी गहाण ठेवल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे बँकेच्या आर्थिक सुरक्षिततेबाबत कोणतीही शंका घेण्याचे कारण नसल्याचे जारकीहोळी यांनी स्पष्ट केले.

काही नेते बँकेची बदनामी करण्याच्या हेतूने कर्ज देऊ नका, बँक बंद करा, अशा बेजबाबदार विधानांद्वारे जनतेत भीती निर्माण करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

### एकाच व्यासपीठावर या

आरोप करायचे असतील, तर ते एकतर्फी माध्यमांमधून न करता एकाच व्यासपीठावर येऊन खुल्या चर्चेत करावेत, असे थेट आव्हान आमदार भालचंद्र जारकीहोळी यांनी विरोधकांना दिले.बीडीसीसी बँकेच्या कारभारावरून सुरू असलेले हे आरोप-प्रत्यारोप जिल्ह्यातील सहकार आणि राजकारणाच्या केंद्रस्थानी आले असून, येत्या काळात या मुद्द्यावर राजकीय संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

# बुदिहाळ येथे महाशिवरात्रीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

निपाणी,ता.११(प्रतिनिधी)-

..............................

**बुदिहाळ येथे महाशिवरात्री यात्रेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. रविवार ता.१५ रोजी श्रींची पालखी मिरवणूक व ग्रामस्थांतर्फे रुद्राभिषेक, वसंत सकपाळ यांच्या वतीने रात्री दत्तपंथी भजनी मंडळ व हरीपंथी भजनी मंडळ, हरिओम उपासना केंद्र, वारकरी संप्रदाय यांचा भजनाचा कार्यक्रम होईल. सोमवार ता.१६ रोजी सकाळी विविध शर्यतीचे आयोजन केले आहे.**

यामध्ये जनरल बैलगाडी शर्यतीसाठी अनुक्रमे ११००१, ७००१,५००१, आदत घोडा बैलगाडी ५००१, ३००१, २००१, जनरल घोडाबैल ७००१, ५००१, ३००१, जनरल नवतर घोडागाडी ७००१, ५००१, ३००१, जनरल घोडागाडी ५००१, ३००१, २००१ अशी बक्षीसे दिली जाणार आहेत.तसेच दुपारी तीन वाजता यशवंत देसाई आखाडा येथे भव्य जंगी कुस्त्या होणार आहेत.

प्रथम क्रमांकाची लढत प्रकाश पाटील-घोडगिरी विरुद्ध सचिन काळे-आटपाडी यांच्यात होईल तसेच अन्य कुस्त्याही होणार आहेत. कुस्ती मैदान उद्घाटन अदृश्य काडसिद्धेश्वर महास्वामीजी कणेरीमठ, प्राणलिंग महास्वामीजी-समाधीमठ, हालशुगर माजी चेअरमन व संचालक सुकुमार पाटील, सूर्यकांत पाटील यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते होईल तसेच रात्री ऑर्केस्ट्रा झंकार बिट्स हा मनोरंजनाचा कार्यक्रम होणार आहे.



# व्हॉलीबॉल स्पर्धेत मांगले स्पोर्टस् प्रथम

मुरगूड,ता.११(प्रतिनिधी)-

..............................

**कोल्हापूर जिल्हा व्हॉलीबॉल प्रीमियर लीग स्पर्धेत मुरगूडच्या कै.पै.आनंदा मांगले स्पोर्टस्ने प्रथम क्रमांकाचा विरेंद्र चषक पटकावला.अंतिम सामन्यात आनंदा मांगले स्पोर्टस्ने सयाजी फिटनेस संघाला पहिल्या सेटमध्ये २६-२४ अशी मात दिली. मात्र दुसऱ्या सेटमध्ये सयाजी फिटनेस संघाने मांगले स्पोर्टस्चा २५-२३ असा पराभव करीत बरोबरी साधली. निर्णायक अन चुरशीच्या झालेल्या तिसऱ्या सेटमध्ये १६ - १४ असा पराभव करीत मांगले स्पोर्टस्ने प्रथम क्रमांक पटकावला.**

स्पर्धेत द्वितीय क्रमांक-सयाजी फिटनेस मुरगूड,तृतीय क्रमांक-अभिजीत पाटील फ्रेंड सर्कल मुरगड या संघांनी पटकावले.वैयक्तिक पारितोषिकामध्ये मॅन ऑफ द सिरीज-करण मांगले (मुरगूड),बेस्ट ब्लॉकर-ऋषी चव्हाण (कोल्हापूर),बेस्ट स्मॅशर :विक्रम रानमाळे (मुरगूड), बेस्ट लिफ्टर -जीवन पवार (ईश्वरपूर) व बेस्ट लीबेरो-सुहास भारमल (मुरगूड) यांनी पटकावली आहेत. या स्पर्धा पश्चिम महाराष्ट्र युवा सेनेचे निरीक्षक विरेंद्र मंडलिक यांच्या वाढदिवसा निमित्त आयोजित करण्यात आल्या होत्या. स्पर्धेत पंच म्हणून प्रवीण मोरबाळे, विनोद रणवरे, शहानवाज मोमीन यांनी काम पाहिले. नंदू चौगले, करण मांगले व निखिल पाटील यांनी समालोचन केले.बक्षीस वितरण नगरसेवक सुहास खराडे, एस.व्ही.चौगले, संभाजी आंगज, महादेव कानकेकर, सुनील रणवरे, दिपक माने, दिपक शिंदे, राहुल शिंदे, सुनील मंडलिक यांच्या हस्ते झाले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राणा प्रताप क्रीडा मंडळ व राणाप्रताप व्हॉलीबॉल क्लब मुरगूड यांनी परिश्रम घेतले.



संकेश्वरः येथे पडलेली जीवघेणी चर.

# संकेश्वरातील 'तो' खड्डेमय चर मुजविण्याची प्रवाशांची मागणी

संकेश्वर,ता.११(प्रतिनिधी)-

..............................

**संकेश्वर सुभाष रस्ता येथे अपघाताला निमंत्रण देणारी खड्डेमय 'चर' निर्माण झालेली दिसत आहे.त्यामुळे सुभाष रस्ता ते आझाद रस्त्याकडे जाताना चिकोडी हॉटेल जवळ दुचाकी,चारचाकी तसेच ऑटोरिक्षा चालकांना कसरत करावी लागत आहे.**

चरीमुळे वाहन चालकांना सावधपणाने सावकाश वाहने चालवताना छोट्यामोठ्या अपघातांना सामोरे जावे लागत आहे.पालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी येथील रस्त्यावरील खड्डेमय चर ताबडतोब मुजविण्याची मागणी होत आहे.

# सानिया तेंडुलकर यांना पीएचडी प्रदान

निपाणी,ता.११(प्रतिनिधी)-

..............................

**येथील रहिवासी सानिया तेंडुलकर यांना नुकतीच शिवाजी विद्यापीठाकडून प्राणिशास्त्र विभागातर्फे पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.त्यांनी फायटोरेग्युलेटार इनड्युस न्युरो बायोलॉजिकल स्टडी अगेन्स्ट सम मोलुस्कस या विषयावर शोध प्रबंध सादर केला होता.त्या सध्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे प्राणी शास्त्र विभागात संशोधक विद्यार्थी म्हणून कार्यरत आहेत.**



त्यांना कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एस.आर.यंकची,संशोधन मार्गदर्शक डॉ.एन.ए.कांबळे यांच्यासह विभागातील प्राध्यापक संशोधक,विद्यार्थी व कुटुंबियांचे मार्गदर्शन लाभले.त्यांना पीएचडी पदवी प्राप्त झाल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# भिकाजी बल्लारी यांचे निधन



निपाणी,ता.११(प्रतिनिधी)-

प्रगतीनगर येथील रहिवासी भिकाजी रामचंद्र बल्लारी (वय ७२) यांचे निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले, एक मुलगी, भाऊ,भावजय, जावई,नातवंडे असा परिवार आहे.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**आयको समोर** ३ गुंठे जागा विकणे आहे. संपर्क–९९६०२८६१२८

**चालू कॅफेचे मटेरियल** विकणे आहे. कडई, फ्रीज, सॅन्डविच मेकर, प्लेटा, ग्लास इत्यादी संपर्क–९२२५४०१००८, इचलकरंजी.

**कारखाना शेड विकणे.** थोरात चौक, शांतीनगर, हॉटेल सारथीजवळ ४००० फुटाचे पूर्ण बांधलेले ४० फूटी रोडटच योग्य किंमत आलेस. संपर्क–९९७०३२९३११, ९८२३०२६६९३

**विकणे आहे.** कलेक्टर एनए १०७० स्के. फूट प्लॉट, स्टेशन रोडटच, मराठी शाळेजवळ, कोरोची. ९०६७१७५२६२

**बेसमेंट विकणे आहे.** २३४० चौ. फूट रोडटच सिम्मा स्क्वेअर, गार्डन हॉटेलसमोर, कॅन्टाबील शोरूमच्या खाली विकणे आहे. ९८२३०३३८९०

**७९९९ रु. मध्ये ३२''** एलईडी टीव्ही, फ्रिज, होमथिएटर टेबल सिलिंग फॅन, कुलर स्वस्त मिळतील. भारत इलेक्ट्रॉनिक्स, स्टेट बँकेसमोर, इचलकरंजी. ७५१७९६९६८०

**जुने व नवे पॉवरलूम** घेऊ व देऊ तसेच फवारा, कांडीमशिन, डक्टींग घेऊ व देऊ. संपर्क–८३१७२९१००८

**टाकवडे रोड,** गुरूकूल कॉलनी येथील गुंठेवारी झालेला रिकामा प्लॉट २००० स्के. फूट त्वरीत विकणे आहे. संपर्क–श्री. लोखंडे. मो. ९२७१५५१६७१

**अशोक लेलँड दोस्त** (LS) गाडी विकणे आहे. एकहाती वापरलेली, मॉडेल–२०१६, संपर्क–मोबाईल–९५५२०२३८३८

**महासत्ता चौकमध्ये** १ बीएचके, २ बीएचके फ्लॅट व ऑफिससाठी बुकिंग सुरू आहे. स्वामी समर्थ मंदिरजवळ, पॅराडाईज कॉलनी, इचलकरंजी. ९३२५८३०५९२

**सांगली रोड,** यड्राव फाटा येथे सनसिटीमध्ये ३ बीएचके रो बंगलो भाड्याने/विकणे आहे. संपर्क–८४५१००४२०७

**हातकणंगले जवळील** कुंथुगिरी मंदिरापासून फक्त पाचशे फूट अंतरावरती असणारा व रामलिंग डांबरी रोडटच २०० फुट फ्रंटेज असणारा ५ गुंठे, १० गुंठे, १५ गुंठे प्लॉट फार्मसाठी उपयुक्त असणारा विकणे आहे. अधिक माहितीसाठी खाली दिलेल्या नंबरवरती कॉल करा. ९३७०१४१५०५

**घर विकणे–** सांगली नाका, शहापूर रोड, स्टेट बँकेसमोर, इचलकरंजी. फोन–९८९०२४३२३४ (कृपया एजंट क्षमस्व)

**३०X५० चा प्लॉट** विकणे आहे. कोल्हापूर रोड, शिवनंदी मंगल कार्यालयमागे, पाण्याची टाकीजवळ, संपर्क– कबनूर, फोन–९८८१८७४८६६

**घर विकणे आहे.** वारणा बँकेशेजारी, हॉटेल वुडहाऊसजवळ, संपर्क–७७४५८८२२००, इचलकरंजी. (एजंट क्षमस्व)

**नवीन कोल्हापूर नाक्याजवळ,** कोल्हापूर रोडटच इचलकरंजी येथे ३६१६ स्के. फूट क्षेत्र जागा व त्यावरील आर.सी.सी. बांधकाम असलेली इमारत विकणे आहे. संपर्क–९४०४१०४०६७, ९३७२००४०६७

## इतर

**ढेकूण, पाल, मुंग्या,** वाळवी, झुरळांसाठी वस्तू न काढता हर्बल जेल १००% गॅरंटी प्रतिरूम ५४९/– संपर्क–९४२१६४६३५२, ७०२०९७४६४८

## यात्रासहल

**४ मार्च–**दत्त परिक्रमा पिठापूर, कुरवपूर, मंत्रालय–१० दिवस, २२ मार्च–तुळजापूर, अक्कलकोट, वणी, माहूरगड, शेगाव–६ दिवस. कोजागिरी ट्रॅव्हल्स. ९४०३९५३४१२, ९४२०५९२५२४

## * नोकरी विषयक *

**होलसेल औषध दुकानात** कामगार पाहिजेत. शिक्षण– BA, B.Com, B.Sc मुले/मुली. संपर्क–ग्रीन मेडिको, एलएलपी, सरस्वती हायस्कूलशेजारी, भोनेमाळ. मो. ७८७५६५७०८५, भेटण्याची वेळ–सायंकाळी ५ ते ६.

**ड्रायव्हर पाहिजे.** अशोक लेलॅन्ड बडा दोस्त टेम्पोवर पुणे–बेंगलोर–चेन्नई लाईनसाठी टीआर लायसनधारक ड्रायव्हर पाहिजे. संपर्क–९८२२५३४४५३

**मोफत कॉम्प्युटर प्रशिक्षण** योजने अंतर्गत ५० बॅचेसना प्रवेश सुरू १०० % नोकरी व व्यवसायाभिमुख कोर्सेस Graphic Design, Ms-Office, Tally Prime, Advance Excel कोर्सेसना प्रशिक्षण. नाममात्र नोंदणी फी. युनिव्हर्स कॉम्प्युटर– पत्ता– इचलकरंजी बस स्टॅन्डजवळ, बँक ऑफ महाराष्ट्रसमोर. – संपर्क–९२८४२६४९८०

**अशोक लेलॅन्ड** बडा दोस्त टेम्पो पॅकबॉडी मंथली बेसवर भाड्याने मिळेल. संपर्क–९८२२५३४४५३

**CNC ऑपरेटर पाहिजेत.** शिकाऊ व अनुभवी पार्टटाईम, लेडीज/जेंटस संपर्क–जवाहरनगर, संजय फौंड्रीजवळ, इचलकरंजी. फोन–९७६६२९३३६२, ९५२७४९१७००

**टॅक्स कन्सलटंट** ऑफिसमध्ये कामासाठी अनुभवी मुली पाहिजेत. टॅली आणि कॉम्प्युटरची माहिती आवश्यक. संपर्क–८८५६९६६६७६

**शुध्द शाकाहारी हॉटेलमध्ये** चपाती व भाकरी करणेसाठी व भांडी कामासाठी लेडीज पाहिजेत. संपर्क–हॉटेल बसवेश्वर, शाहू कॉर्नर, इचलकरंजी. ९८८१४७५०१८

**अर्जंट सिक्युरिटी भरती–** इचलकरंजी, जयसिंगपूर, चिपरी, हातकणंगले, कुंभोज, नांदणी येथे आकर्षक पगार. संपर्क–७०२०१९७९८०, ८२०८५१९९८८

**डॉमिनोज पिझ्झा–** कामगार पाहिजे. डिलेव्हरी बॉय, आकर्षक पगार, पार्ट टाईम, फूलटाईम संपर्क–९५२९२१५७४०, ७८४१०५४१०८

**पाहिजे.** फौंड्रीमध्ये सबकॉन्ट्रॅक्टर कास्टींग फॉलोअपसाठी–१ जागा, टॅलीचे ज्ञान आवश्यक. संपर्क–९९२२८१०३४९

**पाहिजेत.** फॅब्रिकेशन वेल्डर, फिटर, शिकाऊ वेल्डर, आयटीआय प्राधान्य. Orgon/ $CO^2$ शिकण्याची संधी. ईएसआयसी आणि पीएफ सह आकर्षक पगार. Shree Hospital Equipment Shahapur, Ich. Contact-9028521710, 8380001705

**माल वितरणासाठी** ड्रायव्हर व लोडर नेमणे आहेत. ( TR Licences Compulsary) किमान १२ वी. संपर्क–९४२२०४४७०४

**वाईन शॉपमध्ये** कॉम्प्युटर बिलिंगसाठी मुलगा पाहिजे. संपर्क–सागर वाईन्स. ७०२०९८२४२७

**पाहिजेत.** असिस्टंट टॅली अकौंटंट लेडीज (बी.कॉम) वय–३० पेक्षा जास्त, बँक ऑफिस, सेल्स असिस्टंट लेडीज (कोणतीही ग्रॅज्युएट) वय ३० पेक्षा जास्त–१, कार ड्रायव्हर. संपर्क– श्री. हॉस्पिटल इक्वीपमेंट, शहापूर–इचलकरंजी. फोन–९०२८५२१७१०, ८३८०००१७०२

**पाहिजे.** ऑफिस कामासाठी लेडीज पाहिजे. पत्ता– बालाजी मोटार ट्रेनिंग स्कूलजवळ, मेन रोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळाशेजारी, इचलकरंजी. संपर्क–८४८४९७७५७५

**लेथमशिन व** VMC मशिनसाठी प्रोडक्शन कामासाठी महिला/पुरूष कामगार पाहिजेत. पार्टटाईम/फूलटाईम. संपर्क–९८५०८६६४४२, ८८८८७४७१३७

**अनुभवी CNC** ऑपरेटर व प्रोग्रॅमर आणि अनुभवी टर्नर पाहिजेत. संपर्क–८८८८९९७७०५, ९२२५८०६१६४

**साफसफाई कामासाठी** पार्टटाईम/फूलटाईम लेडीज/जेंटस कामगार अर्जंट पाहिजेत. संपर्क– ओम एक्झीक्युटिव्ह, राधाकृष्ण चौक, इचलकरंजी. ७६६६२११२१८

**मॅनेजर पाहिजे.** सिमेंट पाईप कंपनीमध्ये शिकाऊ/अनुभवी मॅनेजर पाहिजे व वाळू डेपोमध्ये कामगार पाहिजेत. संपर्क–९८९०५१२०३८

**वॉचमन नेमणे आहे.** कल्पदिप हॉस्पिटल, वेताळ पेठ, इचलकरंजी. संपर्क–९८८१४४७८७७

**प्रोसेसमध्ये** जेंटस/लेडीज शिकाऊ/अनुभवी कामगार पाहिजेत. १२ तासासाठी संपर्क–८७८८४६०९०४

**शोरूममध्ये** रिशेप्शनिस्ट कामाचा अनुभव असलेल्या महिला, युवती सेल्सगर्ल कामासाठी पाहिजेत. मराठी, हिंदी भाषा येणे आवश्यक. संपर्क–८८८८३३३१९३, यड्राव फाटा, इचलकरंजी.

**पतसंस्थेमध्ये** कॉम्प्युटर ज्ञान असलेली लेडीज पाहिजे. संपर्क–९२७०५०४९६१, ८३२९४१३०४४

**ERP सॉफ्टवेअर** कन्सलटंट मिळेल. २० वर्षे टेक्स्टाईल, फौन्ड्री, मशिनशॉप, शैक्षणिक, बँकिंगमधील प्रतिथयश कंपन्यात काम केलेली व्यक्ती मिळेल. ९८२२९२२६३१

**श्री दत्त ओली भेल** कंपनीमध्ये कॉलिंगसाठी जेंटस/लेडीज पाहिजे. संपर्क–९६३७२९७७११

**श्री दत्त ओली भेल** शॉपीमध्ये जेंटस/लेडीज कामगार हवेत. दुपारी १ ते रात्री १०. पगार–६०००/–. संपर्क–९१७२२२७०१९

**श्री दत्त ओली भेल** कंपनीमध्ये प्रोडक्शनसाठी महिला पाहिजेत. (वेळ १० ते ६) पगार–६०००/–. संपर्क–९६३७२९७७११

**गारमेंटसाठी** कामगार पाहिजेत. दिवाणजी, अकौटंट हेल्पर, शिलाई, प्रेसिंग कामगार भरती, (लेडीज/जेंटस) शिकावू/अनुभवी. पगार–८००० ते १५,०००/–संपर्क–९४२२४१२६७५

**नामवंत फर्निचर शोरूममध्ये** हुशार व गरजू कायमस्वरूपी मुले पाहिजेत. आकर्षक पगार देवू. डेक्कन मिलजवळ, इचलकरंजी. संपर्क–८६०३१५१५१५

**हॉस्पिटल कामाकरीता** रिशेप्सनिस्ट, अनुभवी सिस्टर एक्सरे टेक्निशियन पाहिजेत. पत्ता– महाडिक आर्थोपेडिक हॉस्पिटल, नवीन महानगरपालिकेजवळ, इचलकरंजी. फोन–९२२६७८१७९७

**सॅमसंग मोबाईलसाठी** सेल्स एक्झीक्युटिव्ह नेमणे आहेत. नोकरीची उत्तम संधी, शिक्षण–१२ वी, किंवा ग्रॅज्युएट, इचलकरंजी, मलकापूर, बांबवडे, पेठवडगाव, हुपरी, कागल या ठिकाणी.संपर्क–८५५२९६१२१३, ८२७५६४४१६१

**बदली ड्रायव्हर मिळेल.** ८ ते ९ वर्षांचा अनुभवी. संपर्क–९९७५३०३०७६

**अर्जंट पाहिजेत.** शहापूर येथे CNC मशिन शॉपमध्ये खालील पदे त्वरीत भरणे आहे. १) हेल्पर– (पुरूष/महिला)–०२. २) ऑपरेटर (अनुभव आवश्यक)–०४. (डिप्लोमा/आयटीआय). ३) क्वॉलिटी इंजिनिअर–०१. (अनुभव किमान ३ वर्षे) संपर्क–८८५६९४६६९४, ९१४५७४५१६५

**डॉ. राजेश चिप्रे** सहयोग हॉस्पिटलमध्ये अनुभवी सिस्टर (नर्स) जीएनएम, एएनएम पाहिजेत. जिम्नॅशियम मैदानजवळ, इचलकरंजी. ७०२०४८८२१३

**इचलकरंजीसाठी** सिक्युरिटी गार्ड पाहिजेत. ड्युटी ८ तास, पेमेंट ९०००/–. संपर्क–७०३०५८३३३३, ८७८८८२९८७३

**अकौंटंट, स्टोअरकिपर,** परचेस एक्झीक्युटिव्ह, वेल्डर व फिटर पाहिजेत. संपर्क–गवळी फॅब्रिकेटर्स. ९०२८३६६२४१, ७०२०५०५९२३

**मेडिकलमध्ये** फार्मासिस्ट पाहिजे. फूलटाईम महासत्ता चौक, इचलकरंजी. संपर्क–७६२०६२७३२४

**सहारा वाईन शॉप** जयसिंगपूर येथे कामगार पाहिजे. कामाची वेळ–११.३० ते ९.३०. संपर्क–९४२२०४९२३६, ८८८८७२८८३३

**शहापूरमध्ये** क्लासेस व ॲकॅडमीसाठी D.ed, B.ed शिक्षिका पाहिजेत. संपर्क–९६२३१००४७७, ७६१९२३५२९१

**अजंठा युनिव्हर्सल** फॅब्रिक्स लिमिटेड तासवडे एमआयडीसी कराड यामध्ये कंपनी रोल वरती कायमस्वरूपी स्पिनिंग, विविंग व डाईंग (जिगर, सी पीबी, स्टेन्टर) या मशिनवर काम केलेले अनुभवी ऑपरेटर भरणे आहेत. उत्तम पगार व पीएफ, एसआयसी, कॅन्टीन सुविधा मिळेल. कराड व कराड भागातील लोकांना प्राधान्य. मो. ९७६३४९१५६४, ८४२१९१६४८४

**लेथ मशिनवर** फूलटाईम व पार्ट टाईमसाठी टर्नर पाहिजे. संपर्क–९३७०८४३३४५

**फार्मासिस्ट पाहिजे.** जेनेरिक मेडिकलमध्ये अनुभवी फार्मासिस्ट पाहिजे. संपर्क–७३५००१७५१५

**ज्वेलरी शॉपमध्ये** सेल्समन लेडीज/जेन्टस पाहिजे. संपर्क–७६२००८६६२२

**टर्नर, वेल्डर व हेल्पर** पाहिजेत. संपर्क– श्री सिध्देश्वर इंजिनिअरींग वर्क्स, इचलकरंजी. ९४२३८६००९१, ७३८७४५७४९०

**२ व्हीलर पार्किंगसाठी** कामगार पाहिजे. दिवसपाळी व रात्रपाळीसाठी. संपर्क–८२३७७४४४४४

**स्टोअर क्लार्क पाहिजे.** राजगोपाल बिडला टेक्स प्रा.लि., यड्राव येथे स्टोअरसाठी कॉम्प्युटरची माहिती असणारा स्टोअर क्लार्क पाहिजे. भेटण्याची वेळ– संध्या. ५ ते ७. पत्ता– १२/६९३, राजाराम रोड, इचलकरंजी. फोन–(०२३०) २४३३६३९

**स्क्रिन प्रिंटींगमध्ये** लेडीज कामगार पाहिजेत. संपर्क– एस.एम. प्रिंटींग, जवाहरनगर, विघ्नहर्ता गणेश मंदिरजवळ, इचलकरंजी. ८०८०६८१३१६

**लहान मुलांच्या कापड दुकानात** कामासाठी मुले पाहिजेत. संपर्क–९३२६०२३६५४, ७६२०१९३७४२

**मोबाईल दुकानात** सेल्समन पाहिजे. संपर्क–९५१८५४४०३३

**पाहिजेत.** १० वी/१२ वी आयटीआय, गॅस गिझर, सोलर, शेगडी, किचन चिमणी फिटींग व मेंटेनन्ससाठी, आकर्षक पगार, भत्ता व पेट्रोल. संपर्क–आशिर्वाद सेल्स अँड सर्व्हीसेस, वंदे मातरम मैदानजवळ, इचलकरंजी. फोन–०९४२३०४१०९८

**कॉम्प्युटर अकौटंट पाहिजे.** ऑफिस कामासाठी हुषार, लेडीज/जेन्टस. संपर्क–इचलकरंजी हार्डवेअर, मेनरोड, मो. ९५५२०१५८५८

**पाहिजेत.** शेअरमार्केट ऑफिसमध्ये ट्रेडिंगसाठी लेडीज पाहिजे. शेअरमार्केटची आवड. पगार+ कमिशन. संपर्क–९४२३२७३९२४

**८ तास कामासाठी** गरजू हेल्पर व ऑरगॉन वेल्डर पाहिजे. संपर्क–९८२२२७९३२४

**Required-**Sales Executive DME Exp. (0 to 2 years) Service Engineer-ITI. Electrical (0 to 2 years) Account Asst. B.Com (Exp. 2 to 3 years) Mob. 91-7720018406

**Required-**Junior Accountant, (Male/Female) for Sales/Purchase/data Entry/ Banking knowledge for Textile unit. Exp. 3-4 years. Location Parvati Industrial Estate- Cont. No.8087306433

**इचलकरंजी येथे** मध्यवर्ती पेट्रोल पंपासाठी कामगार पाहिजेत. ड्युटी ८ तास, दुपारी ३ ते रा. ११. कॉलेज करणाऱ्या मुलांना सुवर्णसंधी. फोन–८३२९०२८१४४

**मिलस्टोअर्स दुकानात** अनुभवी/शिकाऊ कामगार पाहिजे आहे. नारायण पेठ, इचलकरंजी. संपर्क–९७६२२६८९९३, ९४२२०४३७४३

**नामांकित कंपनीत** महिला व पुरूष कामगार पाहिजेत. (९ ते ७). संपर्क– नाईट कॉलेजशेजारी, इचलकरंजी. फोन–९५६१८३६२९६, ९११२७७७३७२

**गारमेंट कंपनीमध्ये** लेडीज हेल्पर, जेंटस हेल्पर QC पॅकिंग इन्चार्ज पाहिजेत. पत्ता– थोरात चौक व किसान चौक. संपर्क–८३२९०५४७२५

**होलसेल किराणा दुकानात** कामगार पाहिजेत. व बिलींगसाठी लेडीज/जेंटस पाहिजेत. संपर्क–संस्कार ट्रेडर्स–९८६०८०७५५८, ९९७५२३४६५१

**कंस्ट्रक्शन साईटवर** रहाणेसाठी जोडपे/वॉचमन पाहिजेत. रहाणेची सोय, कामाचे ठिकाण–हातकणंगले, रामलिंग रोड, वृंदावन पार्क. संपर्क–७७४४०४३२०७

**अनुभवी–रिशेप्सनिस्ट पाहिजे.** स्किन क्लिनिकमध्ये टेलि कम्युनिकेशन आणि कॉम्प्युटरचे अनुभव असलेली महिला आवश्यक आहे. राधाकृष्ण चौक, इचलकरंजी. फोन–८६६८७६३५२०

**अकौटंट पाहिजे.** फूलटाईम लेडीज पाहिजे. संपर्क–७७७५००१५१५. श्री. बिल्डींग, मेघदूत हॉटेलजवळ, इचलकरंजी.

**पाहिजेत. सिव्हील ड्राफ्टमन,** D.C.E., B.E. Civil इंजिनिअर, अर्किटेक्ट असिस्टंट अर्जासह भेटा. (सायं. ५ ते ७) संपर्क– सुहास अकिवाटे अॅन्ड असोसिएटस गिरनार अपार्टमेंट, जुन्या नगरपालिकेजवळ, इचलकरंजी. ०२३०–२४२४४११, मो. ७८७५३४६२०३

**पिझ्झा शॉपमध्ये** फूलटाईम/पार्ट टाईम कामासाठी शिकाऊ/अनुभवी मुले, मुली पाहिजेत. पत्ता– इचलकरंजी. फोन–९८२२५८०५६६, ८९९९५०८९३८

**त्वरीत पाहिजेत.** सिक्युरिटी गार्डस इचलकरंजी, खंजिरे, शहापूर, बोरगांव, चंदूर, शिवनाकवाडी, यड्राव, हातकणंगले, कोरोची येथील कंपन्याकरिता पीएफ व ईएसआयसी सोय. मो. ९९७०३९५१०६, ९९७५७६०८७७

**पाहिजे.** तारदाळ येथील एअरजेट लूम युनिटकरीता अनुभवी व हुशार दिवाणजी पाहिजे. संपर्क–९८२२५९७७५०, बायोडाटा व्हॉटसअप करणे.

**जयसिंगपूर येथील** टेक्स्टाईल प्रोसेसमधील तयार गुडस पाठवणे. पॅकिंग स्लिप, गेटपास तयार करणे या कामासाठी अनुभवी किंवा शिकाऊ स्टाफ भरणे आहे. जागा–४. बेसिक कॉम्प्युटर नॉलेज हवे. ७७६८००८६०१

**महिला कामगार पाहिजेत.** ड्रिलिंग काम करणेसाठी पंचगंगा साखर कारखानाजवळ, कोरोची. संपर्क–सागर–९५५२२२९३६२

**झेरॉक्स सेंटरमध्ये** लेडीज पाहिजे. संपर्क–८३०८४७११५५, इचलकरंजी.

**3 VMC-** ऑपरेटर जेंटस, लेथमशिनवर ४ लेडीज कामगार, २ जॉब इन्स्पेक्टर पाहिजेत. जवाहर नगर, बाळकृष्ण टॉकीजवळ, इचलकंजी. संपर्क–९९६०५१२०७५, ९५९५९९०११३

**अकौटींग कामाचा** अनुभव असणारी जेन्टस/लेडीज अकौंटंट पाहिजे. अर्जासह भेटा. पत्ता– श्री धनलक्ष्मी सायझर्स, गणेशनगर, गल्ली नं.६, इचलकरंजी.

**ऑफिसमध्ये** कॉम्प्युटर ऑपरेटर या पदासाठी पदवीधर महिला व पुरूष उमेदवार पाहिजेत. अनुभवींस प्राधान्य. संपर्क–८८८८८५४२२०

**नामांकित हॉस्पिटलमध्ये** वॉर्डबॉय व मावशी पाहिजेत. आकर्षक पगार. संपर्क–८४२१८७२८२१

**होलसेल किराणा दुकानामध्ये** कॉम्प्युटरवर बिलींगसाठी पूर्णवेळ २ जेंटस पाहिजेत. शिक्षण– किमान १२ वी विवाहीत प्राधान्य व गोडावूनसाठी १ दिवाणजी पाहिजे. संपर्क–९७६७०३०१२६

**पाहिजेत.** पार्वती इस्टेट जवळील टेक्स्टाईल मिलमध्ये १) नवीन सायझिंग व वार्पिंगमध्ये हेल्परसाठी १० पुरूष कामगार. २) कापड मेंडिंग व चेकिंग करण्यासाठी महिला व पुरूष कामगार–५, ईएसआयसी सुविधा उपलब्ध. संपर्क–७७२००१३००१

**कामगार पाहिजेत.** पेट्रोल पंपावर काम करणेसाठी जेंटस/लेडीज पाहिजेत. ८ तास शिफ्ट, आकर्षक पगार. ९४२२५१५०७६

**इंचर होम इंडिया,** पार्वती को–ऑप इंडस्ट्रियल इस्टेट लि., यड्राव येथे अकौटंट पाहिजे. संपर्क–९४२०४९३९०१

**पाहिजेत.** हातकणंगले–कोरोची टेकडीवर रघुजानकी हॉलजवळ २४ तास ड्युटी करणारे वॉचमेन पाहिजेत. फॅमिली असतील तर चालेल. रहाणेची, पाण्याची, लाईटची सोय आहे. संपर्क–९३७१२१९३५८

**सिक्युरीटी गार्ड पाहिजे.** १२ तास डे/नाईट शिफ्ट, आकर्षक पगार, इचलकरंजी व माणगाव. संपर्क–९०२१३१२५२४, ९३२६६३३४४५

**पॅकिंगसाठी** लेडीज पाहिजे. कामासाठी मुलगा, गारमेंटचे शिलाईचे काम घरी देवू. संपर्क–८२०८०२७९३४, ९४०४२६८२५४

**निमशिरगाव फाटा,** सांगली, कोल्हापूर रोडवर फॅक्टरीमध्ये २४ तास रहाणारे जोडपे पाहिजे. संपर्क–८४८४९८१३०१, ९४०३१३६६६९

**बिल्डींग मटेरियल सप्लायर** शोरूममध्ये जेंटस/लेडीज कामगार पाहिजेत. संपर्क–शहापूर–९५०४१११७७१

**बेकरी शॉपीमध्ये** कामासाठी मुले पाहिजेत. बालाजी बेकरी, एएससी कॉलेजजवळ. संपर्क–९९६००२८२८९, ७२७६१२७१११

**१० वी पास–नापास** मुले पाहिजेत. गरजूंनी भेटावे. संपर्क–७०५८१०२२६९

**CNC, VMC, HMC अनुभवी** व फ्रेश ऑपरेटर पाहिजेत. योग्य पगार दिला जाईल. स्वस्तिक ग्रुप, पार्वती इंडस्ट्रियल इस्टेट, यड्राव. ८६६८६१०८६०

**पाहिजेत.** लूट लो दुकानात कॅशियर पगार– १० ते १३ हजार, हेल्पर पगार–७५००. कामाची वेळ–११ ते ९. संपर्क–७३५०१५२०००

**१२ वी शिकलेली** व कॉम्प्युटरची माहिती असलेली लेडीज पाहिजे. संपर्क–वर्धमान हौसिंग सोसायटी, महावीर जैन मंदिरसमोर, रॉवका सदन, इचलकरंजी.

**गोडावून कामासाठी** हेल्पर पाहिजे. संपर्क– वर्धमान हौसिंग सोसायटी, महावीर जैन मंदिरसमोर, रॉवका सदन, इचलकरंजी.

**रंगाटे ग्लास कंपनीमध्ये** आयटीआय फिटर पाहिजेत. ४–५ वर्षे अनुभवी. पत्ता– रंगाटे ग्लास, योगाश्रम मंदिरसमोर, शहापूर–इचलकरंजी. फोन–७३८५७६१८४६

**रंगाटे ग्लास कंपनीमध्ये** इलेक्ट्रीशियन पाहिजेत. ४–५ वर्षे अनुभवी. पत्ता– योगाश्रम मंदिरसमोर, शहापूर–इचलकरंजी. फोन–७३८५७६१८४६

**रंगाटे ग्लास कंपनीमध्ये** पुरूष कामगार पाहिजेत. ४–५ वर्षे अनुभवी. पत्ता– योगाश्रम मंदिरसमोर, शहापूर–इचलकरंजी. फोन–७३८५७६१८४६

**प्लेन धोतीवर** (डॉबी नाही, नक्षी नाही) पॉवरलूम चालविणेस कामगार पाहिजे. संपर्क–७२४९२१४६२३, कलानगर, किसान चौक, इचलकरंजी.

**जेंटस कामगार पाहिजे.** वय ३२ पर्यंत, २ व्हीलर आवश्यक. संपर्क–९६३१३१६०३०

**कॉम्प्युटर ऑपरेटर** १२ वी ग्रॅज्युएट व अकौटंट पाहिजे. संपर्क–९५४५२२०१८९

**फिल्ड टेक्निशियन पाहिजे.** बांधकाम क्षेत्रामधील अनुभवी मुले पाहिजेत. १२ वी पास, कागल एमआयडीसी येथे. संपर्क–९५७९५५३२१६

**टेक्स्टाईल ऑफिसमध्ये** ऑफिसबॉय कम हेल्पर पाहिजे. अर्जासह समक्ष भेटा. किस्मत टेक्स्टाईल, शाहू पुतळ्याजवळ, आदर्श मंगल कार्यालयशेजारी, इचलकरंजी.

**हेल्पर कामगार पाहिजेत.** वर्कशॉपमध्ये कामासाठी संपर्क–९६५७६८४०१४, शहापूर.

**परमिटरूम बारसाठी** अनुभवी मॅनेजर वेटर व साफसफाईवाले पाहिजेत. समक्ष भेटा. मो. ९७६७४९९५४०, इचलकरंजी.

**रंगाच्या दुकानात** अनुभवी व शिकाऊ कामगार पाहिजे. श्री बालाजी पेंटस्, कॉंग्रेस कमिटीजवळ, इचलकरंजी. मो. ८८८८०४४३३०.

**पाहिजेत–** हॉस्पिटलमध्ये कामासाठी रिशेप्सनिस्ट, २ मावशी, २ जीएनएम नर्सिंग स्टाफ हवा आहे. बडबडे हॉस्पिटल, इचलकरंजी. मो. ८२६२९२७६१२.

**पतसंस्थेमध्ये मार्केटिंग** आणि वसुलीसाठी फिक्स पगारसह कमिशन बेसिसवर कांही जागा भरायच्या आहेत. अनुभवी तसेच बिगर अनुभवी उमेदवारांनी त्वरीत संपर्क करावा. ९३५६१६८६७२

**४०७** गाडीवर ड्रायव्हर+हमाल पाहिजे. जयकिसान पशुखाद्य. मो. ९४२२०४४२९२, डॉ. बडबडे हॉस्पिटलजवळ.

**लेथ मशिन वर्कशॉपमध्ये** कामासाठी वेल्डर, हेल्पर आणि दिवाणजी कामगार पाहिजेत. संपर्क – ९८२२४२०४९७, ९९२२०९९३४३.

**ग्रे पेढीवर** काम करणेसाठी जेन्टस पाहिजे. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. संपर्क–विष्णू फॅब्रिक्स, संगमनगर. मो. ७७९८८५८३९१

**झोले बाजार कबनूरमध्ये** नोकरीची संधी! अनुभवी सेल्स स्टाफ आणि मॅनेजर हवेत. संपर्क–९५५२१२२३४५, ८६८६१२२३४५

**टर्नर, वेल्डर,** शिकाऊ कामगार पाहिजेत. कुबेर वेल्डींग आणि इंजिनिअरींग वर्क्स, गणेशनगर, गल्ली नं. ८, इचल. संपर्क–८४८५८११४२४

**होलसेल औषध दुकानात** १० वी, १२ वी झालेले मुले/मुली व डिलेव्हरीसाठी मुले पाहिजेत. सुशिल फार्मा LLP नाईट कॉलेजजवळ, इचल. ९०९६२६१२७२

## बोअरवेल विषयक

**चौगुले बोअरवेल–** ४३ वर्षाची परंपरा आमचेकडे एक दिवसात ४।।। व ६।। इंची बोअरवेल मारून सबमर्सिबल पंप बसवून मिळेल. संपर्क–डॉ. संजय चौगुले, जुन्या स्टॅन्डसमोर, स्टेशन रोड, इचलकरंजी. मो. ९३२५१४६८८४

**राज बोअरवेल–** आमचेकडे ४।।। इंची व ६।। इंची बोअरवेल तसेच आर्थिंगची कामे माफक दरात करून मिळेल. ९६०४०३५६८७, ९४२०३५३६८७

**चौगुले बोअरवेल्स–** जयसिंगपूर आमचेकडे घरासाठी ४।।। इंची व शेतीसाठी ६।। इंची बोअर मारून मिळेल. संपर्क–९९६०१०५४२१

## * भाड्याने देणे/घेणे *

**भाड्याने देणे आहे.** श्रीराम चौक, गल्ली नं. २, संगमनगरमध्ये १ रूम किचन अटॅच संडास बाथरूम, २४ तास पाणी, सर्व सोयींनी युक्त भाड्याने देणे आहे. तसेच १०X१० चा २ गाळे व २०X३० आरसीसी शेड देणे आहे. संपर्क–९०२८४३३४१५, ९९६०१९५२०४

**शेड भाड्याने देणे.** गोडाऊन, गारमेंट सीएनसी किंवा कोणत्याही उद्योगासाठी संपर्क–७०५८८२३६२९, शहापूर.

**आरसीसी गोडावून** भाड्याने देणे आहे. ३०'X ४०'–१२०० स्के. फूट खंजिरे मळा, दत्तमंदिरजवळ, संपर्क–९१३०५३३९५३, ९१३०५९३९५३

**दुकानगाळा भाड्याने देणे.** रोडटच शाहू पुतळा, कोल्हापूर रोड, सोन्या मारूती मंदिरसमोर, इचलकरंजी. ८८५५८४६१६२, ९३७२४५८७१७

**१०X२५ फुट दुकान गाळा** पोट माळा, संडास, बाथरूमसह भाड्याने देणे आहे. संपर्क– चैतन्य आयुर्वेदीक दवाखाना, शहापूर रोड, विक्रमनगर इचलकरंजी. मो. ९४२००१०१५०, ९१७५१०६८२९.

**ऑफिस, गोडावून,** गारमेंट, क्लासकरिता २०० ते ३०० स्के. फूट गाळा भाड्याने देणे. खंजिरे मळा, सरस्वती मार्केटजवळ. संपर्क–७४९८५२२८६५

**१ बीएचके व गोडावून** (१००० स्के. फूट) भाड्याने किंवा गहाणवट देणे. नारायण मळा रोड, रूगे मळा, संपर्क–९७६२३७२६२५

**भाड्याने देणे.** शोरूम/कॉर्पोरेट ऑफिससाठी उपयुक्त गाळे १२X२० व १२X३० आणि २ बीएचके फूल फर्निश्ड फ्लॅट स्टेशन रोड, अमोल बेकरीजवळ, कोरोची. फोन–९९२१५२४३४६ ८६०००९११२४

**२ बीएचके** सर्व सोयीनियुक्त बंगलो पहिला मजला भाड्याने देणे. (शाकाहारींसाठी) यशोलक्ष्मी मंगल कार्यालयाजवळ, इचलकरंजी. ९८२२८६०२३६, ७८४१८८०००९

**गॅलेक्सी हाईटस्** कमर्शियल स्पेस रोडटच भाड्याने देणे. २०० ते ९०० चौ. फूट चांदणी चौकाजवळ, इचलकरंजी. संपर्क–९०२८७३१६१३, ८९९९८१५८५०

**एएससी कॉलेजसमोरील** गल्लीमध्ये गाळा भाड्याने देणे आहे. संपर्क–९१३०००२७६६

**३५० स्के. फूट गाळा** ऑफिससाठी भाड्याने देणे आहे. पत्ता– टायटन शोरूम, साखरपे हॉस्पिटलजवळ, इचलकरंजी. ८६५७४७२८०४, ९८२१६८११००

**भाड्याने देणे.** १५०० स्के. फूट रोडटच १९ एचपी लाईटसह CNC, VMC गारमेंट गोडाऊनसाठी भाड्याने देणे. डी–मार्टजवळ. ७०५७५५२६१९, ९८२२१११२९०

**बेसमेंट भाड्याने देणे.** २००० चौ.फूट शम्स हाईटस् बागवान पेट्रोल पंपशेजारी, फर्स्ट क्राय शोरूमच्या बेसमेंटला सांगली रोड, इचलकरंजी. ९८२३०३३८९०

**दोन रूम तीन रूम** भाड्याने देणे. पॉश कॉलनीत शुद्ध शाकाहारी लहान कुटूंब, अयोध्या कॉलनी, पंचवटी पाठीमागे. ७५८८२६३२०१

**दुकानगाळा भाड्याने देणे.** सर्व सोयीनियुक्त १४ x २० उंची १४ फूट पोटमाळासह सांगली रोड, अभय डेअरीसमोर, इचलकरंजी. श्री महेश रणदिवे–९३७३०३०१५४, ९०९६७११०६९

**२ रूम व ३ रूमचे** आरसीसी घर सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. (फक्त शाकाहारींसाठी) एएससी कॉलेजजवळ, इचलकरंजी. संपर्क–७६२००८६६२२

**गांधी कॅम्पमध्ये** ४०० स्के. फूट गाळा ग्राऊंड फ्लोअर भाड्याने देणे. संपर्क–७८४१९४०८७०, इचलकरंजी.

**२४ मागासहीत** ४६ मागाची शेड सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहेत. संपर्क–९१३०००२७६६, इचलकरंजी.

**भाड्याने देणे आहे.** मेन रोडलगत दुकानगाळा किंवा राहण्यासाठी सर्व सोयीनियुक्त ५५० स्के. फूट डेक्कन प्रोसेससमोर, गणेशनगर, संपर्क–९८२२२३८९६९

**१५X१२ स्के. फूट** आरसीसी दुकानगाळा भाड्याने देणे आहे. पत्ता– श्रीपादनगर, इचलकरंजी. मो. ८३०८२०९८८३

**सहा हजार स्के. फूट** तळघर भाड्याने देणे. थ्रीफेज (Three Face) लाईट आहे. पत्ता– महासत्ता चौक, देशपांडे हॉस्पिटलमागे, इचलकरंजी. ९४०४१३८२९२

**भाड्याने देणे.** पेढी, ऑफिस, गोडाऊनसाठी उपयुक्त ५०X४५ शेड, १२X१५ ऑफिससह अटॅच बाथरूम/टॉयलेटसह मेन रोडटच, स्टेशन रोड, संजय फौंड्रीसमोर, इचलकरंजी. ९४२१८८८०००

**गाळा भाड्याने देणे** आहे– संपर्क–९८२३३७४४७७, कॉंग्रेस कमिटी मागे, कुंभार हॉस्पिटलला लागून, इचलकरंजी.

**साखरपे हॉस्पिटलजवळ,** सातपुते गल्लीमध्ये १०X२० चा गाळा पिढी, ऑफिस, गोडावूनसाठी भाड्याने देणे आहे. ८१४९९१३०८८

**स्टेशन रोड,** दत्त मंदिरसमोर ३०X३० चे शेड भाड्याने देणे आहे. संपर्क–८१४९९१३०८८

**सर्व सोयीनियुक्त** २ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. पत्ता– सोलगे मळा, उदगावे हायस्कूलजवळ, सांगली नाका, संपर्क–९८२२६२१३०२

**गोडाऊन भाड्याने देणे.** १५७० स्के. फूट पोटमाळा, ऑफिस, संडास बाथरूमसह सर्व सोयीनियुक्त, तीनबत्ती चौक, इचलकरंजी. फोन–८६६८५१०९९१

**शेड भाड्याने देणे–** ३६X३८ पूर्ण आरसीसी गारमेंट, लेथमशिन, वायडिंग मशिन इ. साठी संतमळा, लिंबू चौक, इचलकरंजी. फोन–९६०७२१२१४५

## शैक्षणिक विषयक

**डिप्लोमा इन फॅशन** डिझायनिंग १ वर्ष, ३ व ६ महिने ड्रेस, ब्लाऊज मेकिंग कोर्स ज्योती फॅशन डिझायनिंग इन्स्टीट्युट, इचलकरंजी. मो. ८३२९३९२९२३

**शेअर मार्केट** ट्रेडींगचे प्रशिक्षण आणि गुंतवणूकीचे विस्तृत ज्ञान मिळवा. तेही माफक फीमध्ये 'कॅपिटल अकॅडमी' ए.एस.सी. कॉलेजजवळ, इचलकरंजी. मो. ७०२०६२३४२१.

**विद्यार्थी, गृहिणी, बेरोजगार** यांच्यासाठी मोबाईल वापरा, पैसे कमवा (महिना ६०००/– पर्यंत.) तेही सोशल मिडीया कामामधून बॅच: २८ फेब्रुवारी आणि १ मार्च २०२६. अधिक माहितीसाठी ठिकाण– श्री. कॉम्प्युटर एज्युकेशन संपर्क–९५११८७६५८३, ९३२५८१११०४

## व्यवसाय विषयक

**कोणताही व्हेज/नॉनव्हेज** फूड बिझनेस करावयाच्या विचारात असाल तर जागा, भांडवल, पूर्ण सेटअप आम्ही देवू. संपर्क–७०२०१७८७५५

**घरातून आपल्या वेळेत** ऑनलाईन काम करून व्यवसाय सुरू करा. कमवा २५ ते ३० हजार महिना. संपर्क–पुजा–९४०५८१४८९७

**रिकाम्या वेळेत** घरातून नवीन व्यवसाय सुरू करा व एक्स्ट्रा इन्कम मिळवा. ऑनलाईन किंवा ऑफलाईन मार्गदर्शन. सुरेखा मॅडम–फोन–९५५२००८१५६

**B 2 B** झेरॉक्स पेपर व जिवनसंजीवनी–रेयांश अमृत ज्युस एकदम होलसेल दरात मिळेल. फोन–९६०४८२४३६५

## आरोग्य विषयक

**रूग्णांची घरी येऊन सेवा** केली जाईल. संपर्क–९८८१३५२२२०, इचलकरंजी.

**मुळव्याध, भगेंद्र,** फिशर वेळीच बरा न झाल्यास गुदाशयाची कॅन्सर होऊ शकतो, खात्रीचा आयुर्वेदिक उपचार उपलब्ध. आरोग्यम्–७५१७३११६००

**सोरायसीस** तसेच इतर सर्व त्वचाविकार फंगल, खाज, वांगसाठी खात्रीचा शुद्ध आयुर्वेदिक उपचार. आरोग्यम्–७५१७३११६००

**पॅरालिसीस अर्धांगवायु,** लकवा, हस्तकंपासाठी अत्यंत गुणकारी मासिक ३७५० रू. चा एक डोस विनामुल्य आरोग्यम्, हत्ती चौक. ७५१७३१८०००

**पोटाच्या सर्व तक्रारी** पित्ताशयातील खडा खात्रीचा शुध्द आयुर्वेदिक उपचार उपलब्ध. आरोग्यम्, हत्ती चौक. ७५१७३१८०००, ७५१७३११६००

**मान, पाठ,** कंबर, गुडघे सर्व सांधेदुखीसाठी अत्यंत प्रभावी आयुर्वेदिक उपचार उपलब्ध. आरोग्यम्, हत्ती चौक. ७५१७३१८०००

**मानसिक आजार–** व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या, स्किझोफ्रेनिया, बायपोलर, मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ.सी.डी. मंत्रचाळेपणा. इ. मानसिक आजारसाठी दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री. इ. व्यसनमुक्तीसाठी शिघ्रपतन, नपुंसकता, विर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी व वृध्द लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रूषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमिट करण्याची सोय. निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज (सांगली) संपर्क–८०८३६०८०८३, ९९२२६४६५६६

## कर्जविषयक

**बिझनेस, होमलोन,** लोन अगेन्स प्रॉपर्टी टेकओव्हर सर्व प्रकारचे मॉर्गेज, सिबील कमी असेल तरी करू. ८४०८८३०७५२

## वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी–विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे–घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

# सांगली मनपाच्या नियोजन समिती बैठकीत ७५१ कोटीच्या प्रारूप आराखड्यास मान्यता

सांगली, ता.११(प्रतिनिधी)–

**सांगली जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सन २०२६–२७ साठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण), अनुसूचित जाती घटक कार्यक्रम तसेच आदिवासी घटक कार्यक्रम मिळून २०६ कोटी रुपयांच्या अतिरीक्त मागणीसह एकूण ७५१ कोटी ८ लाख रुपयांच्या प्रारूप आराखड्यास मान्यता देण्यात आली. हा आराखडा मान्यतेसाठी दि. १२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत सादर करण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.**

जिल्हा नियोजन समिती सभागृहात खासदार धैर्यशील माने, आमदार अरुण लाड, सदाभाऊ खोत, इद्रिस नायकवडी, डॉ. सुरेश खाडे, डॉ. विश्वजीत कदम, गोपीचंद पडळकर, सत्यजीत देशमुख, सुहास बाबर, जिल्हाधिकारी अशोक काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, महापालिका आयुक्त सत्यम गांधी, उपायुक्त पुणे संजय मरकळे, जिल्हा नियोजन अधिकारी अशोक पाटील, पालकमंत्री यांचे विशेष कार्यकारी अधिकारी बाळासाहेब यादव यांच्यासह जिल्हास्तरीय यंत्रणांच्या प्रमुख उपस्थितांची बैठक झाली. त्यानंतर मंत्री पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, सांगली जिल्ह्यासाठी सन २०२६–२७ प्रारूप आराखड्यामध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) साठी ६६३ कोटी ८० लाख, अनुसूचित जाती घटक कार्यक्रमासाठी ८६ कोटी व आदिवासी घटक कार्यक्रमसाठी १ कोटी २८ लाख व वाढीव मागणी २०६ कोटी अशी एकूण ७५१ कोटी ८ लाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.सन २०२५–२६ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनांकरिता ५४५ कोटी रुपये, अनुसूचित जाती घटक कार्यक्रम करिता ८६ कोटी व आदिवासी घटक कार्यक्रम करिता १ कोटी २८ लाख रुपये असा एकूण ६३२ कोटी, २८ कोटी नियतव्यय मंजूर होता. जिल्हा वार्षिक योजनेचा १०० टक्के निधी प्राप्त झाला. सर्व यंत्रणांनी परिपूर्ण निधी मागणी प्रस्ताव तात्काळ द्यावेत व नियोजन विभागाने ही निधी वितरण त्वरित करून निधी खर्च वेळेत होईल, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या निधीतून दर्जेदार व गुणवत्तापूर्ण कामे करावीत. जिल्ह्यातील विकासकामे गतीने पूर्ण करुन सर्वसामान्यांचे प्रश्न प्राधान्याने मार्गी लावावे. तसेच, विकासकामांमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई करू नये. लोकप्रतिनिधींच्या सूचना प्राधान्याने विचारात घेऊन आवश्यक कार्यवाही त्वरीत करण्यास सांगितले आहे.

## ट्रक व मोटार सायकलच्या धडकेत एकजण जखमी

गारगोटी ता. ११(प्रतिनिधी)–

**गारगोटी ते पाटगाव रस्त्यावर शेणगाव गावाजवळ बुधवारी ट्रक व मोटारसायकलची जोरदार धडक होऊन झालेल्या अपघातात मोटार सायकलस्वार गंभीर जखमी झाला. या अपघाताची नोंद भुदरगड पोलीस ठाण्यात झाली आहे.**

बुधवार दुपारच्या सुमारास पाटगाव कडून गारगोटी कडे येणारा ट्रक (क्रमांक एमएच १२ एलटी ७४५५) व मोटारसायकल (क्रमांक एम एच ०९ जीई ७४४९ )यांची जोरदार धडक झाली या धडकेत मोटार सायकल स्वार गंभीर जखमी झाला आहे.अपघातानंतर ट्रक चालक फरार झाला आहे.अमर तानाजी वळीवडे (वय ३५) असे या मोटार सायकलस्वाराचे नाव असल्याचे व ते तांबाळे साखर कारखान्यात नोकरीस असल्याचे समजते.

# निपाणीतील चार्टे मार्केट परिसरात गटारीचे पाणी रस्त्यावर

## दुर्गंधीमुळे नागरीक त्रस्त:कायमस्वरूपी उपाय करण्याची मागणी

निपाणी,ता.११.(प्रतिनिधी)–

**येथील चार्टे मार्केट परिसरात गटारीचे पाणी रस्त्यावर आल्याने दुर्गंधी पसरल्याने नागरीकांतून संताप व्यक्त करण्यात येत आहे.**

जुना मोटर स्टॅन्ड परिसरातील चार्टे मार्केटजवळ गटारीचे पाणी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर पसरल्याने गटारीतील कचरा आणि घाण रस्त्यावर पसरली होती. त्यामुळे या परिसरात दुर्गंधी पसरली होती. या ठिकाणी वरच्या बाजूने येणाऱ्या गटारीचे मोठ्या प्रमाणात पाणी येते. नेहमी दुर्गंधीयुक्त येणारे पाणी या ठिकाणी गटारीत सोडले जाते.

पण मोठ्या प्रमाणात या ठिकाणी पाणी येत असल्याने गटारीच्या बाहेर पाणी पडून रस्त्यावर



**निपाणी:येथील चार्टे मार्केट परिसरात गटारी पाणी व कचरा अस विखुरला होता, त्यामुळे दुर्गंधी पसरली होती.**

विखूरले जाते. या पाण्यातून दुर्गंधी आणि कचरा व घाण वाहून येवून रस्त्यावर साठत असल्याने या दुर्गंधीचा वास या परिसरात येत असल्याने नागरीकांना त्रास होत असतो.

या ठिकाणी वरील बाजूने मटण मार्केट, मच्छी मार्केटसह, चिकन दुकान व इतर व्यावसायीकांचेही पाणी येत असते. त्यामुळे पाण्याला मोठी दुर्गंधी असते. त्यातच विविध घाणीच्या वस्तू पडलेल्या असतात. त्यामुळे या ठिकाणी दुर्गंधी निर्माण होते.

तसेच त्याच्या पुढील बाजूला मुतारी आहे. त्यांचाही घाण वास येत असल्याने या परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी वाढत असून येथील व्यावसायीक व नागरीकही त्रस्थ झाले आहेत. त्यामुळे ही समस्या कायमची निकालात न काढल्यास आंदोलन करण्याचाही इशारा येथील नागरीकांनी दिला आहे.



# कोल्हापुरात पं. उपाध्याय यांना अभिवादन

कोल्हापूर ता.११ (प्रतिनिधी)–

**भाजपा जिल्हा कार्यालयात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या ११० व्या पुण्यतिथी निमित्य अभिवादन करण्यात आले. कोल्हापूर जिल्हा सह–पालकमंत्री माधुरीताई मिसाळ यांच्या हस्ते पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.**

याप्रसंगी बोलताना कोल्हापूर जिल्हा सह–पालकमंत्री माधुरीताई मिसाळ म्हणाल्या, अखिल भारतीय जनसंघ या राष्ट्रीय राजकीय पक्षाचे अध्यक्ष असताना सुद्धा टोकाच्या साध्या पद्धतीने राहणाऱ्या दीनदयाळजींना पंडित ही पदवी लोकांनी स्वतः हून प्रदान केली.

याप्रसंगी कोल्हापूर जिल्हा सह–पालकमंत्री माधुरीताई मिसाळ, आमदार अमल महाडिक, प्रदेश सचिव महेश जाधव, जिल्हाध्यक्ष विजय जाधव, ग्रामीण जिल्हाध्यक्ष नाथाजी पाटील, महापौर रूपाराणी निकम, मुरलीधर जाधव, राहुल चिकोडे, विराज चिखलीकर, धनश्री तोडकर, हेमंत आराध्ये, अशोक देसाई यांच्यासह नूतन नगरसेवक, नगरसेविका व भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोरे–कवटगीमठ–पाटील यांचा चिदानंद कोरे कारखान्यातर्फे सत्कार

चिक्कोडी,ता.११.(प्रतिनिधी)–

**केएलई संस्थेच्या संचालक मंडळासाठी जानेवारी महिन्यात झालेल्या निवडणुकीत अमित कोरे व महांतेश कवटगीमठ यांची बिनविरोध निवड झाली आहे.तसेच कर्नाटक राज्य सहकारी साखर कारखाना महासंघ बंगळूरच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत संदीप पाटील यांची बिनविरोध निवड होऊन त्यांची महासंघाच्या उपाध्यक्षपदीही नियुक्ती करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर चिदानंद बसप्रभू कोरे सहकारी साखर कारखान्यात त्यांचा सत्कार करण्यात आला.कारखान्याच्या**



**नणदी: येथे बिनविरोध निवड झालेले अमित कोरे, महांतेश कवटगीमठ, संदीप पाटील यांचा सत्कार प्रसंगी अध्यक्ष मल्लिकार्जुन कोरे व संचालक मंडळ.**

**व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत कारखान्याचे अध्यक्ष मल्लिकार्जुन कोरे यांच्या हस्ते निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी संचालक मंडळ सदस्य व सर्व पदाधिकारी उपस्थित होते.**

यावेळी अध्यक्ष मल्लिकार्जुन कोरे म्हणाले की, पद्मश्री डॉ. प्रभाकर कोरे यांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वाखाली केएलई संस्था देश–विदेशात नाव लौकिक मिळवून प्रगती पथावर पोहचली आहे.अशा संस्थेच्या व्यवस्थापन मंडळावर सदस्यांनी बिनविरोध निवड करून दिली, ही अभिमानास्पद बाब असून कारखान्याचे संचालक अमित कोरे व महांतेश कवटगीमठ यांची पुनर्निवड संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रगतीसाठी निश्चितच मोलाची असणार आहे.संदीप पाटील यांची कर्नाटक राज्य सहकारी साखर कारखान्यांच्या महासंघाच्या उपाध्यक्षपदी झालेली निवड ही सहकार क्षेत्रासाठी अभिमानास्पद आहे.

यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष तात्यासाहेब काटे, संचालक अजित देसाई, भरतेश बनवणे, परसगौडा पाटील, नंदकुमार नाशिपुडी, महावीर मिरजी, चेतन पाटील, मल्लप्पा मैशाळे, महावीर कात्राळे, अण्णासाहेब इंगळे, भीमगौडा पाटील, व्यवस्थापकीय संचालक डॉ.आर.बी. खांडगावे यांच्यासह, सर्व विभागप्रमुख व कर्मचारी आदी उपस्थित होते.



# श्री स्वामी समर्थ दरबार लक्षचंडी याग करिता रोटरी क्लबतर्फे एक लाख ५१ हजाराची मदत

जयसिंगपूर ता ११(प्रतिनिधी)-

**श्री स्वामी समर्थ दरबार जयसिंगपूर कडून पश्चिम महाराष्ट्रात प्रथमच भव्य लक्षचंडी याग दिनांक १९, २० व २१ रोजी १५१ हवन कुंड आयोजित करण्यात आले असून दहा हजार पाठांचे हवन होणार आहे.**

तसेच रविवार दिनांक २२ फेब्रुवारी रोजी श्री अन्नपूर्णा देवी, श्री लक्ष्मीनारायण, श्री राधाकृष्ण मूर्तीचा प्रतिष्ठापना सोहळा संत महंतांच्या सानिध्यात संपन्न होणार आहे. याकरिता लाखो भाविक या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. त्याकरिता खूप मोठा खर्च असल्याने रोटरी क्लब ऑफ ग्रीन सिटी जयसिंगपूरच्या सदस्यांनी वैयक्तिक देणगीतून १लाख ५१ हजाराची देणगी श्री स्वामी समर्थ दरबार जयसिंगपूरचे कार्यवाह श्री. दबडे अण्णा यांच्याकडे सुपूर्द केली. सदर रकमेसाठी रोटरी क्लब ऑफ ग्रीन सिटी जयसिंगपूरचे सदस्य नगरसेवक प्रवीण बलदवा, मेघराज बलदवा, विनोद घोडावत, हर्षवर्धन फडणीस, श्रीराम बोंडगे, दादासो चौगुले , पांडुरंग कांबळे, इंद्रनील चौगुले, महेश वाणी, संतोष मधाळे, शिरीष भांडारे, अजितकुमार कोरे, अन्सार चौगुले, अभिजीत बरडीया व सुदर्शन कदम यांनी योगदान दिले.

# सामुदायिक कवायत स्पर्धेमध्ये जरग विद्यामंदिर, छत्रपती राजाराम महाराज उर्दू मराठी स्कूल अव्वल

कोल्हापूर ता.११ (प्रतिनिधी)–

**महापालिकेच्या प्राथमिक शिक्षण समिती विभागामार्फत महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्यां विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबिवण्यात येत असतात. दरवर्षी प्रमाणे सन २०२५–२६ मध्ये आंतरशालेय क्रीडा स्पर्धा अंतर्गत महात्मा गांधी मैदान येथे सामुदायिक कवायत स्पर्धा घेण्यात आल्या.या स्पर्धेत जरग विद्या मंदिर,छ.राजाराम महाराज उर्दू मराठी स्कूलने घवघवीत यश मिळविले.**

या स्पर्ध्येत महापालिकेच्या १० शाळांनी मुले गट, मुली गट, मुले व मुली एकत्र गट सहभाग घेऊन सर्वांगसुंदर व्यायाम प्रकार उभे, बैठे प्रकार, डंबेल्स, ध्वज, गुच्छ, काठी, रिंग, लेझीम, टिपरी (बर्ची), झांज अशा प्रकाराचे कवायत सादरिकरण करण्यात आले. या स्पर्ध्येचे उद्घाटन प्रशासनाधिकारी डी.सी. कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले. तर स्पर्ध्येचा निकाल शैक्षणिक पर्यवेक्षक विजय माळी, चंद्रकांत कुंभार यांनी घोषित केला. या स्पर्धेचे परीक्षण क्रीडा शिक्षक विश्वास चोपडे, महेश सूर्यवंशी, सौ.सीमा सूर्यवंशी यांनी केले. स्पर्धा नियोजन शारीरिक शिक्षण निरीक्षक सचिन पांडव, सेक्रेटरी विठ्ठल देवणे, मोहिद्दीन कमते, संदिप जाधव, प्रताप पाटील, दिगंबर कदम, शब्बीर नदाफ, चरणसिंग रजपूत, मनोज शिंदे यांनी केले. या स्पर्ध्येत विजयी संघांना आकर्षक ट्रॉफी व रोख रक्कम बक्षीस देण्यात आले

# कुंभोज येथील सरस्वती साधना केंद्र व ग्रंथालय प्राचीन संस्कृती रक्षणासाठी महत्वपूर्ण : ललित गांधी

कोल्हापूर ता.११ (प्रतिनिधी)–

**कुंभोज येथे उभारण्यात आलेले सरस्वती साधना केंद्र व याठिकाणी उभारलेले दुर्मिळ ग्रंथ संपदेचे ग्रंथालय हे प्राचीन भारतीय संस्कृती जपण्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण उपक्रम असल्याचे प्रतिपादन जैन विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.**

सरस्वती साधना केंद्राचे उद्घाटक व मुख्य मार्गदर्शक या नात्याने बोलताना ललित गांधी यांनी सदर साधना केंद्रामध्ये भारतातील अति प्राचीन अशा ब्राम्ही, शारदा, कुटील, देवनागरी, मल्याळी, कन्नड अशा लिपीमध्ये दुर्मिळ ग्रंथांच्या पुनर्लेखनासाठी राज्य सरकारतर्फे विशेष सहकार्य केले जाईल असे सांगितले.आचार्य रैवतसुरीजी, साध्वी शीलवतीश्रीजी, साध्वीजी प्रज्ञाभारती सरस्वतीश्रीजी, साध्वीजी उदयप्रभाश्रीजी आदि अनेक साधु–साध्वींच्या प्रमुख उपस्थितीत आनंद स्मृति ट्रस्ट चे अध्यक्ष राजेंद्र बोहरा (पूणे), अरूण ललवाणी, नरेंद्र जैन, मोहनलाल ओसवाल, अभय गांधी,



सुभाष शहा, चंपकभाई शहा, अमृतभाई शहा, माणकचंद लालवाणी आदि विविध समाज अग्रणींसह उपजिल्हाधिकारी जीनल पालरेचा यांच्यासह देशभरातुन आलेले भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

साध्वीजी प्रज्ञाभारती सरस्वतीश्रीजी यांच्या विशेष प्रेरणा व मार्गदर्शनाने स्थापित या साधना केंद्रामध्ये साध्वीजी सरस्वतीश्रीजी यांनी स्वतः आठ लिपीमध्ये लिहीलेली दुर्मिळ ग्रंथ संपदा यानिमित्ताने प्रदर्शित करण्यात आली आहे.

साधना केंद्रामध्ये नवनिर्मित सरस्वती मंदीरामध्ये सरस्वतीच्या प्राचीन ग्रंथात वर्णवलेल्या नऊ वेगवेगळ्या मुद्रांमधील सरस्वती मुर्तींची प्रतिष्ठापना शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी संपन्न होणार आहे.

पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवासाठी देशाच्या विविध भागातुन मान्यगण दाखल झाले आहेत.

## नांदेडात भूकंपाचे धक्के

नांदेड,ता.११–

जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात भूकंपाचे सौम्य धक्के बसले आहेत. दुपारी ३ वाजून २५ मिनिटांनी हे भूकंपाचे सौम्य धक्के बसले आहेत. भूगर्भातून आवाज येऊन जमीन हादरली असल्याची माहिती ग्रामस्थांनी प्रशासनाला दिली होती. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. आहे. मुखेड तालुक्यातील हिब्बट, कोळगाव, धामणगाव, मोटरगा, धनज व जामखेड या गावांमध्ये भूकंपाचे धक्के बसले आहेत. या धक्क्यामुळे कुठलीही जीवित व वित्त हानी झाली नाही मुखेड तालुक्यातील हिब्बट, धनज व जामखेड या गावांमधून भूगर्भातून आवाज आला.

## आजच्या संपात सहभागी होण्याचे आवाहन

निपाणी,ता.११.(प्रतिनिधी)–

लेबर कोड बिल येवू नये यासाठी आज गुरूवार दि.१२ रोजी एक दिवसीय संप पुकारला आहे.

तरी सर्व जनतेने सहभागी व्हावे व सहकार्य करावे असे आवाहन निपाणी तालुका सिटू संलग्न सर्व कर्मचारी संघटेने केले आहे.

कॉ.दिलीप वारके, यांनी निपाणी तालुका बिडी कर्मचारी युनियन, पंचायत कर्मचारी युनियन, अंगणवाडी सेविका युनियन, अक्षर दासो युनियन, बांधकाम कामगार संघटना केंद्र व राज्य सरकार विरोधी निदर्शने करणार आहेत.

# महालक्ष्मी यात्रेत एक लाख भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

निपाणी,ता.११.(प्रतिनिधी)–

**येथील ग्रामदैवत श्री.महालक्ष्मी देवी त्रैवार्षिक यात्रेची महाप्रसाद वाटपाने सांगता झाली. सुमारे एक लाख भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.याप्रसंगी माजी खासदार अण्णासाहेब जोल्ले, आमदार शशिकला जोल्ले, मंदिर कमिटीचे अध्यक्ष आशिषभाई शाह, श्रीमंत दादाराजे निपाणकर यांच्या हस्ते महाप्रसाद वाटप शुभारंभ करण्यात आला.**

बुधवारी शेवटच्या दिवशी मंदिरात महालक्ष्मी देवीची आकर्षक फुलांनी पूजा बांधली होती. दिवसभर दर्शनासाठी भाविकांची गर्दी दिसून येत होती. ३ पासून विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. रोजच्या विधी आणि दर्शनासाठी निपाणी शहर परिसरातील नागरीकांनी मोठी गर्दी



**निपाणी: येथे महालक्ष्मी यात्रेनिमीत्त महाप्रसाद वाटपप्रसंगी आम.शशिकला जोल्ले, माजी.खास.आण्णासाहेब जोल्ले,अशिषभाई शाह, दादाराजे निपाणकर व इतर.**

केली होती. आठ दिवसात ३ लाखाहून अधिक भाविकांनी महालक्ष्मी देवीचे दर्शन घेवून आशिर्वाद घेतल्याचा अंदाज यात्रा कमिटीतर्फे वर्तविण्यात आला आहे.

याप्रसंगी चिकोडीचे आम. गणेश हुक्केरी, चंद्रकांत कोठीवाले, बुडा अध्यक्ष लक्ष्मणराव चिंगळे, सुनिल पाटील, रोहन साळवे, राजू गुंदेशा, अभिनंदन मुदकुडे, जुबेर बागवान, यांच्यासह महालक्ष्मी मंदिर अभिवृद्धी संघाचे पदाधिकारी व सदस्य ग्रामस्थ, युवक मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

यात्रा काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सीपीआय बीएस तळवार यांच्या मार्गदर्शनाखाली तिन्ही पोलिस ठाण्याचे फौजदार यांच्या मार्गर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवला होता.


## जाहीर नोटीसीस हरकत

सर्व लोकांना कळविण्यात येते की,

१) मिळकतीचे वर्णन :– मौजे कबनूर गावचे हद्दीतील मिळकत याचा गट नं. ९०४/अ याचे एकूण क्षेत्र ७ हे. ५३ आर पैकी श्री. सचिन पांडूरंग पिंपळगावकर, रा. हुपरी यांचे हिस्सेचे क्षेत्र ० हे. १८.९० आर, आकार ०रु.३५ पैसेची मिळकत यासी चतु:सीमा– पुर्वेस–धोंडीराम कांबळे यांची मिळकत, पश्चिमेस – संजय फरांडे यांची मिळकत, दक्षिणेस– इचलकरंजी–कोल्हापूर सरकारी रस्ता, उत्तरेस– म्हादगोंडा पाटील यांची मिळकत

२) सदर मिळकत श्री.सचिन पांडूरंग पिंपळगावकर, रा. हुपरी यांचे मालकीची असून ती त्यांनी आमचे अशिल श्री. दादासो यशवंत चौगुले, रा. रेंदाळ यांना खरेदी देणेचा व्यवहार ठरला आहे. त्याप्रमाणे श्री. सचिन पिंपळगावकर यांनी दि. ०७/०१/२०२६ इ. रोजी संचकार पावती करारपावती लिहून दिली आहे.

३) अशी वस्तुस्थिती असताना सदर मिळकत विक्रीबाबतची जाहीर नोटीस दै. लोकमत या वर्तमानपत्रातील दि. ०६/०२/२०२६ इ. रोजीच्या अंकात सोनावले असोसिएटस, कोल्हापूर यांनी प्रसिध्द केली आहे. त्यास आमचे अशिलांनी हरकत दिली आहे.

४) सबब सदर मिळकती संदर्भाने श्री. सचिन पांडूरंग पिंपळगावकर, रा. हुपरी यांचेशी कोणीही खरेदी वा अन्य कोणताही व्यवहार करु नये. अशा व्यवहाराने कोणासही सदर मिळकतीमध्ये हक्क, अधिकार प्राप्त होणार नाहीत वा आमचे अशिलांवर असा व्यवहार बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी. म्हणून दिली हरकत. ता. ११/०२/२०२६

**ॲड. एस. एस. मुदगल**

१२/१८६, कॉंग्रेस कमिटीचे पाठीमागे, इचलकरंजी

मो.नं. ९८५०१०८८८३

## जाहीर नोटीस

मौजे खोतवाडी येथील गट नं. ८३/२ पैकी क्षेत्र ९२.७५ चौ.मी. यासी चतु:सिमा– पुर्वेस– स्वामी यांची मिळकत, पश्चिमेस – शेख यांची मिळकत, दक्षिणेस– मगदूम यांची मिळकत उत्तरेस – २० फुट रस्ता सदरची मिळकत ही १) श्री. वसंत भाऊ काळगे २) श्री. प्रवीण वसंत काळगे ३) श्री. प्रदिप वसंत काळगे ४) श्री अमित वसंत काळगे रा. यड्राव यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी म्हणून दिली नोटीस सही

ता. ०७/०२/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर, बसस्टॉप जवळ

सांगली रोड, इचलकरंजी

मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

ता.हातकणंगले पैकी मौजे खोतवाडी येथील गट नंबर १६८ पैकी गुंठेवारी बिगरशेती भुखंड क्रमांक २८ व २९ चे एकत्रीत क्षेत्र २९२–६८ चौरस मिटर ची खुली जागा सर्व.यासी एकत्रीत चतु:सिमा–पुर्वेस– महादेव लिंगाप्पा रामाजी यांची मिळकत, पश्चिमेस – इलियास सिकंदर सुतार यांची मिळकत, दक्षिणेस– माने यांची मिळकत,उत्तरेस–२० फुट रस्ता. सदरची मिळकत १) सौ. समीरा उर्फ शाबीरा नजीर सुतार व २) श्री. फिरोज नजीर सुतार रा. खोतवाडी यांचे स्वतंत्र मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना तोंडी करार करुन दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता.

११/०२/२०२६

**ॲड.शिवकुमार सुखदेव लकडे**

३/१५३, देवमोरे वाडा, टाकवडे वेस, राणाप्रताप चौक, इचलकरंजी.

मो. ९८८१०१४७२५.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की...

मिळकतीचे वर्णन :– मौजे कबनूर क. ग.नं. ८२३ क्षेत्र हे . आर. ०–१५ आकार रूपये १–८७ ची मिळकत यापैकी आमचे मालकी हिस्सेचे क्षेत्र हे. आर. ०–०७.५० आकार रूपये ०–९४ ची खुली जमीन मिळकत. यासी चतु:सिमा:– पुर्वेस :– भूपाल सुतार वगैरे यांची मिळकत, पश्चिमेस :– दिपक सुतार वगैरे यांची मिळकत. दक्षिणेस :– सरकारी रस्ता, उत्तरेस :– श्री. बाबासाहेब मलिवडे यांची मिळकत.

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत श्री. देवराज मनोहर सुतार वगैरे ९. रा. कबनूर यांचे मालकी असून सदरची मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून संचकार रक्कम स्विकारलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा दिला आहे. सबब सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क संबंध दावा अगर तक्रार असल्यास नोटीस प्रसिध्द झालेपासून (७) सात दिवसाचे आत खालील ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर कागदपत्रासह लेखी खुलासा करावा.म्हणून दिली जाहीर नोटीस

ता. ११/०२/२०२६

**ॲड. रागिणी उत्तम मोरबाळे**

१६/१२०१, आयजीएम हॉस्पिटलजवळ, इचलकरंजी.

मो. ९७६७१८३८९१.

# पृथ्वीराज पाटीलने पटकावला मानाचा 'नगराध्यक्ष चषक'

## उपनगराध्यक्ष चषकावर पै.श्रेयस गाटचे नाव; हुपरी मैदानात १२८ चटकदार कुस्त्या

हुपरी,ता.११(वार्ताहर)-

**येथील श्री अंबाबाई यात्रेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य निकाली कुस्त्यांच्या जंगी मैदानात कुस्ती शौकिनांना थरारक लढती पाहायला मिळाल्या. या मैदानात प्रथम क्रमांकाच्या लढतीत 'महाराष्ट्र केसरी' पै. पृथ्वीराज पाटील याने पै. विशाल बनकर याच्यावर 'बॅकथ्रो' डावावर नेत्रदीपक विजय मिळवून मानाचा 'नगराध्यक्ष चषक' आपल्या नावे केला.**



हुपरी : 'महाराष्ट्र केसरी' पै. पृथ्वीराज पाटील याने पै. विशाल बनकर याच्यावर लावलेला प्रेक्षणीय 'बॅकथ्रो' डाव.

द्वितीय क्रमांकाच्या लढतीत हुपरीचा सुपुत्र आणि 'महाराष्ट्र चॅम्पियन' पै.श्रेयस गाट याने पै. संग्राम जमदाडे याला 'मच्छिकोता' डावावर अस्मान दाखवत मानाचा 'उपनगराध्यक्ष चषक' जिंकला. हुपरी येथे यात्रेनिमित्त आयोजित या भव्य कुस्ती मैदानात एकूण १२८ लहान-मोठ्या चटकदार कुस्त्या झाल्या.यामध्ये हजारो कुस्ती शौकिनांनी उपस्थित राहून या खेळाचा आनंद लुटला.यावेळी नगराध्यक्ष मंगळराव माळगे, उपनगराध्यक्ष प्रकाश उर्फ बाळासाहेब रणदिवे, मुख्याधिकारी अजय नरळे, पोलीस निरीक्षक एन. आर. चौखंडे, यशवंतराव पाटील, सुरज बेडगे, किरण कांबळे, अमेय जाधव, संदीप आपटे, रोहित शेटे,अमर माने, संतोष वाळवेकर सुरेश इंग्रोळे, सात्ताप्पा गायकवाड, मोहन वाईंगडे, प्रतापसिंह देसाई, योगेश कळंत्रे,नागेश कौंदाडे, अजित उगळे आदी मान्यवर उपस्थित होते.या भव्य कुस्ती मैदानासाठी आखाडा प्रमुख व पंच म्हणून नेताजी निकम, मोहन नाईक, घनश्याम माळी, राजाराम गायकवाड, राहुल गाट, धनाजी खेमलापुरे, घनश्याम गायकवाड, संभाजी गिरी, रफिक मुल्ला, अवधूत माने, नामदेव पाटील, दिपक बेडगे, श्रावण मुधाळे, संदीप जाधव आदींनी काम पाहिले.

# गायकांनी मनापासून गायन सादरीकरण करावे

## डॉ.मृदुला दाढे; संगीत कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद

इचलकरंजी,ता.११-

**गाणे सादर करताना प्रथम ते मनातून येते आणि मग आवाजातून येते. त्यामुळे गायकांनी आत्मविश्वासाने आणि मनापासून गायन सादरीकरण करावे. अचूक गायनाचे मर्म जाणून घेऊन, समजून गायन केल्यास ते निश्चितपणे उत्तम होईल असे प्रतिपादन हिंदी चित्रपट संगीताच्या अभ्यासक, लेखिका आणि प्रसिद्ध गायिका डॉ.मृदुला दाढे यांनी केले.**

त्या येथील मनोरंजन मंडळ, श्री दगडूलाल मर्दा फाउंडेशन, रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल, अ. भा. मराठी नाट्य परिषद इचलकरंजी शाखा आणि महाराष्ट्र साहित्य परिषद इचलकरंजी शाखा यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसीय संगीत कार्यशाळेत बोलत होत्या. यावेळी प्रसिद्ध



**संगीत कार्यशाळा उद्घाटनप्रसंगी डॉ.मृदुला दाढे व संयोजक पदाधिकारी.**

गायिका डॉ.मृदुला दाढे, मुंबई यांच्या संगीत कार्यशाळेस रसिकांचा आणि हौशी गायकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. त्या पुढे म्हणाल्या, भारतीय कला क्षेत्रातील चित्रपट गीत गायन आणि भावगीत गायन ही अतिशय समृद्ध आणि संपन्न परंपरा असून ती अशीच चालू राहण्यासाठी व्यावसायिक तसेच हौशी गायकांनी सुगम संगीत व शास्त्रीय संगीताचा अभ्यास करणे तसेच गाणे समजून सादर करणे महत्त्वाचे आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मर्दा फाउंडेशनचे विश्वस्त श्यामसुंदर मर्दा आणि रोटरी क्लब सेंट्रलचे अध्यक्ष घनश्याम सावलानी यांच्या हस्ते पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. मनोरंजन मंडळाचे अध्यक्ष समीर गोवंडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी म.सा.प. इचलकरंजीच्या अध्यक्षा वैशाली नायकवडे आणि नाट्य परिषदेचे संचालक प्रा.मिलिंद दांडेकर व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी सर्वांच्या हस्ते उदघाटनपर दीपप्रज्वलन करण्यात आले.

कार्यशाळेच्या शेवटच्या सत्रात शिबिरार्थींनी विचारलेल्या विविध प्रश्नांना दाढे यांनी उत्तरे दिली. शेवटी दाढे आणि रोटरी प्रांत ३१७०चे सहाय्यक प्रांतपाल गिरीश कुलकर्णी यांच्या हस्ते सर्वांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. सूत्रसंचालन संतोष आबाळे यांनी केले. प्रा.दांडेकर यांनी आभार मानले. कार्यशाळेस इचलकरंजी, कोल्हापूर, सांगली, मिरज, जयसिंगपूर या भागातील शिबिरार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



ऑलिम्पियाड स्पर्धेतील साई इंग्लिश स्कूलच्या यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत मार्गदर्शक शिक्षक व शिक्षिका.

# साई इंग्लिश स्कूलचे ऑलिम्पियाड स्पर्धेत यश

इचलकरंजी,ता.११-

**सायन्स ऑलिम्पियाड फौंडेशनतर्फे घेण्यात आलेल्या इंटरनॅशनल ऑलिम्पियाड स्पर्धेत श्री. साई शिक्षण संस्थेच्या साई इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग असे यश मिळविले.**

एकूण १९ मुलांनी गणित या विषयात सुवर्णपदक मिळविले तर वैष्णवी सिंग, राही दोरुगडे, उत्कर्ष केसरवाणी, साबीर सय्यद, राजवीर पोवळे, खुष गौड, आरुष शर्मा, मित मांगले, अंजली दुधगी यांनी गणित विषयात उल्लेखनीय यश मिळवून त्यांची दुसऱ्या फेरीत निवड झाली आहे. सदरच्या यशस्वी विद्यार्थ्यांना सौ.शुभांगी खोत, सौ.वैष्णवी मांगले, सौ.प्राजक्ता बेहेरे, सौ.भुईकर, सौ. आरिफा मिरजे यांचे मार्गदर्शन तर प्रशालेचे मुख्याध्यापक आर.एन.आळतेकर, मिलिंद कांबळे यांचे प्रोत्साहन मिळाले.

# अमर गेजगे यांची तालुका अध्यक्षपदी निवड

इचलकरंजी,ता.११-

**राजे प्रतिष्ठान कामगार सेनेच्या हातकणंगले तालुका अध्यक्षपदी अमर गोरख गेजगे यांची निवड करण्यात आली आहे.**



सदरची निवड कामगार सेनेचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष प्रकाश कोळी व राज्य सरचिटणीस चंद्रकांत धडके यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या निवडीचे पत्र मुंबई येथील राजे प्रतिष्ठानच्या कामगार सेना कार्यालयात त्यांना देण्यात आले. या निवडीबद्दल कामगार वर्गात आनंदाचे वातावरण आहे.



इचलकरंजी येथे मोफत होमिओपॅथीक शिबिरावेळी डॉ.आरती कोगनोळे, डॉ.प्रणय निमणकर, संजय घायतिडक, राजू पाटील, सत्यनारायण धूत, राजाराम जाधव, शरद देसाई व इतर मान्यवर.

# इचलकरंजीत होमिओपॅथिक शिबीर उत्साहात संपन्न

इचलकरंजी,ता.११-

**येथील रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी डॉ.जे.जे.मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल जयसिंगपूर यांच्यातर्फे मोफत होमिओपॅथिक सर्व रोग तपासणी व उपचार शिबीर रोटरी सेवा केंद्र, दाते मळा इचलकरंजी येथे घेण्यात आले. रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त हा उपक्रम घेण्यात आला. या शिबिरात ७० रुग्णांची तपासणी करुन मोफत होमिओपॅथिक औषधे देण्यात आले.**

स्वागत रोटरी क्लबचे अध्यक्ष संजय घायतिडक यांनी केले. यावेळी रोटरीचे सेक्रेटरी राजू पाटील, शरद देसाई, सत्यनारायण धूत, अभय यळरुटे, राजाराम जाधव उपस्थित होते. होमिओपॅथिक तज्ञ डॉ.आरती कोगनोळे व डॉ.प्रणव निमणकर यांनी होमिओपॅथिक उपचार पद्धतीबद्दल महत्वाच्या गोष्टी सांगितल्या तसेच प्रत्येक शुक्रवारी सकाळी ११ ते १ यावेळी कायमस्वरुपी मोफत होमिओपॅथिक शिबीर सुरु राहील, त्याचा लाभ रुग्णांनी घ्यावा, असेही त्यांनी सांगितले. या शिबिरात डॉ.रोहन माळी, डॉ.अभिषेक मुळे, डॉ.ईशा पाटील, डॉ.निवेदिता पाटील, डॉ.अंचल पाटील, डॉ.मृणाल माळी, डॉ.कौशल मोहिते, डॉ.प्रियांका पाटील, डॉ.प्रतिक्षा फडके, डॉ.स्वराली प्रयाग,डॉ.तृप्ती सोलवणे, डॉ.ओम कुंभार व अमोल कांबळे यांनी रुग्णांची तपासणी केली. आभार राजू पाटील यांनी मानले.

# छ.ताराराणी मार्केटमध्ये तीन दुकानगाळे इस्टेट विभागामार्फत सील

कोल्हापूर,ता.११(प्रतिनिधी)-

**महानगरपालिका मालकीचे भाडे तत्वावर देण्यात आलेले छ.ताराराणी मार्केट मधील थकबाकी असलेले ३ दुकानगाळे इस्टेट विभागामार्फत सील करण्यात आले.**



दुकानगाळे सील करताना इस्टेट विभागाचे अधिकारी.

कोल्हापूर महानगरपालिकेच्या इस्टेट विभागामार्फत वसुली मोहिम राबवण्यात येत आहे. यामध्ये मागील थकबाकी व सन २०२५-२६ चे महापालिकेचे दुकान भाडे भरणे बाबत वेळोवेळी इस्टेट विभागामार्फत भाडेकरुंना सुचना देण्यात आल्या होत्या. त्यामुळे सदरची कारवाई छ.ताराराणी मार्केट येथे राबविण्यात आली. यावेळी थकीत असलेले ३ दुकानगाळे सील करण्यात आले. यापुढे ही थकबाकीदारांवर दुकान गाळे सील होणेची तसेच मिळकतीवर बोजा नोंद करणेची कार्यवाही चालू ठेवली जाणार असून महापालिका मालकीचे दुकान गाळेतील भाडेकरुंनी आपली थकबाकी मुदतीत भरण्यात यावी असे इस्टेट विभागाच्यावतीने आवाहन करण्यात आले आहे. सदरची कारवाई अतिरिक्त आयुक्त शिल्पा दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उप-आयुक्त किरण धनवाडे, सहा.आयुक्त श्रीमती स्वाती दुधाणे, लिपीक अरुण भोसले, रविंद्र काळे, गिरीष नलवडे-जामदार, अविष्कार भोजे, रविंद्र कांबळे, सदानंद फाळके यांनी केली.

# शेतीपंपाच्या केबल, फ्युजा चोरट्यांकडून लंपास

नृसिंहवाडी,ता.११(प्रतिनिधी)

- औरवाड, गौरवाड, कवठेगुंलद परिसरातील चित्र
- चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी

**गेल्या काही दिवसांपासून औरवाड, गौरवाड, कवठेगुंलद परिसरात शेतीपंपांचे केबल,फ्युजा चोरीच्या घटनांनी उच्छाद मांडला आहे. यामुळे ऐन ऊस भरणीच्या हंगामात ऊस उत्पादक शेतकरी संकटात सापडला असून चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.**

या पावसाळ्यातच नदीच्या पात्रात बुडणाऱ्या १० च्या विद्युत मोटरी सुरक्षितेच्या कारणास्तव काठावर काढून ठेवलेल्या होत्या. त्या सहा विद्युत मोटरी चोरट्यांनी लंपास केल्या होत्या. त्याचा तपास स्वतः शेतकऱ्यांनी केला होता पण पुराव्याअभावी त्यांना परत फिरावे लागले होते. मागील दोन दिवसांपूर्वी शैलेंद्र आगरे, बाहुबली नरदे, बच्चू आणुजे, बंडू आणुजे, कमरो पटेल आदी शेतकऱ्यांच्या महागड्या तांब्याच्या अंदाजे एक लाख रुपये किंमतीची पाचशे फूट केबल अज्ञात चोरट्यांनी लंपास केली आहे. यावर्षी कमी ऊस उताऱ्याने शेतकरी हैराण झाला असून त्यात केबल चोरीची भर पडल्याने त्रस्त झाला आहे. वायर चोरीमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. इकडे नवीन केबल खरेदी करण्यासाठी हजार रुपये खर्च करावे लागते तर दुसरीकडे वायर कापल्याने पिकांना पाणी देणे बंद झाले आहे, यामुळे उभी पिके वाळण्याची भीती निर्माण झाली आहे. तीन दिवस रात्री तर तीन दिवस दिवसा वीज विद्युत मिळत आहे. या वाढत्या चोरामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी स्थानिक पोलीस ठाण्यात धाव घेतली असून तातडीने चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे.

# कराडात गीत रामायण सांगितिक आविष्कार उत्साहात

कराड,ता.११(प्रतिनिधी)-

**जोवरी हे जग,जोवरी भाषण तोवरी नूतन गीत रामायण या अमृतमय ओळींचा प्रत्यय देणारा गीत रामायणचा भव्य व भक्तीरसपूर्ण सांगितिक आविष्कार कराड येथील सौ.वेणूताई चव्हाण सभागृहात उत्साहात झाला.**

मराठी साहित्य, संगीत आणि भक्तीभाव यांचा सुरेल संगम अनुभवण्यासाठी रसिकांनी प्रचंड गर्दी केली होती.कार्यक्रमाचे सादरीकरण ब्रह्मनाद कराड यांच्या प्रस्तुत करण्यात आला. प्रमुख कलाकार म्हणून स्वागता पोतनीस, नियती आपटे, राजेंद्र कुलकर्णी, अमृत गिजरे, दिलीप आगाशे, केदार सांभारे आणि केदार गुळवणी यांनी आपल्या भावपूर्ण गायनाने रसिकांची मने जिंकली.

सहगायक कलाकार म्हणून स्वरा पोतनीस, कौशिकी आपटे, वेदत्री जोशी, सुपूर्णा गरूड आणि अतुल कुलकर्णी यांनीही कार्यक्रमाची रंगत वाढवली. सूत्रसंचालन अभिजीत कुलकर्णी आणि आदिती जोशी यांनी प्रभावीपणे केले.

# विद्यार्थ्यांनी सुमती पाटील यांचा आदर्श घेतला पाहिजे-प्रा.औंधकर

कराड,ता.११(प्रतिनिधी)-

**सुमतीबाई यांचा जन्म सधन कुटुंबात झाला. त्यांनी वडीलांकडून वाचन गुण घेतला होता.त्यातूनच त्यांची जिज्ञासावृत्ती वाढीस लागली होती.त्यांनी विद्वत्ता, क्रीडा, शिक्षण, प्रशासन क्षेत्रात नैपुण्य प्राप्त केले होते. सुमतीबाई विद्यार्थी म्हणून शिक्षकात प्रिय होत्या.**

मुकादम तात्यांनी महाविद्यालयातील वस्तीगृहाच्या नामकरणासाठी त्यांच्या नावाचा आग्रह धरून सुमतीबाई यांचे नाव दिले. त्या सगाम कॉलेजच्या पहिल्या प्राचार्या होत्या. तसेच महाराष्ट्राच्या लोकसेवा आयोगाच्या पहिल्या महिला अध्यक्ष होत्या. विद्यार्थ्यांनी सुमतिबाई यांचा आदर्श घेतला पाहिजे,असे उद्गार प्रा.डॉ. सुचिता औंधकर, स.गा.म. महाविद्यालय, कराड यांनी रयत शिक्षण संस्था व बॅरि.प्राचार्य पी.जी. पाटील प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयात आयोजित प्राचार्या सुमतीबाई पाटील स्मृती व्याख्यान कार्यक्रम प्रसंगी काढले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीयस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे हे होते. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्या सुमतीबाई पाटील यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. अध्यक्षीय मनोगत प्राचार्य डॉ.चंद्रकांत खिलारे यांनी व्यक्त केले.

प्रास्ताविक व स्वागत वस्तीगृहप्रमुख बी. एच. पाटील यांनी केले. आभार सृष्टी विकास जाधव यांनी मानले.सूत्रसंचालन समीक्षा अधिक गायकवाड यांनी केले.कार्यक्रमप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

श्रीहरी
शुक्रवार, ता.६/०२/२०२६ पासून दुपारी १ व ४ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
गलती
प्रौढांसाठी
सायं. ७ वा.
A रात के रंग A

श्रीदत्त
शुक्रवार, ता. ६ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
इस्ट मिटस वेस्ट
A फक्त प्रौढांसाठी A

गुरु
शुक्रवार ता.६ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
दु १२.३० * ३.३० * ९.३० वा.
रोज ३ खेळ
युवा वर्गाची नवी लव्ह स्टोरी
६.३० वा.
रोज १ खेळ

रुबाब (मराठी)

रणपति शिवराय स्वारी आग्रा (मराठी)

पंचवटी
DOLBY DIGITAL PLUS 7.1
शुक्रवार ६ पासून
अॅडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरु राहील
ऑनलाईन बुकींग bookmyshow
अधिक माहितीसाठी संपर्क : 9623150103
रोज १ खेळ दु. १२ वा.
रोज २ खेळ *३ व ६ वा.
रोज १ खेळ रात्री ९ वा.


रुबाब (मराठी)
तुझे मेरी कसम (हिंदी)
रणपति शिवराय स्वारी आग्रा (मराठी)

५६ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
भाग्यरेखा
DOLBY DIGITAL
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
गर्दीचा ३ रा आठवडा
रोज ३ खेळ *११.४५*३.१५*६.३० वा.


बॉर्डर-२ (हिंदी)

RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070
bookmyshow


" रणपति शिवराय: स्वारी आग्रा " ( मराठी )
10:15 AM, 12:30 PM
07:15 PM, 10:00 PM
" मर्दानी 3" ( हिंदी )
10:00 AM, 12:30 PM
08:00 PM, 10:30 PM
" बॉर्डर 2" ( हिंदी )
01:15 PM, 03:30 PM
06:15 PM, 10:15 PM
" अगं अगं सुनबाई! काय म्हणताय सासूबाई? " ( मराठी )
03:00 PM
" रुबाब " ( मराठी )
05:00 PM
आता कोणताही शो पहा 80/-* पासून पुढे

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क
+91 88 88 01 51 11


रणपती शिवराय (MAR) (U/A)
10.45am, 04.30, 10.30pm
बॉर्डर २ (HIN) (U/A)
04.00, 10.30pm
अंग अंग सुनबाई! काय म्हणताय सूनबाई (MAR) (U/A)
01.45, 07.45pm
क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम (MAR) (U/A)
07.45pm
रुबाब (MAR) (U/A)
01.15pm
मर्दानी ३ (HIN) (U/A)
10.45am
आता सिनेमा पहा 80 रु. पासून पुढे

# सांगली जिल्ह्यातील १९ पोलिस अधिकाऱ्यांची बदली

## पाच जणांची जिल्ह्यात नियुक्ती; दोघांना मुदतवाढ

सांगली,ता.११(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर पोलिस परिक्षेत्राच्या पोलिस दलात मोठे बदल करण्यात आले असून अनेक अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये सांगली जिल्ह्यातील १९ पोलिस अधिकाऱ्यांची जिल्ह्याबाहेर बदली करण्यात आली आहे. पाच अधिकाऱ्यांना जिल्ह्यात नियुक्ती देण्यात आली आहे. तर दोन अधिकाऱ्यांना मुदतवाढ मिळाली आहे.**

पोलिस निरीक्षक, सहाय्यक निरीक्षक आणि उपनिरीक्षक पदावरील अधिकाऱ्यांच्या बदल्या या प्रशासकीय कारणास्तव तसेच त्यांच्या विनंतीनुसार करण्यात आली आहे.जिल्हाबाहेर बदली झालेल्यांमध्ये पोलिस मुख्यालयात कंट्रोलला नियुक्ती असणारे पोलिस निरीक्षक संजय आकाराम हारूगडे यांची सांगलीतून कोल्हापूर तर प्रदीप बाळासाहेब सुर्यवंशी यांची सांगलीतून साताऱ्यात बदली करण्यात आली आहे.




जिल्ह्यातील चार सहाय्यक पोलिस निरीक्षकांच्या बदल्या झालेल्या आहेत. यामध्ये मिरज शहर गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक निरीक्षक आण्णासाहेब वसुदेव गादेकर यांची सांगलीतून पुणे ग्रामीण, स्थानिक गुन्हे अन्वेषणचे सिकंदर विष्णू वर्धन यांची सांगलीतून सोलापूर ग्रामीण, राजेश जोतीबा माने यांची सांगलीतून सातारा तर अभिजीत जयसिंग कुदळे यांची सांगलीतून पुणे ग्रामीण येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील तब्बल १३ पोलिस उपनिरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. तेजस्विनी रामचंद्र पाटील, इकबाल गुलाब महात, प्रियांका अभिजीत खाडे, मृणालिनी कलगोंडा पाटील, संजीव भाऊसाहेब जाधव, राजू श्रीकांत अन्नछत्रे, श्रीकांत मोहन वासुदेव, प्रमोद प्रकाश खाडे, दीपक आनंद माने यांची सांगलीतून कोल्हापूर जिल्ह्यात, संदीप नामदेव गुरव, सागर मच्छींद्र गायकवाड, केशव शंकर रणदिवे यांची सांगलीतून सोलापूर ग्रामीण आणि निलम मदनराव जाधव यांची सांगलीतून सातारा जिल्ह्यात बदली झाली आहे.

सहाय्यक पोलिस निरीक्षक निभावरी नारायण रेळेकर यांची सोलापूर ग्रामीणमधून सांगलीत आणि सरिता सोपान जाधव यांची साताऱ्यातून सांगलीत बदली करण्यात आली आहे. पोलिस उपनिरीक्षक प्रणोती रघुनाथ यादव, पोपट विलास काशिद यांची सोलापूर ग्रामीण मधून सांगलीत आणि प्रियांका दशरथ माने यांची पुणे ग्रामीण मधून सांगलीत बदली करण्यात आली आहे. तसेच पोलिस उपनिरीक्षक रुपाली भाग्यवंत गायकवाड आणि जयश्री आबासाहेब कांबळे यांना मुदतवाढ देण्यात आली आहे.

# सभापतीपदावर दक्षिण की उत्तरचा झेंडा?

## कराड तालुक्यात भाजपला निर्विवाद सत्ता; भोसले-घोरपडे गटाला संधी

कराड,ता.११(संतोष शिंदे)-

**कराड पंचायत समितीच्या सभापती पदावर कोणाची वर्णी लागणार, याबाबत राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता निमाण झाली आहे. पंचायत समितीचे सभापती पद यावेळी सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षित असून झालेल्या निवडणुकीत भाजपने २४ पैकी १३ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले आहे. कराड पंचायत समितीवर पहिल्यांदाच भाजपची निर्विवाद सत्ता प्रस्थापित झाली आहे.**

कराड तालुका कराड दक्षिण आणि कराड उत्तर अशा दोन मतदारसंघात विभागला गेल्याने, सभापती पदाचा मान दक्षिणला मिळणार की उत्तरला, याबाबत राजकीय चर्चा रंगू लागल्या आहेत. भाजपच्या १३ सदस्यांपैकी आ. डॉ.अतुलबाबा भोसले गटाचे ८, तर आ.मनोजदादा घोरपडे गटाचे ५ सदस्य निवडून आल्याने भोसले गटाचे पारडे सध्या जड मानले जात आहे.



आ.डॉ.अतुल भोसले आ.मनोज घोरपडे

पंचायत समिती निवडणुकीच्या निकालात भाजपानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ४, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) ३, काँग्रेस २ आणि शिवसेना (शिंदे गट) २ जागांवर विजयी झाला आहे. मात्र कोणत्याही विरोधी पक्षाकडे बहुमत नसल्याने सभापती आणि उपसभापती ही दोन्ही पदे भाजपकडेच जाणार हे निश्चित आहे.

| सभापती पदाच्या प्रमुख दावेदार | महिला सदस्यांचे गण |
|---|---|
| नंदाताई यादव | विंग |
| वर्षा निकम | शेरे |
| कोमल यादव | वडोली भिकेश्वर |
| अनिता वेताळ | वाघेरी |

सभापती पदासाठी एकूण ७ महिला सदस्या निवडून आल्या आहेत. भाजपातून चार, राष्ट्रवादी अजित पवार गटातून दोन, तर शिवसेना शिंदे गटातून एक महिला सदस्य सभागृहात आहेत. तथापित, संख्याबळाच्या जोरावर भाजपाचाच उमेदवार सभापती होणार आहे.अंतिम निर्णय आ. डॉ.अतुल भोसले आणि आ. मनोज घोरपडे हेच घेणार असून, त्यांनी ठरवलेला उमेदवारच सभापती तसेच उपसभापतीपदी विराजमान होईल. उर्वरित पक्षांना पंचायत समिती सभागृहात विरोधी बाकांवर बसावे लागणार आहे.

# सहकार भारतीमार्फत बँकांसाठी सोमवारी कार्यशाळा

शिराळा,ता.११(वार्ताहर)-

**सांगली-कोल्हापूर जिल्ह्यातील बँक कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी सोमवार ता.१६ फेब्रुवारी रोजी कोल्हापूर येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.याचे नियोजन सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्यादित यांच्यामार्फत करण्यात आले आहे.**

सहकार भारती प्रशिक्षण सहकार संस्था ही शासनमान्य संस्था असून नागरी सहकारी बँकांच्या संचालक, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विविध विषयांवर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करत असते.सोमवारी होणाऱ्या कार्यशाळेत तांत्रिक निर्लेखन व सामोपचाराने कर्ज वसुली, सहकारी बँकांच्या प्रगतीचा मार्ग, सहकारी बँकांमध्ये नफा क्षमतेतील वृद्धी इत्यादी विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.या कार्यशाळेचे उद्घाटन रिझर्व्ह बँक व नार्बाडचे संचालक सतीश मराठे यांच्याहस्ते होणार असून या कार्यशाळेत सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष व नॅफकबचे संचालक

### रिझर्व्ह बँकेचे संचालक मार्गदर्शन करणार

डॉ.उदय जोशी,कोकण नागरी सहकार बँकस् असोसिएशनचे उपाध्यक्ष सी.ए. उदय कर्वे,पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनचे मानद सचिव ॲड.सुभाष मोहिते,जनसेवा सहकारी बँक लि.हडपसर पुणे अध्यक्ष डॉ.राजेंद्र हिरेमठ हे मार्गदर्शन करणार आहेत. कोल्हापूर येथे हॉटेल फर्न,शाहु मार्केट यार्ड समोर येथे हि कार्यशाळा होणार आहे.

या कार्यशाळेसाठी शुल्क भरून पूर्वनोंदणी करावी.सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त बँकांनी आपले प्रतिनिधी प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन प्रशिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय बिर्ला,संचालक उदय पेंडसे व सह.संयोजक सौ.अश्विनी आठवले यांनी केले आहे.

# जिल्हा बँकेच्या सात संचालकांचे नातेवाईक जिल्हा परिषद,पंचायत समितीत

सांगली,ता.११(प्रतिनिधी)-

**सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळातील सात संचालकांचे नातेवाईक जिल्हा परिषद अर्थात मिनी मंत्रालय व पंचायत समितीत पोहचले आहेत. या सदस्यांचा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात प्रभाव वाढला आहे.**

### सत्ताकेंद्रे नियंत्रित करण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांमध्ये बँकेच्या आठ संचालकांचे नातेवाईक निवडणूक रिंगणात उतरले होते. यापैकी सात संचालकांच्या कुटुंबीयांनी विजय मिळवत वर्चस्व सिद्ध केले असून एका संचालकांच्या नातेवाईकांना पराभव स्वीकारावा लागला आहे. सहकारी संस्थांमधील पदांबरोबरच जिल्हा परिषद, पंचायत समितीतील सत्ताकेंद्रे आपल्या कुटुंबियांच्या माध्यमातून नियंत्रित करण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा शिराळ्याचे माजी आमदार मानसिंगराव नाईक यांचे चिरंजीव विराज नाईक यांनी मांगले जिल्हा परिषद गटातून विजय मिळवून राजकीय प्रवेश केला आहे. शिराळ्याचे आमदार सत्यजित देशमुख यांची कन्या साईतेजस्वी देशमुख यांनी कोकरुड जिल्हा परिषद गटातून विजय संपादन केला आहे.

बँकेचे ज्येष्ठ संचालक मोहनराव कदम यांचे नातू जितेश हणमंतराव कदम यांनी पंचायत समितीच्या निवडणुकीत यश मिळवले आहे. संचालक महेंद्र लाड यांचे चिरंजीव ऋषिकेश लाड यांनी कुंडल मतदारसंघातून विजय खेचून आणला आहे. खानापूर तालुक्यातून संचालक अमोल बाबर यांच्या पत्नी शीतल बाबर यांनी नागेवाडी गटातून विजयी होत आपली ताकद दाखवून दिली आहे. मिरजेचे संचालक बाळासाहेब होनमोरे यांच्या पत्नी अस्मिता होनमोरे यांनी बेडग गटातून विजय मिळवत राजकीय पकड मजबूत केली आहे. आटपाडीचे संचालक तानाजी पाटील यांचे चिंरजीव पृथ्वीराज पाटील यांनी दिघंची गटातून बाजी मारली आहे.दरम्यान,जिल्हा बँकेचे संचालक राहुल महाडिक यांच्या पत्नी हर्षदा रेलूर गटातून पराभूत झाल्या आहेत.




पेठ नाका येथील वनश्री नानासाहेब महाडिक यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना नूतन सदस्य व अन्य मान्यवर.

# पेठ नाका येथे भाजपच्या विजयी उमेदवारांचा सत्कार

ईश्वरपूर,ता.११(प्रतिनिधी)-

**वाळवा तालुक्यातील भारतीय जनता पक्षाच्या नवनिर्वाचित जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा सत्कार सोहळा पेठ नाका येथील महाडिक शैक्षणिक संकुलात संपन्न झाला.**

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक राहुल महाडिक आणि भाजप जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक यांच्या हस्ते या विजयी उमेदवारांना गौरविण्यात आले. यामध्ये कामेरीचे नूतन जिल्हा परिषद सदस्य जयराज पाटील, पंचायत समिती सदस्य शुभम पाटील, येलूरचे पुष्कराज महाडिक, नेर्लेचे समर्थ सतीश पाटील आणि इटकरे येथील प्रदीप कांबळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी सर्वांनी पेठ नाका येथील वनश्री नानासाहेब महाडिक यांच्या पुतळ्यास अभिवादन केले.कार्यक्रमाला जयकर कदम,भगवानराव जाधव,डॉ. सचिन पाटील, कपिल ओसवाल, सतीश महाडिक यांच्यासह वैभव जाखले, डॉ.एस. व्ही.पाटील व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिल्हा रुग्णालयात स्वतंत्र डायलिसिस यंत्रणा कार्यान्वित

सातारा,ता.११(प्रतिनिधी)-

**स्व. क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा शासकीय रुग्णालय, सातारा येथे काविळ बी व काविळ सी रुग्णांसाठी स्वतंत्र व सुरक्षित डायलिसिस यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.**

या अत्याधुनिक डायलिसिस सुविधेमुळे किडनी विकारासह काविळ बी व काविळ सी बाधित रुग्णांना आता जिल्ह्याबाहेर जाण्याची गरज राहणार नाही. यापूर्वी या रुग्णांसाठी स्वतंत्र डायलिसिस सुविधा उपलब्ध नसल्याने मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. मात्र आता स्व. क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा शासकीय रुग्णालयात सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या, औषधोपचार व हेमोडायलिसिस प्रक्रिया पूर्णतः मोफत दिली जात आहे, अशी माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. युवराज करपे यांनी दिली आहे.तसेच सातारा जिल्ह्यातील कोरेगाव, मेढा, वडूज, फलटण व कलेढोण येथील ग्रामीण रुग्णालयांमध्येही तालुकास्तरावर डायलिसिस सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, या ठिकाणी एकूण ९ मशीन कार्यरत आहेत. विशेषतः ग्रामीण व गरजू रुग्णांसाठी ही सुविधा मोठा दिलासा देणारी ठरत आहे.सातारा जिल्ह्यातील किडनी व काविळग्रस्त रुग्णांचे आरोग्यदायित्व मोठ्या प्रमाणात कमी होणार असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. करपे आणि अतिक्ति जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सलमा इनामदार यांनी केले.

# सह्याद्री कारखान्याचा गाळपामध्ये नवा उच्चांक

कराड,ता.११(प्रतिनिधी)-

**कराड तालुक्यातील सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचा नवीन विस्तारवाढ प्रकल्प नुकताच कार्यान्वित करण्यात आला असून, त्यामध्ये ऊस गाळपाचा दररोज नवनवीन उच्चांक होत आहे, कारखान्याने ता. ९ रोजी प्रतिदिन ११ हजार ३०० मे.टन गाळपाचा नवीन उच्चांक केला आहे, अशी माहिती राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री,सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब पाटील यांनी दिली.**

बाळासाहेब पाटील पुढे म्हणाले की,सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याने प्रतिदिन ७५०० मे. टनावरून ११००० मे.टन ऊस गाळपाचा नवीन विस्तारवाढ प्रकल्प असंख्य अडचणींवर मात करून पूर्ण केला आणि नुकताच यशस्वीरित्या कार्यान्वित केला आहे. कारखान्याने ता. ९ रोजी प्रतिदिन ११३०० मे.टन गाळप करून नवा उच्चांक प्रस्तापित केला असून कारखान्याचे प्रेरक स्व. यशवंतराव चव्हाण आणि कारखान्याचे संस्थापक आदरणीय पी.डी.पाटील यांचे स्वप्न पूर्णत्वास आले आहे अशा भावना चेअरमन बाळासाहेब पाटील यांनी व्यक्त केल्या.

### प्रतिदिन ११ हजार ३०० मे.टन गाळप



सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याच्या नवीन विस्तारवाढ प्रकल्पासह मुख्य इमारत.

कारखान्याची प्रतिदिन गाळप क्षमता ११००० मे.टनाची असून, प्रतिदिन ११००० व त्याहीपेक्षा जास्त ऊस गाळप करण्याकरिता आवश्यक असलेली ऊस तोडणी, वाहतूक यंत्रणाही कार्यान्वित करण्यात आली असल्याने, सह्याद्री चालू हंगामातील ऊस तोडीचे उद्दिष्ट यशस्वीरित्या पूर्ण करेल,असा विश्वास व्यक्त करून, सर्व ऊस उत्पादक सभासद शेतकरी यांनी नोंदविलेला संपूर्ण ऊस सह्याद्रीकडेच गळीतास पाठवावा असे आवाहन सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब पाटील यांनी केले आहे.

# मिरजेत बेघर महिलांसाठी आनंद सहल उत्साहात

मिरज,ता.११(प्रतिनिधी)-

**येथील 'आस्था' बेघर महिला निवारा केंद्र आणि 'विहान केअर अँड सपोर्ट' यांच्या संयुक्त विद्यमाने निराधार व पीडित महिलांसाठी 'आनंद सहल' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.**

भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा स्वाती खाडे यांच्या सौजन्याने साकारलेल्या या उपक्रमाचा मुख्य उद्देश आयुष्यात अनेक संकटे झेललेल्या महिलांना माणुसकीचा आधार आणि आत्मसन्मान मिळवून देणे हा होता. ही सहल सांगली येथून जोतिबा, पन्हाळा आणि कोल्हापूरच्या अंबाबाई मंदिरापर्यंत नेण्यात आली. या प्रवासात शाहीन शेख, सुरेखा शेख आणि अनेक मान्यवरांनी सहभाग घेऊन महिलांना प्रोत्साहित केले, ज्यामुळे या महिलांच्या आयुष्यात आनंदाची एक नवी पहाट अनुभवण्यास मिळाली.

# यू-ट्यूब आधुनिक रोजगार संधीचे क्षेत्र-प्रा.शौकत अत्तार

कराड,ता.११(प्रतिनिधी)-

**आजच्या काळात यू-ट्यूब हे ज्ञानप्रसाराचे, माहितीचे, मनोरंजनाचे, जाहिरातीचे चांगले माध्यम आहे आणि या माध्यमातून आजच्या काळात विविध प्रकाराची रोजगाराची निर्मिती सहज शक्य आहे, असे प्रतिपादन कला व वाणिज्य महाविद्यालय नागठाणे येथील हिंदी विभागप्रमुख प्रा. शौकत अतार यांनी केले.**

रयत शिक्षण संस्थेचे, सद्गुरु गाडगे महाराज महाविद्यालय, कराडमधील हिंदी विभाग आयोजित 'एकदिवसीय अग्रणी कार्यशाळेच्या' कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते.या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत खिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते. अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. दिलिपकुमार कसबे हे उपस्थित होते. प्रा.अत्तार पुढे म्हणाले, की नवनवीन माहिती ही लोकांच्या पर्यंत विज्ञान तंत्रज्ञानाच्या माध्यमातून लोकापर्यंत काही सेकंदात पोहोचत आहेत. आपल्या ज्ञानाच्या प्रवाहात पाठीमागे राहून चालणार नाही तर त्यासोबतच धावावे लागेल. प्रा.डॉ.दिलिपकुमार कसबे म्हणाले की, आजच्या काळात माहिती तंत्रज्ञान याबरोबर फेसबुक, इंस्टाग्राम, युट्युब, ट्विटर, व्हॉट्सॲप यामधून सुद्धा ज्ञानाची देवाणघेवाण मोठ्या प्रमाणावर होत आहे, असे म्हणाले.प्रास्ताविक प्रा.डॉ. महिपती शिवदास यांनी केले.सूत्रसंचालन प्रा.डॉ अजित लिपारे यांनी तर आभार प्रा. डॉ. सचिन जाधव यांनी मानले.

# 'ॲनिमल राहत'कडून प्राण्यांसाठी विविध सुविधा

मिरज,ता.११(प्रतिनिधी)-

**चिंचली येथील श्री मायाक्का देवी यात्रेनिमित्त ॲनिमल राहत संस्थेच्या वतीने राबवण्यात आलेल्या विशेष मोहिमेमुळे सहा हजारांहून अधिक बैल आणि घोड्यांना दिलासा मिळाला आहे. तीर्थयात्रा मार्गावर प्राण्यांना संरक्षण, वैद्यकीय उपचार आणि विश्रांतीच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.**

यंदाच्या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे, हजारो भाविकांनी आपल्या लाडक्या जनावरांना प्रवासाचा त्रास देण्याऐवजी बस आणि इतर यांत्रिक वाहनांचा वापर करण्यास पसंती दिली. ॲनिमल राहतने केलेल्या आवाहनाला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्राणी कल्याणाप्रति आपली संवेदनशीलता जपली. यात्रेच्या मार्गावर संस्थेमार्फत विविध ठिकाणी विश्राम शिबिरे आणि फिरती पशुवैद्यकीय पथके तैनात करण्यात आली होती.

# आष्टा शहरात स्वच्छतेचा उडाला बोजवारा

आष्टा,ता.११(प्रतिनिधी)-

**आष्टा शहरात स्वच्छतेचा बोजवारा उडाला आहे. कचरा तर उचलत नाही, उपनगरे परिसरात स्वच्छता नाही की घंटागाडी? मग बारकोड स्कॅनिंग कशासाठी करता? स्वच्छतेच्या नावाखाली फसवणूक सुरू आहे का? अस्वछतेमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, असा सवाल उपस्थित करीत दत्त वसाहत येथील नागरिकांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले.**

दरम्यान, याबाबतची चौकशी करावी अशी मागणी सजग नागरिक अकबर वलांडकर यांनी पालिकेचे मुख्याधिकारी, नगरसेवक यांना ई-मेलद्वारे केली आहे.निवेदनात म्हटले आहे की,दत्त वसाहत परिसरामध्ये नगरपालिकामार्फत दिली जाणारी दैनंदिन सफाई सेवा तसेच घरगुती घनकचरा संकलनाची सेवा नियमितपणे दिली जात नाही. अनेक दिवसांपासून सफाई कर्मचारी परिसरात येत नाहीत तसेच कचरा गाडीही वेळेवर किंवा नियमितपणे येत नाही.

### स्वच्छता न करताच बारकोड स्कॅनिंग



आष्टा : येथे गटरी अशा तुंबलेल्या असून अस्वच्छतेच्या विळख्यात आहेत.

### संबंधित कर्मचाऱ्यांकडून प्रशासनाची फसवणूक

यामुळे परिसरात अस्वच्छता निर्माण होत असून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. परंतु याचवेळी असे निदर्शनास आले आहे की, नगरपालिकेतील काही कर्मचारी दररोज दुचाकीवरून येऊन प्रत्येक घराबाहेर लावलेल्या बारकोडचे स्कॅनिंग करून जातात. प्रत्यक्षात सफाई किंवा कचरा उचलण्याचे काम न करता केवळ बारकोड स्कॅन करून काम झाल्याची हजेरी लावली जात आहे का? हा प्रकार अत्यंत गंभीर असून शासकीय यंत्रणेचा गैरवापर व नागरिकांची फसवणूक असल्याचे स्पष्ट होते.

यासंदर्भात आरोग्य विभागातील अधिकारी मिलिंद धनवडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी संबंधित खाजगी टेंडरची मुदत संपल्याची माहिती दिली. जर टेंडर संपलेले आहे आणि प्रत्यक्षात सेवा दिली जात नाही, तर बारकोड स्कॅनिंगद्वारे काम केल्याची नोंद कशी केली जात आहे?

### सजग नागरिकांकडून चौकशी करण्याची मागणी

हा प्रकार बोगस हजेरी लावण्याचा असून त्यामागे प्रशासनातील गंभीर अनियमितता असल्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून आपण या प्रकरणाची तात्काळ सखोल चौकशी करून संबंधित कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी.बोगस हजेरी लावण्याच्या प्रकारावर कठोर कारवाई करावी.

दत्त वसाहत परिसरात नियमित सफाई व कचरा संकलन सेवा तात्काळ सुरू करावी. सदर बाब ही नागरिकांच्या आरोग्याशी निगडित असल्यामुळे आपण तातडीने लक्ष घालून आवश्यक ती प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी.



बागणी जिल्हा परिषद सदस्या सौ.मोहिनी खोत यांचा सत्कार करताना निशिकांत भोसले, समवेत आ.सदाभाऊ खोत व अन्य.

# बागणीतील विजय सर्वसामान्य मतदारांचा-निशिकांत भोसले

ईश्वरपूर,ता.११(प्रतिनिधी)-

**महाराष्ट्रात बागणी जिल्हा परिषद मतदार संघ हा आदर्श मॉडेल म्हणून विकसीत होईल, या मतदार संघातील विजय हा निष्ठावंत व सर्वसामान्य मतदारांचा आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा अध्यक्ष निशिकांत भोसले-पाटील यांनी व्यक्त केले.**

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत बागणी जिल्हा परिषद मतदार संघातून महायुतीच्या उमेदवार सौ.मोहिनी सागर खोत या निवडून आल्या. निवडणुकीत विजय मिळविल्याबद्दल नूतन जिल्हा परिषद सदस्या सौ.मोहिनी खोत यांचा सत्कार प्रकाश शैक्षणिक ,आरोग्य, उद्योग समूह व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने निशिकांत भोसले-पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आमदार सदाभाऊ खोत,रयत क्रांती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सागर खोत, डॉ.प्रदीप पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# पाणीपुरवठा योजनेबाबत अधिकारी धारेवर

## विविध प्रश्नांवरून नुतन नगरसेवकांनी गाजवली पहिलीच सभा

आजरा,ता.११(प्रतिनिधी)-

**आजरा शहराच्या नवीन पाणी पुरवठा योजनेमुळे शहरवासीयांची डोकेदुखी वाढली आहे. एकीकडे शहरवासीयांना पाणी मिळत नाही. तर दुसरीकडे सर्वत्र रस्त्याची खुदाई यामुळे हालात भर पडली आहे. पाणीपुरवठा योजनेच्या ठेकेदाराचे पुढचे देणे देखील सभागृहात चर्चा झाल्याशिवाय देण्यात येवू नये. ठेकेदाराने रस्ता खुदाई करून केलेले पॅचवर्क म्हणजे या योजनेतील मोठा भ्रष्टाचार आहे. रस्ते करणारच आहात तर पॅचवर्कचा खर्च कशासाठी ? असा सवाल करत तातडीने रस्त्याचे पॅचवर्क थांबवावे अशा सूचना नगरपंचायतीच्या मासिक सभेत नगरसेवकांनी अधिकाऱ्यांना केल्या. यावेळी नुतन नगरसेवकांनी पाणी पुरवठा योजनेच्या स्थानिक अधिकाऱ्यांसह नगरपंचायतीच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले.**

नगरपंचायतीची पहिली तहकुब सभा झाली. नगराध्यक्ष अशोक चराटी अध्यक्षस्थानी होते. यावेळी नगरसेवक असिफ पटेल, निसार दरवाजकर,अभिषेक शिंपी,परशराम बामणे यांच्यासह परेश पोतदार यांनी अधिकाऱ्यांवर प्रश्नांची सरबत्ती केली.

पाणीपुरवठा योजनेचा ठेकेदार नगर सेवकांच्याबरोबर सभ्य भाषा वापरत नसल्याने त्यांनी सभागृहासमोर माफी मागावी. योजनेचा संपूर्ण आराखडा सभागृहासमोर मांडावा, अशी मागणीही केली. आठवडा बाजार ठेक्याचा प्रश्न स्मिता कुंभार यांनी मांडला. आठवडा बाजाराचा जमा होणारा कर व प्रत्यक्षात होणारा लिलाव यामध्ये तफावत असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे येणाऱ्या लिलावात अभ्यास करून लिलाव रक्कम ठरवावी अशा सूचना त्यांनी केल्या. सभेमध्ये कचरा व्यवस्थापनाबाबतही जोरदार चर्चा झाली.लाखो रुपये खर्चुन कचरा वेळेत उचलला जात नसेल तर एखाद्या कंपनीला कचरा उचलण्याचा ठेका देण्याऐवजी ही यंत्रणा नगरपंचायतीमार्फत राबविता येते का याची चाचपणी करण्याच्या सूचना नगरसेवक परशुराम बामणे यांनी केल्या.

चार वर्ष क्रीडा संकुलाची इमारत बांधूनही अद्याप वापरात नाही. ती वापरात आणणे गरजेचे आहे, असे सभेत सुचविण्यात आले. बांधकाम



विभागाकडून बांधकाम परवानगीसह बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देतांना पन्नास हजार रुपयांची मागणी केली जात असल्याची चर्चा शहरात आहे.बांधकाम परवाने दिल्यावर बांधकाम विभागाचे अधिकारी फिरकत नाहीत.पूर्णत्व दाखले देण्यासाठी बड्या बिल्डरांकडून प्रती सदनीका दहा हजार रुपये घेतले जात असल्याचीही जोरात चर्चा असल्याचा आरोप परेश पोतदार यांनी केला.

यावेळी झालेल्या चर्चेत असिफ सोनेखान, रेहमत खेडेकर, डॉ.स्मिता कुंभार,अनिकेत चराटी, आसावरी खेडेकर, पूनम लिचम, विक्रम पटेकर यांनी भाग घेतला. यावेळी उपनगराध्यक्षा सौ. पुजा डोंगरे,सौ.अश्विनी चव्हाण,सौ.अन्वि केसरकर, डॉ.इंद्रजीत देसाई, सौ.बुड्डेखान, श्रीमती कांबळे यांच्यासह मुख्याधिकारी सुरज सुर्वे, निहाल नायकवडी व अधिकारी उपस्थित होते.

**सभेतील नगरसेवकांच्या सूचना**

- नगरपंचायत मालकीच्या दुकान गाळ्यांचे भाडे प्रति महिना किमान दहा हजार रुपये करावे.
- पे अँड यूज तत्वावर उभा करण्यात आलेली स्वच्छता करणे पाण्याच्या सोयीसह खुली करावीत.
- आठवडा बाजार ठेक्याची किमान लिलाव रक्कम २० लाख रुपये करावी,
- थकीत घरफाळ्यात मिळकत धारकांना सूट देऊन वसूल करावा व महसूल वाढवावा.
- गटर्सवर असणाऱ्या बांधकामावर तातडीने कारवाई करावी.
- जनावरांचा बाजार परिसरातील अतिक्रमणे हटवून तेथे चार चाकी साठी पे अँड पार्क सुविधा करावी.
- आठवडा बाजारादिवशी वाडा मशिद समोर रिकाम्या जागेत चार चाकी ऐवजी दुचाकी पार्किंग व्यवस्था करावी.
- शिवाजीनगर येथील एसटीपी प्लांट अन्यत्र जागा संपादित करून हलवावा.

# जिल्हा परिषदेतही काँग्रेस बसणार विरोधी बाकावर

कोल्हापूर,ता.११(प्रतिनिधी)-

**महापालिकेतील सत्तेपासून दूर राहिल्यानंतर आता जिल्हा परिषदेतही काँग्रेसच्या पदरात विरोधी बाकावर बसण्याचीच वेळ आली आहे. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर सर्व राजकीय गणिते स्पष्ट झाली असून,चांगली कामगिरी करूनही सत्ता स्थापनेसाठी आवश्यक संख्याबळ काँग्रेसला मिळवता आलेले नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेवरही काँग्रेस सत्तेबाहेरच राहणार, हे जवळपास निश्चित झाले आहे.**



जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने १८ जागा जिंकत सर्वाधिक यश मिळवले आहे. त्या खालोखाल काँग्रेसने १५ जागा मिळवत आपली ताकद सिद्ध केली.मात्र,अध्यक्ष पदासाठी आवश्यक असलेली 'मॅजिक फिगर'काँग्रेसपासून दूर राहिल्याने,सत्ता स्थापनेचे स्वप्न अपूर्णच राहिले आहे.या निवडणुकीत काँग्रेसचे नेते आमदार सतेज पाटील यांनी जिल्हा परिषदेची लढत एकाकी दिली. एका बाजूला जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबीटकर,वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, खासदार धनंजय महाडिक, खासदार धैर्यशील माने,आमदार विनय कोरे, आमदार अमल महाडिक यांच्यासह जिल्ह्यातील बहुतांश आमदार महायुतीच्या माध्यमातून मैदानात उतरले होते.

तर दुसऱ्या बाजूला आमदार सतेज पाटील यांनी काँग्रेसचा जिल्हा परिषदेतला गड राखण्यासाठी स्वतंत्रपणे झुंज दिली. या एकाकी लढतीतून काँग्रेसला १५ जागा मिळाल्या.करवीर तालुक्यात पाच जिल्हा परिषद सदस्य तसेच पंचायत समितीचे सदस्य काँग्रेसकडून निवडून आले. गगनबावडा तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सर्वच जागा काँग्रेसकडे राहिल्या.याशिवाय राधानगरी,हातकणंगले आणि शिरोळ तालुक्यांमध्येही काँग्रेसचे प्रत्येकी एक जिल्हा परिषद सदस्य विजयी झाले आहेत.तरी सत्ता स्थापनेसाठी आवश्यक संख्याबळ मात्र अपुरे ठरले आहे.इतर कोणत्याही पक्षाचा पाठिंबा मिळण्याची शक्यता कमी असल्याने, महापालिकेनंतर आता जिल्हा परिषदेतही काँग्रेसला विरोधी बाकावर बसावे लागणार आहे.

# थकबाकीदार अपार्टमेंटचा पाणीपुरवठा खंडित

कोल्हापूर ता.११(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर महानगरपालिका शहर पाणीपुरवठा व ड्रेनेज विभागाच्या वसुली पथकाकडून थकबाकीदार नळ कनेक्शन धारकांवर कारवाई करण्यात आली. चंबुखडी येथील चौगुले सावंत बिल्डर्स यांच्याकडे ६.५० लाख रुपये तसेच पुईखडी येथील स्वप्नपुर्ती अपार्टमेंट यांच्याकडे सहा लाख रुपयांची थकबाकी असल्याने या दोन्ही अपार्टमेंटचे पाणीपुरवठ्याचे कनेक्शन खंडित करण्यात आले.**

तसेच ज्या कनेक्शन धारकाची थकबाकी रु.२० हजार पेक्षा जास्त आहे. अशा सुमारे ८ हजार थकबाकीदारांना शहर पाणी पुरवठा विभागामार्फत थकबाकीच्या नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत. यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१ (१) व (२) मधील तरतूदीनुसार संबंधित थकबाकींच्या मिळकतीवरती



बोजा नोंद करण्याची कारवाई करण्यात येणार आहे.

महानगरपालिका आयुक्त के.मंजूलक्ष्मी यांनी शहर पाणीपुरवठा विभागाची वसुली आढावा बैठक घेतली होती. या बैठकीत दिलेल्या सूचनेनुसार अतिरिक्त आयुक्त शिल्पा दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपआयुक्त परितोष कंकाळ, जल अभियंता हर्षजीत घाटगे, उपजल अभियंता रावसाहेब चव्हाण, शाखा अभियंता मयूरी पटवेगार, पाणीपट्टी अधिक्षक प्रशांत पंडत व मीटर रीडर संजय मिरजे व अन्य यांच्या

**मनपाकडून मिळकतींवर बोजा नोंद करण्याच्याही नोटीसा**

सहभागातून ही कारवाई करण्यात आली. या आढावा बैठकीत थकबाकीदार नळ कनेक्शन खंडित करणे, अनधिकृत नळ कनेक्शन तात्काळ तोडणे व त्यावर फौजदारी कारवाई करणे, तसेच नळ कनेक्शनला थेट विद्युत मोटर जोडल्याचे आढळल्यास संबंधित मोटर जप्त करण्याचे आदेश देण्यात आले होते.कोल्हापूर शहरातील सर्व नागरिकांनी आपल्या नळ कनेक्शनची थकबाकी तात्काळ भरून महानगरपालिकेस सहकार्य करावे,असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे. थकबाकी न भरल्यास नळ कनेक्शन खंडित करण्याची कटू कारवाई करण्यात येईल, याची नागरिकांनी नोंद घ्यावी. अशा सुचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.

# दत्तवाडमध्ये आघाडीची सरशी, प्रस्थापितांची गणिते बिघडली

सैनिक टाकळी,ता.११(प्रतिनिधी)-

**दत्तवाड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीचे निकाल केवळ आकडेवारी नसून, तालुक्याच्या राजकारणातील**



**बदलत्या प्रवाहाचे निदर्शक आहेत.या निवडणुकीत शाहू आघाडीने मारलेली मुसंडी आणि राष्ट्रीय पक्षांच्या गणितांमध्ये झालेली मोडतोड हे यावेळच्या निकालाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य ठरले आहे.**

या निवडणुकीत सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्थानिक आघाड्यांनी मिळवलेले यश आहे. उत्तरा शिंदे, बाबासाहेब वनकोरे आणि अविनाश पाटील या तिघांनी आपापल्या क्षेत्रात निर्विवाद वर्चस्व गाजवत शाहू आघाडीचा झेंडा फडकवला.विशेषतः जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण महिला गटात उत्तरा शिंदे यांनी मिळवलेली ९,५२६ मते ही विरोधकांसाठी धोक्याची घंटा ठरली.

काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या या मतदारसंघात मतदारांनी प्रस्थापित पक्षांच्या तुलनेत स्थानिक पातळीवरील नेतृत्वाला आणि आघाड्यांच्या राजकारणाला दिलेली ही पसंती बरेच काही सांगून जाते. एकनिष्ठ मतदार आणि तळागाळातील संपर्क या दोन जोरावर ही लाट निर्माण झाल्याचे दिसून येते. दुसरीकडे, काँग्रेस आणि भाजपा यांसारख्या मोठ्या पक्षांसाठी हे निकाल आत्मचिंतन करायला लावणारे आहेत. काँग्रेसच्या राधा उर्फ दिपाली पाटील यांनी कडवी झुंज दिली असली, तरी विजयाचा उंबरठा ओलांडण्यात त्या अपयशी ठरल्या. भाजपाच्या मृणालिनीराजे जाधव यांच्या मतांची आकडेवारी पाहता,नगरपालिका, महानगर पालिकेतील पक्षांतर्गत असलेल्या सुप्त संघर्षाचा फटका बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. कार्यकर्त्यांची फळी विखुरलेली असणे आणि शेवटच्या क्षणी मतदारांचे झालेले ध्रुवीकरण यामुळे भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांची गणिते बिघडली आहेत.

यावेळच्या निवडणुकीत अंतर्गत फितुरी आणि छुप्या युतीची मोठी चर्चा रंगली. पंचायत समितीच्या जागांवर शिवसेना उबाठा, स्वाभिमानी शेतकरी संघटनेने महाविकास आघाडीत सामील होऊन देखील पराभव झाला का यावर आता खल सुरू आहे. काही गटांमध्ये पक्षाच्या अधिकृत उमेदवारापेक्षा स्थानिक आघाड्यांच्या उमेदवारांना कार्यकर्त्यांनी रसद पुरवल्याचे बोलले जात आहे. ही आयात-निर्यात नीती अनेक ठिकाणी उलटल्याने दिग्गज नेत्यांना पराभवाचा धक्का सहन करावा लागला.



महापौर उदय धातुंडे यांच्या सत्कारप्रसंगी उपस्थित पदाधिकारी.

# इचलकरंजी भांडी व्यापारी असो.तर्फे महापौर उदय धातुंडे यांचा सत्कार

इचलकरंजी,ता.११-

**इचलकरंजी महानगरपालिकेचे प्रथम महापौर उदय धातुंडे यांचा इचलकरंजी शहर भांडी व्यापारी असो.तर्फे सत्कार करण्यात आला.**

याप्रसंगी बोलताना असो.चे अध्यक्ष रवी गरगटे म्हणाले,तळागाळातल्या लोकांसोबत आपली नाळ जोडणारा एक भांडी दुकानदार इचलकरंजी महानगरपालिकेचा प्रथम महापौर होऊ शकतो याचे एक उत्तम उदाहरण उदय धातुंडे यांनी दाखवून दिले आहे. वस्त्रनगरीचा पहिला महापौर आमच्या संस्थेचा झाला याचा अभिमान आम्हा सर्वांना असल्याचे गौरवोद्‌गार त्यांनी काढले.तर उपाध्यक्ष आशिष शहा यांनी वस्त्रनगरीचा कायापालट करण्याची मनोकामना व्यक्त केली. सत्कारप्रसंगी संदिप कुडचे, निलेश घोंगडे, संजय मेहता, प्रदीप लोखंडे, बाबूराव विटेकरी, शंकर धातुंडे, मोहन मद्यापगोळ, प्रकाश गुरव, धनराज चौहान, अशोक शहा, प्रदिप बाफना, अविनाथ हेगडे, दादासो घारगे, मुकेश ओसवाल आदी उपस्थित होते.

# कोतोलीत जनसुराज्यचा वारू रोखला

## आम.नरके व सत्यजित पाटील यांचे नियोजन यशस्वी

बाजारभोगाव,ता.११(वार्ताहर)-

**कोतोली जिल्हा परिषद मतदार संघात शिवसेनेच्या उमेदवार वर्षाराणी अरुण पाटील यांनी तीन हजारापेक्षा अधिक मताधिक्य घेत माजी जिल्हा परिषद सदस्य शंकर पाटील यांच्या पत्नी संगिता पाटील यांना पराभवाचा धक्का दिला. येथे माजी आमदार सत्यजित पाटील- सरुडकर व आम . चंद्रदीप नरके यांनी पडद्यामागे जोडण्या लावत जनसुराज्यचा विजयाचा वारु रोखण्यात यश मिळवले.**

तसेच गत निवडणुकीत आपला बंधू अजित नरके यांच्या पराभवाचं उट्ट काढत आम. नरके यांनी शंकर पाटील यांना पराभवाचा धक्का दिला. कोतोली गणात देखील शिवसेनेने गुलाल लावला आम.चंद्रदीप नरके यांचे बंधू अजित नरके व जनसुराज्यकडून शंकर पाटील यांच्या गत निवडणुकीत काट्याची टक्कर झाली होती.अवघ्या १८१ मताधिक्य घेत शंकर पाटील निवडून आले होते. स्थानिक उमेदवार नसल्याचे भांडवल करत,पडद्यामागच्या जोडण्या, माजी आम. पी. एन. पाटील यांची रसद मिळाल्याने त्यांचा विजय सोपा झाला. यावेळी मात्र स्थानिक उमेदवार देवून,माजी आमदार व विद्यमान आम. नरके यांनी सुक्ष्म नियोजन करुन आखाड्याची फिल्डींग लावली होती. भावाच्या पराभवाची सल नरकेंच्या मनात असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत कोतोली बरोबरच तालुक्यात विजय मिळवायचाच या हेतूने जोडण्या लावल्या गेल्या.

माजी आमदार सत्यजित पाटील सरुडकर उबाठा शिवसेना गटात असले तरी विरोधी आम.विनय कोरेंकडून विधानसभेत पराभव झाल्याने आपल्या आगामी राजकारणासाठी प्रतिस्पर्धी कोरेंच्या राजकिय पायाभरणीला सुरुंग लावण्यासाठी आम. नरकेंशी जुळवून घेतलं.कोतोली मतदार संघातील कार्यकर्ते दोघांच्या संपर्कात असल्याने जोडण्या लावण्यात फारशी अडचण आली नाही.येथील उमेदवार विजय झाला तर आपल्यालाच मदत होणार आहे शिवाय आम. नरकेंचा राजकीय उपद्रव फारसा नाही. त्यामुळे माजी आम पाटील- सरुडकर गटाने ही निवडणुक आपल्या कार्यकर्त्यांसाठी प्रतिष्ठेची बनवली.

राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेसची रसद घेण्यात आजी व माजी आमदारांना यश आले. कोतोली गणातील शिवसेनेचे उमेदवार आण्णासाहेब गायकवाड यांच्या संघटनात्मक ताकदीचा जिल्हा परिषदेला फायदा झाला. कोतोली ग्रामपंचायतीवर सत्ता असल्यामुळे डी. जी. पाटील गटाला उपयोग झाला.डी.जी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पी.एम. पाटील, सुभाष पाटील व त्यांच्या कार्यकर्त्यांनी सर्वांपर्यत पोहचण्याचा प्रयत्न केला. जनसुराज्य पक्षा अंतर्गत नाराजीचा फटका बसल्याची चर्चा आहे.

# कुंभार समाजाला मूर्तीसाठी सर्व सुविधांनीयुक्त जागा द्यावी

## मनसेची मागणी

कराड ,ता.११(प्रतिनिधी)-

**शहरातील कुंभार समाज गणपती मर्ती बनवून त्या जिल्हा व जिल्ह्याबाहेरही वितरित करतो. त्या मूर्ती बनविण्यास त्यांची घरे अपुरी पडतात. त्यामुळे त्यांना दरवर्षी पालिका जागा उपलब्ध करून देते. गेल्या वर्षी सोमवार पेठेतील बालाजी कार्यालयासमोर पंताच्या कोटाखाली उपलब्ध करून दिलेल्या जागेत वीज, पाण्याची व्यवस्था नाही. ती जागा कुंभारांच्या घरापासून दूर असल्याने या समाजाच्या सोयीची नाही. त्यामुळे सर्व सुविधांनीयुक्त जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी मनसेने पालिकेकडे केली.**

मनसेचे जिल्हाध्यक्ष ॲड.विकास पवार, शहराध्यक्ष सागर बर्गे, जिल्हा संघटक नितीन महाडिक, तालुकाध्यक्ष सतीश यादव, विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष विनायक भोसले, उपतालुका प्रमुख नितीन शिंदे यांनी पालिकेचे नगरअभियंता सुधीर चव्हाण यांच्याशी चर्चा केली. यावेळी त्यांनी निवेदनही दिले.

निवेदनात म्हटले की, गणेशमूर्तीच्या जागेमध्ये गेल्या वर्षी पुराचे पाणी शिरल्यामुळे बनवलेल्या मूर्तींचे नुकसान झाले होते.यावर्षीही तशी वेळ येऊ नये, म्हणून पालिकेने कुंभार समाजाला योग्य पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी. वास्तविक, कुंभार समाजाच्या घराशेजारील शिवाजी क्रीडा मंडळाची जागा किंवा मंगळवार पेठेतील करडी पिराचे पूर्व-पश्चिम बाजूस खुली असलेली जागा कुंभार समाजास मूर्ती बनवण्यासाठी तात्पुरती उपलब्ध करून दिल्यास ती योग्य होईल.



# श्री वीरभद्र देवाची यात्रा उत्साहात

इचलकरंजी,ता.११-

**खोतवाडी गौरीशंकर नगर येथे श्री वीरभद्र देवाची यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. महाअभिषेक मनोज चचडी, उमेश पाटील, रवींद्र कराडे, या मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. यानंतर वीरभद्र पालखी सोहळा व मिरवणूकीसाठी शिवानंद जोतावर यांच्या घरातून पालखीचे आगमन झाले.**

त्यानंतर गुगुळविधी साठी आलेले सर्व मानकरी यांच्या हस्ते पूजन होऊन मंदिराभोवती प्रदक्षिणा काढून विविध प्रकारचे शस्त्रांचा वापर करून खेळ सादरीकरण झाले. माजी आमदार मा. प्रकाश आवाडे, सदा मलाबादे, साहेबगोंडा बिरादार यांच्या हस्ते महाप्रसादाचे वाटप करण्यात आले ही सर्व यात्रा संपन्न होण्यासाठी सर्व समाज बांधव, ग्रा.प.पदाधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ , पुजारी जगदीश हिरेमठ, सौ.श्वेता हिरेमठ यांचे सहकार्य लाभले .

# राधानगरीत ए.वाय.ठरले किंगमेकर

## पंचायत समितीतील सत्तेमुळे काँग्रेसला ऊर्जितावस्था

राधानगरी,ता.११(प्रतिनिधी)-



**राधानगरी तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या पाच पैकी तीन व पंचायत समितीचा दहापैकी सहा जागा जिंकत तालुका पंचायत समितीवर काँग्रेसने एकहाती सत्ता मिळविली. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसला प्रत्येकी जिल्हा परिषदेची एक व पंचायत समितीच्या दोन जागा मिळाल्या.**

काँग्रेसच्या विजयात ए.वाय.पाटील यांनी सतेज पाटील,पी.एन.पाटील गटाबरोबर समझोता करत गेल्या वीस वर्षात विखुरलेली काँग्रेस एकत्र करुन उर्जितावस्था आणलेली दिसून येते.तालुक्यात काँग्रेसचाच झेंडा फडकविण्यास माजी गृहराज्यमंत्री सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यात तीन जिल्हा परिषद व सहा पंचायत समितीचे उमेदवार विजयी करण्यात किंग मेकर ठरले ते म्हणजे केडीसीसी बँकेचे संचालक व ज्येष्ठ नेते ए.वाय.पाटील यावेळीही ए.वाय.यांनी राधानगरी पंचायत समितीवर प्राबल्य राखत गेल्या २५ वर्षांची आपली हुकूमत कायम ठेवत वर्चस्व पुन्हा एकदा सिध्द केले आहे. त्यामुळे तालुक्यात सरवडे, सोळांकूर,राधानगरी, फेजिवडे, तुरंबे, राशिवडे या सहा पंचायतींसह जिल्हा परिषदेचे सरवडे, राधानगरी, राशिवडे हे तीन उमेदवार निवडून आणून आपणच तालुक्याचे किंग असल्याचे दाखवून दिले आहे.त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीनंतर ए.वाय.पाटील दिसणार नसल्याचे केलेल्या भाष्याला ए. वाय यांच्या राजकीय मुत्सद्दीपणामुळे मोठा विजय मिळवून ते कसलेल्या आखाड्यातील राजकारणी ठरले आहेत.

राधानगरी तालुक्याचे ज्येष्ठ नेते असलेल्या ए.वाय.पाटील यांना बिद्री साखर कारखाना व विधानसभा



निवडणुकीत अपयश आले.या अपयशापेक्षा त्यांचे जीवाभावाचे व स्वतः सत्तेचा त्याग करुन घडवलेले शिलेदार सोडून गेल्याचे मोठे दुःख झाले होते.पण त्यातूनही हार न मानता नव्या उमेदीने व ताकदीने पाच सहा महिने राधानगरी तालुका आपल्या कार्यकर्त्यांना घेऊन नव्या रणनितीने पिंजुन काढला.ज्या राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर राजकीय हयात घालवली तिथेच त्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न झाला.तरीही नाउमेद न होता काँग्रेसचे नेते, माजी गृहराज्यमंत्री आमदार सतेज पाटील यांच्यावर विश्वास ठेवून व जुळवून घेत नवे डावपेच टाकत राधानगरी तालुक्याचे काँग्रेसचे नेतृत्व केले.आणि त्याचवेळी त्यांनी राधानगरी तालुका काँग्रेसमय करण्याचा विडा उचलला.परंतु त्यांचा हा निर्णय चुकीचा तर ठरणार नाही ना असा ही काहीसा मतप्रवाह दिसून आला.पण या साऱ्याला छेद देत त्यांनी तालुक्यातील विस्कळीत झालेली काँग्रेस एकसंध करून तालुका काँग्रेसमय करण्याचा त्यांचा पहिला प्रयत्न यशस्वी झाला.

तालुक्यात त्यांनी प्रचारसभा, कोपरा सभा, पदयात्रा, गाव आणि मतदार भेटींवर भर दिला.जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत भविष्यातील ए वाय यांच्या २०२९ च्या विधानसभेची बिजे रोवली होती. तालुक्यात आमदार सतेज पाटील यांच्या माध्यमातून आपले वर्चस्व करण्याची संधी मिळाली, त्याचे त्यांनी सोनं केले. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या सत्तेबरोबरच पंचायत समितीची २५ वर्षांची सत्ता अबाधित ठेवून पुन्हा एकदा ए.वाय हे किंग मेकर बनले आहेत. हा स्थानिक स्वराज्य संस्थेतील मोजकेच मिळालेले यश हे शिंदेसेना व राष्ट्रवादी अजित पवार गट यांना आत्मचिंतन करायला लावणारे असून या निवडणुकीकडे भविष्यातील तालुक्याची राजकीय दिशा काय असणार आहे. हेही स्पष्ट होणार आहे.

**सरवडेत ए.वाय.पाटील यांना घेरण्याचा प्रयत्न**

सरवडे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या दोन जागा यामध्ये तालुक्यात कोठेही न झालेली शिवसेना व राष्ट्रवादी यांची युती फक्त सरवडेत झाली होती.ए.वाय.पाटील यांचे बंधू हे सोळांकूर पंचायत समितीचे उमेदवार होते. त्यांना घेरण्याचा प्रयत्न झाला होता. तरीही ए.वाय.यांनी शेरास सव्वाशेर होत भाऊ आर.वाय.पाटील यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणून विरोधकांचे मनसुबे धुळीस मिळवले.



# पं.बाळकृष्णबुवा संगीत महोत्सवाची सांगता

इचलकरंजी,ता.११–

**संगीताचार्य पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त पं. बाळकृष्णबुवा संगीत साधना मंडळ, इचलकरंजी यांच्यावतीने दोन दिवसांचा संगीत गायन महोत्सव उत्साहात पार पडला.**

रविवार दि. ८ रोजी, संगीत साधना मंडळातील तसेच इचलकरंजीतील विद्यार्थ्यांनी गायन,वादन सेवा सादर केली. दि. ९ रोजी, पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी गायिका विदुषी शाल्मली जोशी यांच्या गायन मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. या मैफलीस तबल्यावर जितेंद्र कुलकर्णी आणि संवादिनीवर स्वरूप दिवाण यांनी उत्कृष्ट साथ दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मंडळाचे अध्यक्ष अशोक सौंदत्तीकर यांनी स्वागत केले.सेक्रेटरी उमेश कुलकर्णी यांनी प्रास्ताविक तर चित्कला कुलकर्णी यांनी कलाकारांची ओळख करून दिली.ज्योती जोशी यांच्या हस्ते सर्व कलाकारांना स्वागतपर गुलाब पुष्प देण्यात आले. या संगीत महोत्सवाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.दर्जेदार आणि परंपराशील शास्त्रीय संगीत कार्यक्रमांचे आयोजन इचलकरंजीत नियमितपणे व्हावे, अशी अपेक्षा उपस्थित रसिकांनी व्यक्त केली.

# आयएसएसई कोल्हापूरतर्फे कार्यशाळेचे आयोजन

कोल्हापूर ता.११ (प्रतिनिधी)–

**इंडियन सोसायटी ऑफ स्ट्रक्चरल इंजिनियर्स (आयएसएसई) कोल्हापूर सेंटरच्यावतीने, राष्ट्रीय स्तरावरील एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. भूकंप प्रणव क्षेत्रात बांधकाम करत असताना भविष्याचा विचार करून आर्थिक व जिवित हानी कमी करण्यासाठी १८९३ कोडचा वापर करावा, या कोडमधील सुधारणा बाबत कार्यशाळेत मार्गदर्शन व चर्चा केली जाणार आहे.**

या कार्यशाळेत सिव्हिल इंजिनिअर्स, स्ट्रक्चरल कन्सल्टंट, शिक्षणतज्ज्ञ, तसेच उद्योग तज्ञांसाठी स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग मधील, १८९३ मधील प्रस्तावित सुधारणा बाबत प्रोफेसर योगेंद्रसिंग मार्गदर्शन करणार आहेत. अशी माहिती प्रशांत हडकर यांनी पत्रकार परीषदेत दिली. यावेळी प्रा.महेश साळुंखे, समन्वयक, स्थापथ्य अभियांत्रिकी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर प्रा. सचिन कदम, विभाग प्रमुख, डिपार्टमेंट ऑफ अप्लाइड मॅकॅनिकस, वालचंद कॉलेज ऑफ ईजिनयरींग, सांगली, उपाध्यक्ष मंदार आंबेकर, सेक्रेटरी जिया मोमीन, संचालक रणजीत जाधव, निरंजन वायचळ, सचीन मेहता, प्रशांत हावळ, डॉ. रश्मी जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# सोनवडे येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

चांदोली,ता.११(वार्ताहर)–

**सोनवडे ता.शिराळा येथील विठ्ठल रखुमाई मंदिरामध्ये सतुबुवा भंडाऱ्यानिम्मीत्त शुक्रवार दि.१३ फेब्रुवारीपासुन अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.**

सोनवडे येथील अखंड हरिनाम सप्ताहामध्ये काकडा,भजन,हरिपाठ,किर्तन यासारखे धार्मिक कार्यक्रम होणार असुन यामध्ये प्रामुख्याने ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज(सांगवड),ह.भ.प बबन महाराज (करवडी),ह.भ.प.जयंत महाराज (निमसोड),ह.भ.प रोहीत महाराज(खानापुर),अरुण महाराज(अहीरवाडी),ह.भ.प.युवराज महाराज(उखळु),ह.भ.प बाजीराव महाराज(सोनवडे) यांची किर्तनसेवा होणार आहे. तसेच या सप्ताहासाठी सोनवडे,मणदुर,आरळा येथील भजनी मंडळांचे सहकार्य लाभणार आहे.दरम्यान दि.२० रोजी सकाळी १० वाजता दिंडी सोहळ्यानंतर अखंड हरीनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. दरम्यान सतुबुवा भंडाऱ्यानिमित्त दि.२० रोजी दुपारी ३ वाजता कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले आहे.



# राज्यस्तरीय खो- खो स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक विजेत्या खेळाडूंना स्पोर्ट शूज भेट

कोल्हापूर ता.११ (प्रतिनिधी) –

**जिल्हा परिषदेचे मेन राजाराम हायस्कूल व जुनिअर कॉलेज येथील विद्यार्थिनींनी नाशिक येथे पार पडलेल्या १९ वर्षाखालील राज्यस्तरीय खो- खो स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. या विद्यार्थिनींच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकण्यासाठी पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आपल्या व्यस्त दिनचर्येतून आवर्जून वेळ काढत त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकली.त्यांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना स्पोर्ट शुजचे वाटप करण्यात आले.**

नाशिक येथे राज्यस्तरीय पार पडलेल्या खो-खो क्रीडा स्पर्धेत मुलींनी प्रथम क्रमांक मिळविला.यातील सानिका चाफे, श्रावणी पाटील व अमृता पाटील या तीन खेळाडूंची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी झाली.२७ डिसेंबर रोजी मध्य प्रदेशातील जबलपूर या ठिकाणी पार पडलेल्या या स्पर्धेत या संघाने द्वितीय क्रमांक मिळवला.

## आनंद फाऊंडेशनचा आदर्श उपक्रम

कोगनोळी,ता.११(प्रतिनिधी)–

कोगनोळीसह हणबरवाडी, दत्तवाडी भागातील १२ अंगणवाडींना खुर्ची व टेबल भेट देऊन आनंद फाऊंडेशनने खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. असे गौरवोद्‌गारमाजी जिल्हापंचायत उपाध्यक्ष पंकज पाटील यांनी काढले.

कोगनोळी येथील आनंद फाऊंडेशनतर्फे माजी मंत्री वीरकुमार पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित खुर्ची, टेबल भेट वितरणप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी फाऊंडेशनचे सर्वासर्वे सचिन खोत हे होते. प्रारंभी जगन्नाथ खोत यांनी स्वागत केले.यावेळी युवराज कोळी, के.डी.पाटील, रमेश पै, बाळासो पाटील, दिलीप पठाडे, अनिल पाटील, पृथ्वीराज खोत, आशिष कुरबेट्टी आदी मान्यवर उपस्थित होते.

# जातिवाचक शिवीगाळ व विनयभंगप्रकरणी युवकास अटक

इचलकरंजी,ता. ११ –

**जातिवाचक शिवीगाळ आणि मारहाण करत विनयभंग केल्याप्रकरणी येथील गावभाग पोलीस ऋषिकेश सुभाष कोटला याला बुधवारी अटक केली. त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.**

येथील रोशनी राकेश नागदेव (वय ३५, रा. जुना चंदुर रोड, इचल.) या ब्युटी पार्लर प्रशिक्षिका आहेत. त्यांच्याकडील प्रशिक्षणार्थी विवाहीतेने नागदेव हिच्याकडे शासनमान्य प्रमाणपत्राची मागणी केल्याच्या कारणातून नागदेवने जातीवाचक अपमानास्पद वागणुक दिली तर ऋषिकेश कोटला याने प्रशिक्षणार्थी विवाहितेच्या हाताला धरुन तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करत मारहाण केली होती. या प्रकरणी १७ डिसेंबर रोजी पिडीतेने नागदेव आणि कोटला या दोघांच्या विरोधात गावभाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

या गुन्ह्यातील संशयीतांचा पोलीस शोध घेत होते. बुधवारी फरार कोटला याला पोलिसांनी अटक करुन न्यायालयात हजर केले असता न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

# विवाहितेचा होरपळून मृत्यू

## पती,सासू,दिरा विरोधात गुन्हा दाखल

सांगली, ता.११(प्रतिनिधी)–

**सांगलीतील चैत्रबन चौकानजीकच्या नर्सरीमधील शेडमध्ये होरपळून मृत्यू झालेल्या विवाहितेचा हुंडाबळी असल्याचा गुन्हा विश्रामबाग पोलिसांनी दाखल केला आहे. २३ जानेवारी रोजी रात्री पावणे आकरा वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला होता. यामध्ये निकीता शिवराज मनगुळी (वय २१) हिचा मृत्यू झाला होता.याप्रकरणी तिच्या आईने फिर्याद दिली असून पोलिसांनी निकीताचा पती, सासू आणि दिराच्या विरोधात हुंडाबळी आणि ॲट्रॉसिटीच्या कायद्यातील तरतुदीनुसार गुन्हा दाखल केला आहे.**

मयत निकीता मनगुळी हिची आई रेखा गब्बर लोंढे (रा. कागवाड, कर्नाटक) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीची दखल घेऊन पोलिसांनी संशयीत निकीताचा पती शिवराज मनगुळी, सासू बोरम्मा मनगुळी आणि दिर मल्लिकार्जुन मनगुळी ( सर्व रा. काळगी, ता. मुद्देबिहाळ, जि.विजापूर,कर्नाटक) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. निकीता आणि शिवराज यांचा विवाह झाल्यानंतर निकीताला नेहमी तुच्छतेची वागणुक दिली जात होती.त्यानंतर हे पती-पत्नी सांगलीत एका नर्सरीमध्ये राहू लागले. त्यावेळीही पती शिवराज याने तुला मुलबाळ होत नाही, तू अनुसुचित जाती जमातीची असल्याने लोक घरी घेत नाहीत. त्याचबरोबर तू माहेरहून पाच लाख रुपये आणत नाहीस, म्हणून निकिताचा छळ करत होता. त्याला आईची आणि भावाची फूस होती. त्यामुळेच दि.२३ जानेवारी रोजी रात्री निकीता हिचा संशयास्पद मृत्यू घडवून आणून पती शिवराज मनगुळी हा पळून गेला आहे. अशा आशयाची फिर्याद रेखा लोंढे यांनी पोलिसांत दिली आहे.

# गंभीर गुन्ह्यांच्या तपासात तांत्रिक साधनांचा प्रभावी वापर करा

## अपर पोलिस महासंचालक निखिल गुप्ता

कोल्हापूर, ता. ११ (प्रतिनिधी)–

**वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर गंभीर गुन्ह्यांची शास्त्रशुद्ध आणि जलद उकल होणे अत्यावश्यक ठरत आहे. आरोपींना न्यायालयीन शिक्षेपर्यंत पोहोचवण्यासाठी तपास प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे ही काळाची गरज असल्याचे सांगत फॉरेन्सिक व्हॅनचा जास्तीत जास्त उपयोग करावा तसेच गुन्हा नोंदवितानाच 'ई-साक्ष' प्रणालीचा अनिवार्य अवलंब करावा, अशा सूचना कायदा व सुव्यवस्था विभागाचे अपर पोलिस महासंचालक निखिल गुप्ता यांनी परिक्षेत्रातील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना दिल्या.**

बुधवारी (दि. ११) विशेष पोलिस महानिरीक्षक कार्यालयात कोल्हापूर परिक्षेत्रातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. या निमित्ताने गुप्ता कोल्हापूर दौऱ्यावर होते. कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर ग्रामीण आणि पुणे ग्रामीण येथील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसोबत त्यांनी सविस्तर चर्चा केली.

या बैठकीस विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी, सातारा पोलिस अधीक्षक तुषार दोषी आणि कोल्हापूरचे अपर पोलिस अधीक्षक डॉ. धीरजकुमार बच्चू प्रत्यक्ष उपस्थित होते. सांगली, सोलापूर ग्रामीण आणि पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सहभागी झाले.

**करवीर पोलिस ठाण्याला भेट**

दौऱ्यादरम्यान अपर पोलिस महासंचालक गुप्ता यांनी करवीर पोलिस ठाण्यास भेट देऊन तेथील दैनंदिन कामकाज, गुन्ह्यांच्या तपासाची प्रगती, नागरिकांसाठी उपलब्ध सुविधा, कार्यालयीन शिस्त व स्वच्छतेची पाहणी केली. संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देत कामकाज अधिक कार्यक्षम करण्यावर भर देण्यात आला.

# पाच हजार रुपयाची लाच मागताना महिला हवालदार लाचलुचपतच्या जाळ्यात

सातारा, ता,११(प्रतिनिधी)–

**जप्त केलेले वाहन सोडवून देण्यासाठी पाच हजार रुपयाच्या लाचेची मागणी करणारी म्हसवडची महिला हवालदार लाचलुचपतच्या जाळ्यात अलगत अडकली. निता पळे असे महिला पोलीस हवालदाराचे नाव असून त्यांच्यावर म्हसवड पोलीस ठाणेत भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम १९८८ चे कलम ७ नुसार गुन्हा दाखल करणेत आला आहे.**

एका तक्रारदार यांचेविरुद्ध म्हसवड पोलीस ठाणेत गुन्हा दाखल करण्यात आला होता. दाखल गुन्ह्यामध्ये तक्रारदार यांची जप्त करण्यात आलेली मारुती सुझुकी कंपनीची ओमणी कार (क्रमांक एम.एच ४५ एन ६७२९) हे वाहन सोडवून देणेस मदत करते म्हणून गुन्ह्याचे तपासी अधिकारी पोलीस हवालदार निता पळे या पाच हजाराची लाच मागणी करीत असल्याची तक्रार सातारा लाच लुचपत प्रतिबंध कार्यालयास प्राप्त झाली. या बाबत पडताळणी केल्यानंतर

केलेल्या सापळा कारवाईत महिला पोलीस हवालदार निता पळे तक्रारदार यांचे जप्त वाहन सोडवून देणेकरीता मदत करते असे सांगून पंचासमक्ष पाच हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झालेने त्यांचेविरूद्ध म्हसवड पोलीस ठाणेत भ्रष्टाचार प्रतिबंधक कलम ७ नुसार गुन्हा दाखल करणेत आला आहे.

# पोलिस दलातील ८८ रिक्त पदांसाठी भरती प्रक्रियेला शुक्रवारपासून प्रारंभ

कोल्हापूर ता.११ (प्रतिनिधी)–

कोल्हापूर जिल्हा पोलिस दलातील ८८ रिक्त पदांसाठीची शारीरिक पात्रता चाचणी शुक्रवार (दि. १३) पासून सुरू होत असून २१ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. या भरतीसाठी ६ हजार ८५३ उमेदवार मैदानात उतरणार आहेत. पोलिस परेड ग्राउंड तसेच राजाराम कारखाना चौक ते शिये पूल या परिसरात विविध टप्प्यांतील चाचण्या घेण्यात येतील. संपूर्ण प्रक्रियेसाठी सुमारे ३०० पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याची माहिती पोलिस अधीक्षक योगेश कुमार यांनी दिली.

राज्यभर सुमारे १५ हजार पदांची भरती सुरू असताना, त्याअंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील रिक्त जागांसाठी उमेदवारांची शारीरिक क्षमता तपासली जाणार आहे. १३ ते २१ फेब्रुवारीदरम्यान चाचण्या होणार असल्या तरी रविवार (दि. १५) आणि गुरुवार (दि. १९) शिवजयंतीमुळे प्रक्रिया स्थगित राहील. उर्वरित सात दिवसांत सर्व टप्पे पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# नोकरी शोधणारे नव्हे,रोजगारनिर्माते बना- सुरेश उमाप

## डी. वाय. पाटील अभियांत्रिकीमध्ये उद्योजकता जनजागृती कार्यक्रम

कोल्हापूर ता.११ (प्रतिनिधी)–



**आजच्या बदलत्या उद्योगविश्वात युवकांनी नोकरी शोधणारे न होता, रोजगारनिर्माते बनण्याची मानसिकता जोपासली पाहिजे. नवोपक्रम, जोखीम स्वीकारण्याची तयारी आणि स्वत:च्या कौशल्यांवर विश्वास ही यशस्वी स्टार्टअपची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन शिवमुद्रा इनोव्हेटिव्ह फाउंडेशनचे संस्थापक व अध्यक्ष तसेच एमसीईडीचे माजी प्रादेशिक अधिकारी सुरेश बी. उमाप यांनी केले. डी. वाय. पाटील आभियात्रिकी (स्वायत्त महाविद्यालय) येथे यांत्रिक विभागामार्फत आयोजित उद्योजकता जनजागृती कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.**

भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली तसेच विद्युत मापन उपकरण डिजाइन संस्थान (आयडीईएमआय) मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आय- कनेक्ट (उद्योगसंस्था संवाद मालिका) अंतर्गत उद्योजकता जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यांत्रिक अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. एस. जे. रायकर म्हणाले, स्पर्धात्मक युगात केवळ पदवी मिळविण्यावर समाधान न मानता उद्योजकतेकडे वळण्याची गरज आहे. उद्योग,शैक्षणिक संवाद विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अतिशय महत्त्वाचे आहेत. या माध्यमातून चांगले उद्योजक घडवण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे.

संस्थेच्या इनोव्हेशन कौन्सिल व सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय (एमएसएमई) यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम राबविण्यात आला. प्रा. विराज पासरे, प्रा. उत्कर्ष पाटील व प्रा. योगेश चौगुले यांनी नियोजन व समन्वयन केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील व पृथ्वीराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता, प्राचार्य डॉ. संतोष चेडे, रजिस्ट्रार डॉ. लितेश मालदे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

# सन्मती विद्यालयाच्या ८ विद्यार्थ्यांना संस्कृत शिष्यवृत्ती

तारदाळ,ता.११( प्रतिनिधी) –

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये असलेली बुद्धिमत्ता आणि त्यांना मिळणारे योग्य मार्गदर्शन यांचा त्रिवेणी संगम सन्मती विद्यालय, तारदाळ येथे पाहायला मिळत आहे. राष्ट्रीय संस्कृत संस्थान, नवी दिल्ली यांच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत विद्यालयाच्या ८ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत प्रत्येकी ५,००० रुपये शिष्यवृत्ती पटकावली आहे. या यशामुळे परिसरात विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची चर्चा असून, आगामी शैक्षणिक वर्षासाठी पालकांचा ओढा वाढताना दिसत आहे.**



शिष्यवृत्ती मिळवणाऱ्यांमध्ये इयत्ता ९ वी मधील नंदिनी कोळी, वैभव बडवे, हर्षदा खांडेकर, समिक्षा पाटील आणि १० वी मधील वेदिका मोरे, वेदिका नर्मदे, निदा शेख, मयुरी थोडसरे यांचा समावेश आहे. संस्कृत सारख्या प्राचीन आणि शास्त्रीय विषयावर प्रभुत्व मिळवून या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर शाळेचा नावलौकिक वाढवला आहे.

आमच्या शाळेत विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विशेष उपक्रम राबवले जातात. संस्कृत शिष्यवृत्तीचे हे यश म्हणजे शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मेहनतीचे फळ आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.

असे मुख्याध्यापक सी. जी. तेरदाळे म्हणाले.या यशाबद्दल सन्मति विद्यालयचे चेअरमन सुनील पाटील, पर्यवेक्षक पी. बी. शेट्टी, विभाग प्रमुख सूरज आ. पाटील व सर्व पदाधिकारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. या यशामुळे दर्जेदार शिक्षण म्हणजे सन्मती विद्यालय हे समीकरण पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून, पालकांनी आपल्या पाल्यांच्या उज्वल भविष्यासाठी विद्यालयाशी संपर्क साधण्यास सुरुवात केली आहे.

# एअर व्हॉल्वमध्ये कचरा अडकल्याने गळती; हजारो लिटर पाणी वाया, पिकांचे नुकसान

हळदी ता.११(प्रतिनिधी) –

**कोल्हापूर शहराला थेट पिण्याचा पाणीपुरवठा करणाऱ्या कोल्हापूर काळम्मावाडी थेट पाईपलाईन योजनेतील कुडू (ता. करवीर) येथील एअर व्हॉल्वमध्ये कचरा अडकल्याने गळती लागून हजारो लिटर पाणी वाया गेले. या घटनेमुळे शेतातील उभ्या पिकांचे नुकसान झाल्याची बाब बुधवारी सायंकाळी समोर आली.**

बेलेच्या खडीखाली असलेल्या एअर व्हॉल्वमध्ये कचरा साचल्याने पाण्याचा दाब वाढला आणि त्यातून गळती सुरू झाली. संबंधित शेतकऱ्यांच्या लक्षात ही बाब आल्यानंतर त्यांनी तात्काळ संबंधित विभागाशी संपर्क साधला. माहिती मिळताच विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.

कर्मचाऱ्यांनी एअर व्हॉल्वमधील कचरा काढून दुरुस्तीची कामे केली. त्यानंतर पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात आला. मात्र, तोपर्यंत मोठ्या प्रमाणात पाणी वाया गेले होते. तसेच शेतात पाणी साचल्याने उभ्या पिकांना फटका बसला असून शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित विभागाने पाईपलाईनची नियमित तपासणी व देखभाल करावी, जेणेकरून अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडणार नाहीत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## मारुती पाटील यांचे निधन



कोगनोळी ,ता.११(प्रतिनिधी)

हंचिनाळ के.एस (ता. निपाणी) येथील रहिवाशी मारुती आप्पा पाटील-सटवान (वय ८५) यांचे मंगळवार दि. १० रोजी निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

## दिलीपशास्त्री उपाध्ये यांचे निधन

नृसिंहवाडी,ता.११(प्रतिनिधी)–



येथील वेदमूर्ती दिलीपशास्त्री उपाध्ये (वय ७०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. दत्त मंदिरातील विविध उत्सव, धार्मिक कार्यक्रमांत त्यांनी अनेक वर्षे पुराणसेवा केली. त्यांच्या निधनाने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे.


महावितरण – महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई-निविदा

म. रा. वि. वि. कं. मर्या., गडहिंग्लज विभागीय कार्यालय अंतर्गत खालील ई-निविदा मान्यता प्राप्त, अनुभवी व निविदा अर्जात नमुद केलेल्या अहर्ता पुर्ण करत असलेल्या ठेकेदारां करिता विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| अ. नं. | ई-निविदा नंबर | तपशील | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | EE/GDL/BM-DTC / T-17 / 25-26 | सन २०२६-२७ (एक वर्षाकरिता) देखभाल व दुरुस्ती करणे साठी अनुभवि विद्युत ठेकेदारांची नामिकाप्रविष्ठ (Empanelment) करणे | - |
| २ | EE/GDL/BM-HT / T - 18 / 25-26 | | |
| ३ | EE/GDL/BM-LT /T-19 / 25-26 | | |
| ४ | EE/GDL / NSC /T- 20/25-26 | सन २०२६-२७ (एक वर्षाकरिता) नवीन वीज जोडणी / डीपीडीसी / १००% डीडीएफ / इतर मधील नवीन संच मांडणी तयार करणेसाठी अनुभवि विद्युत ठेकेदारांची नामिकाप्रविष्ठ (Empanelment) करणेसाठी | - |
| ५ | EE/GDL/BM-DTC /T- 21 / 25-26 | आजरा उपविभागमधील शेतीपंप वाहिनेचे **Rejumpring** चे काम करणेसाठी | १० लाख |

वरील ई - निविदा महावितरणच्या **https://etender.mahadiscom.in/eatApp/** संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आली आहे व विक्रीसाठी २४.०२.२०२६ पर्यंत उपलब्ध राहील. कार्यालयीन संपर्क क्रं. ७८७५७६९२५४

**पी. आर. ओ. - २७२ / २०२५-२६** **कार्यकारी अभियंता, गडहिंग्लज**



## ग्रामपंचायत सालपेवाडी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर

### जाहीर निविदा

मौजे सालपेवाडी, ता. भुदरगड कडील १५ वा वित्त आयोग अंतर्गत नमुद केलेल्या खालील कामांची नोंदणीकृत मक्तेदार व अनुभवी ठेकेदार यांचेकडून निविदा मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मौजे सालपेवाडी येथे प्राथमिक शाळा देखभाल दुरूस्ती करणे. | १,०७,६२१/- | १,०७६/- |

*** निविदा फॉर्म फी २०० रु. व कामाची मुदत ६ महिने राहिल.**

अटी व शर्ती - १) निविदा स्विकारणेचा दिनांक १२/०२/२०२६ ते १८/०२/२०२६ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळून सायं. ५.०० वा. पर्यंत. ग्रा.पं. कार्यालयात स्विकारल्या जातील. २) इतर नियम, अटी, शर्ती ग्रा.पं. कार्यालयात पहावयास मिळतील. ३) निविदा मंजूर वा ना मंजूर करणेचा अधिकार सरपंच ग्रा.पं. सालपेवाडी यांनी राखून ठेवलेला आहे.

**सही/-** **सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत सालपेवाडी,ता. भुदरगड, जि. कोल्हापूर.**



# अभिषेक आणि वरुणचे आयसीसी रँकिंगमध्ये वर्चस्व कायम

दुबई,ता.११–

**आयसीसी टी–२० रँकिंगमध्ये, अभिषेक शर्मा फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानावर आहे. गोलंदाजांमध्ये वरुण चक्रवर्तीने आपले पहिले स्थान कायम ठेवले आहे. झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझा टी–२० फॉरमॅटमध्ये नंबर वन अष्टपैलू क्रिकेटपटू बनला आहे.**

फलंदाजीच्या क्रमवारीत, भारताचा अभिषेक शर्मा अव्वल स्थानावर आहे, इंग्लंडचा फिल साल्ट दुसऱ्या स्थानावर आहे. पाकिस्तानचा साहिबजादा फरहान तिसऱ्या स्थानावर आहे, इंग्लंडचा जोस बटलर चौथ्या स्थानावर आहे आणि भारताचा तिलक वर्मा पाचव्या स्थानावर आहे. श्रीलंकेचा पथुम निस्सांका सहाव्या स्थानावर आहे. भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव सातव्या स्थानावर आहे. न्यूझीलंडचा टिम सेफर्ट आठव्या स्थानावर आहे, ऑस्ट्रेलियाचा ट्रॅव्हिस हेड नवव्या स्थानावर आहे आणि ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिशेल मार्श दहाव्या स्थानावर आहे. अमेरिकेविरुद्धच्या ७३ धावांच्या खेळीमुळे साहिबजादा फरहानला मोठा फायदा झाला आहे. या खेळीमुळे फरहानला चार स्थानांनी झेप घेऊन तिसऱ्या स्थानावर पोहोचण्यास मदत झाली आहे.





गोलंदाजांच्या क्रमवारीत भारताचा वरुण चक्रवर्ती पहिल्या क्रमांकावर, पाकिस्तानचा अब्रार अहमद दुसऱ्या क्रमांकावर, अफगाणिस्तानचा रशीद खान तिसऱ्या क्रमांकावर, इंग्लंडचा आदिल रशीद चौथ्या क्रमांकावर, श्रीलंकेचा वनिंदू हसरंगा पाचव्या क्रमांकावर, न्यूझीलंडचा जेकब डफी सहाव्या क्रमांकावर, पाकिस्तानचा मोहम्मद नवाज सातव्या क्रमांकावर, बांगलादेशचा मुस्तफिजूर रहमान आठव्या क्रमांकावर, ऑस्ट्रेलियाचा ॲडम झम्पा नवव्या क्रमांकावर आणि अफगाणिस्तानचा मुजीब उर रहमान दहाव्या क्रमांकावर आहे.

झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझा याने टॉप टी–२० अष्टपैलू क्रिकेटपटूंच्या यादीत पाकिस्तानच्या सैम अयुबला मागे टाकले आहे. अयुब दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारताचा हार्दिक पंड्या तिसऱ्या क्रमांकावर, वेस्ट इंडिजचा रोस्टन चेस चौथ्या क्रमांकावर, पाकिस्तानचा मोहम्मद नवाज पाचव्या क्रमांकावर, नेपाळचा दीपेंद्र सिंग अरे सहाव्या क्रमांकावर, वेस्ट इंडिजचा रोमारियो शेफर्ड सातव्या क्रमांकावर, अफगाणिस्तानचा अझमतुल्लाह उमरझाई आठव्या क्रमांकावर, अफगाणिस्तानचा मोहम्मद नबी नवव्या क्रमांकावर आणि श्रीलंकेचा वनिंदू हसरंगा दहाव्या क्रमांकावर आहे.

# भारताला नामिबियाचे आव्हान

नवी दिल्ली,ता.११–

**टी–२० विश्वचषकात भारत आणि नामिबियाचे क्रिकेट संघ आमने सामने येणार आहेत. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील संघ अरुण जेटली स्टेडियमवर सलग दुसऱ्या विजयाच्या उद्देशानेच मैदानात उतरणार आहे. गतविजेत्या भारताने त्यांच्या पहिल्या सामन्यात अमेरिकेचा २९ धावांनी पराभव करत स्पर्धेची सुरुवात विजयाने केली होती . अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या पहिल्या सामन्यात नामिबियाला नेदरलँड्सविरुद्ध पराभव सहन करावा लागला होता.**




भारताने टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यात नामिबियाचा सामना केवळ एकदाच केला आहे. ८ नोव्हेंबर २०२१ रोजी दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात भारताने ९ विकेट्सने विजय मिळवला. भारतीय मधल्या फळीतील फलंदाज तिलक वर्माने नामिबियाविरुद्धच्या सामन्याच्या एक दिवस आधी पत्रकार परिषदेत सांगितले की, जसप्रीत बुमराह नामिबियाविरुद्धच्या सामन्यासाठी निवडीसाठी उपलब्ध आहे. अभिषेकला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे आणि त्याची प्रकृती चांगली आहे, असेही त्याने सांगितले. अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदर देखील दिल्लीतील भारतीय टी–२० विश्वचषक २०२६ संघात सामील झाला आहे आणि त्याने मंगळवार आणि बुधवारी संघासोबत सराव केला.

तिलक वर्माने अभिषेक शर्माबद्दल एक महत्त्वपूर्ण विधान केले, तो म्हणाला की, आम्ही दिल्लीत उतरताच अभिषेकला रुग्णालयात जावे लागले. त्यानंतर त्याची तपासणी करण्यात आली. पण आता त्याला डिस्चार्ज देण्यात आला आहे. आता काळजी करण्याची गरज नाही. अभिषेक शर्मा जसप्रीत बुमराहबद्दल तो म्हणाला, बुमराह उद्याच्या सामन्यासाठी उपलब्ध आहे. पण अंतिम निर्णय घेण्यासाठी आपल्याकडे आणखी एक दिवस आहे. अभिषेकने टी विश्वचषक गट अ सामन्यात अमेरिकेविरुद्ध डावाची सुरुवात केली होती. पण तो अपयशी ठरला आणि त्याचे खातेही न उघडता बाद झाला. त्यानंतर लगेचच त्याने पोटदुखीची तक्रार केली, ज्यामुळे तो क्षेत्ररक्षण करू शकला नाही.

आजारपणामुळे अमेरिकेविरुद्धच्या सामन्यात खेळू न शकलेला जसप्रीत बुमराह या सामन्यात पुनरागमन करू शकतो. त्याच्या जागी मोहम्मद सिराजला प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान देण्यात आले होते. पण जर बुमराह नामिबियाविरुद्ध परतला तर सिराजला बाहेर बसावे लागू शकते. अभिषेक शर्मा बाहेर पडल्यास यष्टीरक्षक म्हणून इशान किशनच्या जागी यष्टीरक्षक म्हणून निवडण्यात आलेल्या संजू सॅमसनला संधी मिळू शकते. १५ फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्ये पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यापूर्वी टीम इंडियासाठी नामिबियाविरुद्धचा सामना महत्त्वाचा ठरणार आहे.अभिषेक शर्मा बरा झाला आहे, पण इशान किशनला दुखापत झाली आहे. भारतीय संघाने सराव सत्रात भाग घेतला होता. पण बुमराहच्या चेंडूवर फलंदाजी करताना त्याला दुखापत झाली. इशान किशनला दुखापत होताच, फिजिओ ताबडतोब मैदानात आले. तिथे काही वेळ घालवल्यानंतर, त्याने आणखी पाच मिनिटे फलंदाजी केली.

# इयान बेल यांची दिल्ली कॅपिटल्सच्या सहाय्यक प्रशिक्षकपदी नियुक्ती

नवी दिल्ली, ता.११–

**२०२६ च्या इंडियन प्रीमियर लीगपूर्वी दिल्ली कॅपिटल्सने त्यांच्या सपोर्ट स्टाफला आणखी मजबूती दिली आहे. त्यांनी इंग्लंडचे माजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू इयान बेल यांची नवीन सहाय्यक प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. फ्रँचायझीने त्यांच्या अधिकृत इंटरनेट मीडिया चॅनेलवर नियुक्तीची घोषणा केली.**



बेल हा इंग्लंडच्या सर्वात सक्षम फलंदाजांपैकी एक आहे. तो यापूर्वी कधीही आयपीएलचा भाग नसला तरी, त्याच्याकडे बराच अनुभव आहे. त्याने २०२० मध्ये व्यावसायिक क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. त्याने ११८ कसोटी, १६१ एकदिवसीय आणि आठ टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये इंग्लंडचे प्रतिनिधित्व केले.

त्याने इंग्लंड लायन्स आणि अंडर–१९ संघांसोबत जवळून काम केले आहे आणि राष्ट्रीय स्तरावर अनेक क्रिकेटपटूंच्या विकासात योगदान दिले आहे. अलीकडेच, त्याने २०२४ च्या इंग्लंड दौऱ्यात श्रीलंकेच्या कसोटी संघासाठी फलंदाजी प्रशिक्षक म्हणून काम केले, ज्यामुळे त्याला आणखी आंतरराष्ट्रीय अनुभव मिळाला.

इयान बेल हा इंग्लंडच्या सर्वात यशस्वी क्रिकेटपटूंपैकी एक मानला जातो. त्याच्या क्रिकेट कारकिर्दीबद्दल बोलायचे झाले तर, त्याच्याकडे ७७२७ कसोटी धावा, ५४१६ एकदिवसीय धावा आणि १८८ टी–२० आंतरराष्ट्रीय धावा आहेत. त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ५७ शतके, लिस्ट ए मध्ये १३ शतके आणि टी–२० क्रिकेटमध्ये एक शतक झळकावले आहे.

# द. आफ्रिकेचा दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये विजय

## रोमांचक मुकाबल्यात अफगाणिस्तानवर मात

अहमदाबाद, ता.११–

**टी–२० विश्वचषकात दक्षिण आफ्रिकेने डबल सुपर ओव्हर सामन्यात अफगाणिस्तानचा पराभव केला. यामुळे अफगाणिस्तानला २०२६ च्या टी–२० विश्वचषकातून बाहेर पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. कारण हा त्यांचा साखळी सामन्यातील दुसरा पराभव होता. दक्षिण आफ्रिकेच्या १८७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अफगाणिस्तानचा संघ १९.४ षटकांत १८७ धावांवर सर्वबाद झाला. त्यानंतर, अफगाणिस्तान संघाने पहिल्या सुपर ओव्हरमध्ये १८ धावांचे लक्ष्य आफ्रिकन संघासमोर ठेवले होते.**



पण दक्षिण आफ्रिकेला केवळ १७ धावाच करता आल्या. यानंतर दोन्ही संघांमध्ये दुसरी सुपर ओव्हर खेळवण्यात आली. दक्षिण आफ्रिकेने अफगाणिस्तानसमोर विजयासाठी २४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. पण अफगाणिस्तान संघाला दोन विकेट्स गमावून १९ धावा करता आल्या आणि त्यांनी हा सामना गमावावा लागला.

रहमानउल्लाह गुरबाज आणि इब्राहिम झद्रान यांनी अफगाणिस्तानला चांगली सुरुवात दिली. त्यांनी ५१ धावांची भागीदारी केली, झद्रान १२ धावांवर बाद झाला. गुलबदिन नायब आणि सेदिकुल्लाह अटल गुरबाज शून्य धावेवर बाद झाले. ५२ धावांवर तीन विकेट पडल्यानंतर, गुरबाजला दुसऱ्या टोकावर दरवेश रसूलीची साथ मिळाली. त्यांनी मिळून धावसंख्या १२१ पर्यंत नेली. गुरबाजचा ८४ धावांचा डाव केशव महाराजने थांबवला. त्याच्या बाद झाल्यानंतर अफगाणिस्तानचा डाव मंदावला. १५ धावा करून रसूलही बाद झाला. त्यानंतर उमरझाईने २२ धावा केल्या आणि कर्णधार रशीद खानने १२ चेंडूत २० धावा जोडून संघाला लक्ष्याच्या जवळ आणले.

सुपर ओव्हरमध्ये, अझमतुल्लाह आणि गुरबाजने १७ धावा जोडल्या. अझमतुल्लाहने एनगिडीच्या षटकात दोन चौकार आणि एक षटकार मारला, ज्यामुळे अफगाणिस्तानची धावसंख्या १७ झाली. आफ्रिकेनेही एका विकेटच्या मोबदल्यात १७ धावा केल्या आणि सुपर ओव्हर बरोबरीत आणली. दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये स्टब्स आणि मिलरने २३ धावा जोडल्या. मिलरने दोन षटकार आणि स्टब्सने एक षटकार मारला. केशव महाराजने दुसऱ्या चेंडूवर नबीच्या रूपात अफगाण संघाला पहिला धक्का दिला. पण त्यानंतर गुरबाजने पुढील तीन चेंडूंवर सलग तीन षटकार मारले, ज्यामुळे अफगाणिस्तानला सहा धावांची आवश्यकता होती. गुरबाजने शेवटच्या चेंडूवर मोठा शॉट मारण्याचा प्रयत्न केला आणि महाराजने त्याला बाद केले.

**शेवटच्या षटकाचा थरार**

शेवटच्या षटकात अफगाण संघाला विजयासाठी १३ धावांची आवश्यकता होती आणि नूर अहमद आणि फजलहक फारुकी क्रीजवर होते. रबाडा आक्रमणावर आला. रबाडाने षटकातील पहिला चेंडू नो–बॉल म्हणून टाकला. पुढचा चेंडू वाईड होता आणि पुढचा चेंडू डॉट होता. रबाडाच्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर नूर अहमदने षटकार मारला. पुढचा चेंडू नो–बॉल होता, ज्यावर नूर अहमदने दोन धावा जोडल्या. त्यानंतर, अफगाण संघाला विजयासाठी तीन चेंडूत दोन धावांची आवश्यकता होती. नूर अहमदने षटकाच्या चौथ्या चेंडूवर एक धाव पूर्ण केली. पण दुसऱ्या चेंडूवर फारुकी धावबाद झाला, ज्यामुळे सामना सुपर ओव्हरमध्ये गेला.

तत्पूर्वी, रायन रिकेल्टन आणि क्विंटन डी कॉक यांनी अर्धशतके आणि शतकी भागीदारी केली. प्रथम फलंदाजी करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेने ६ बाद १८७ धावा केल्या. रिकेल्टनने २८ ६१ धावांची खेळी केली. क्विंटन डी कॉकने ५९ धावा केल्या. रिकेल्टन आणि डी कॉक व्यतिरिक्त, डेवाल्ड ब्रुईसने २३, डेव्हिड मिलरने नाबाद २० आणि मार्को जॅनसेनने १६ धावांचे योगदान दिले.




# झंपा-एलिस जोडगोळीसमोर आयर्लंड निष्प्रभ; ऑस्ट्रेलियाची दणक्यात सलामी

कोलंबो,ता.११–

**वर्ल्डकप जेतेपदांशी सख्य असणाऱ्या ऑस्ट्रेलियाने सलामीच्या लढतीतच आयर्लंडवर ६७ धावांनी दणदणीत विजय मिळवला. कोलंबोतल्या आर.प्रेमदासा स्टेडियमवर झालेल्या लढतीत ऑस्ट्रेलियाने आयर्लंडचा धुव्वा उडवला.**

ऑस्ट्रेलियाने अडखळत १८२ धावांची मजल मारली. मात्र, त्यानंतर ॲडम झंपा आणि नॅथन एलिस या जोडगोळीसमोर आयर्लंडच्या फलंदाजांनी सपशेल शरणागती पत्करली. त्यांना ११५ धावाच करता आल्या.

ऑस्ट्रेलियाने टॉस जिंकून बॅटिंगचा निर्णय घेतला. मात्र, प्रेमदासाच्या संथ आणि धीम्या खेळपट्टीवर ऑस्ट्रेलियाची घसरगुंडी उडाली. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्श दुखापतीमुळे या सामन्यात खेळू शकणार नसल्याचे स्पष्ट झाले. मार्शच्या अनुपस्थितीत ट्रॅव्हिस हेडकडे कर्णधारपद सोपवण्यात आले.

कर्णधार म्हणून खेळणारा हेड दुसऱ्याच षटकात बाद झाला. यानंतर कॅमेरुन ग्रीन आणि जोश इंगलिस यांनी तिसऱ्या विकेटसाठी ४९ धावांची भागीदारी केली. ग्रीन धोकादायक ठरणार असे वाटत असतानाच मार्क अडेअरने त्याला बाद केले. त्याने २१ धावा केल्या. थोड्या वेळात जोश इंगलिसही माघारी परतला. त्याने १७ चेंडूत ६ चौकार आणि एका षटकारासह ३७ धावांची खेळी केली. अनुभवी ग्लेन मॅक्सवेल ९ धावा करून तंबूत परतला. यानंतर मॅट रेनशॉ आणि मार्कस स्टॉइनस यांनी ४४ चेंडूत ६१ धावांची भागीदारी केली. हम्प्रेयसने रेनशॉला बाद केले.त्याने ३३ चेंडूत ३७ धावांची खेळी केली. ४५ धावांवर स्टॉइनस बाद झाला. या भागीदारीच्या बळावर ऑस्ट्रेलियाने दीडशेचा टप्पा ओलांडला. कूपर कोनोली आणि झेव्हियर बार्टलेट यांनी प्रत्येकी ११ धावा केल्या. आयर्लंडतर्फे मार्क अडेअरने २ विकेट्स पटकावल्या.

आयर्लंडचा कर्णधार पॉल स्टर्लिंग रिटायर्ड हर्ट होऊन तंबूत परतला. मार्क कुन्हेमनने हॅरी टेक्टरला भोपळाही फोडू दिला नाही. नॅथन एलिसने मार्क अडेअरला त्रिफळाचीत केले. एलिसनेच कुर्टीस कॅम्परला बाद करत आयर्लंडला अडचणीत आणले. एलिसने चांगला फॉर्म कायम राखत बेन कॅलिट्सझला माघारी धाडले. आयर्लंडने नियमित अंतरात विकेट्स गमावल्या. जॉर्ज डॉकरेलने ४१ धावांची एकाकी झुंज दिली. ऑस्ट्रेलियातर्फे ॲडम झंपा आणि नॅथन एलिसने या दोघांनी प्रत्येकी ४ विकेट्स पटकावत आयर्लंडच्या डावाला खिंडार पाडले.

# स्थायी समितीबरोबर विविध विषय समित्यांकडे लक्ष

## इच्छुकांकडून फिल्डींग ; निवडीबाबत उत्सुकता

इचलकरंजी,ता.११ –

**इचलकरंजी महानगरपालिकेच्या पहिल्या महापौर व उपमहापौरपदाची निवडी नुकत्याच पार पडल्या. आता स्थायी समितीसह विविध विषय समिती सभापती निवडींकडे नगरसेवकांसह शहरवासियांचे लक्ष लागून राहिले आहे. महापौरबरोबर स्थायी समिती सभापतीपद महत्त्वाचे मानले जात असल्याने सदर पदासाठी इच्छुक मंडळींनी आतापासूनच फिल्डींग लावली आहे.**

इचलकरंजी महानगरपालिकेच्या पहिल्याच निवडणुकीत महायुतीने स्पष्ट बहुमत मिळून सत्ता काबीज केली. तर भाजपाने सर्वाधिक ४३ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्यामुळे महापौर व उपमहापौर हे दोन्ही पदे भाजपाकडेच राहणार असल्याचे स्पष्ट झाले. पहिल्या महापौरपदी उदय धातुंडे तर उपमहापौरपदी अनिल डाळ्या यांची बिनविरोध निवड झाली. त्यामुळे स्थायी समिती सभापती पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. स्थायी समिती सभापतीपदासाठी अनेक नगरसेवक–नगरसेविका इच्छुक असून आपापल्या पध्दतीने फिल्डींग लावण्यास सुरूवात केली आहे.




स्थायी समिती सभापतीपदासह महिला व बालकल्याण समिती, परिवहन समितीबरोबर आरोग्य व पाणी पुरवठा या समिती स्थापन करून सदर समितींच्या सभापतीपदासाठीही इच्छुकांची संख्या मोठी आहे.

नगरसचिव विभागाकडून विषय समिती निवडीबाबतचा प्रस्ताव महापौर उदय धातुंडे यांच्याकडे सादर केला जाणार आहे. त्यानंतर महासभा आयोजित केली जाणार आहे. २३ फेब्रुवारीला पहिली महासभा होण्याची शक्यता महानगरपालिकेच्या वर्तुळातून व्यक्त केली जात आहे.

निवडणुकीवेळी ज्या इच्छुकांना नगरसेवकपदासाठी उमेदवारी मिळाली नाही अशा मंडळींना स्विकृत नगरसेवक करण्याचे आश्वासन दिले आहे. जास्तीत जास्त इच्छुकांना स्विकृत नगरसेवकपद मिळावे यासाठी स्थानिक पातळीवर सहा महिन्यांसाठी स्विकृत नगरसेवक पद करणेत आले होते. मात्र, पक्षाच्या धोरणानुसार स्विकृत नगरसेवकाचा कालावधी एक वर्षासाठी करणेत येणार आहे. संख्याबळानुसार भाजपाला चार तर शिव–शाहू विकास आघाडीला दोन जागा मिळणार आहेत.

**स्थायी समिती सभापतीपद कोणाला?**

इचलकरंजीच्या पहिल्या महापौर पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याची उत्सुकता ताणली होती. त्यामध्ये नेतेमंडळींनी पहिल्यांदाच निवडून आलेले उदय धातुंडे यांना मंहापौरपदी तर उपमहापौरपदी अनिल डाळ्या यांना संधी दिली. महापौर प्रमाणे स्थायी समिती सभापतीसह महत्त्वाचे मानले जाते. यापदावर महापौर, उपमहापौर प्रमाणे नवख्या मंडळींना संधी देणार की अनुभवी मंडळींची निवड करणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.



# मुरगूडच्या शर्यतीत बुलेट छब्या व सायलेंट वश्या बैलजोडी प्रथम

मुरगूड ता.११(प्रतिनिधी)–

**येथील अंबाबाई यात्रेनिमित्त आयोजित दुबैलगाडी शर्यतीत कोल्हापूरच्या युवराज शिंदे व हरिपूरचे महेश बोंद्रे सरकार यांच्या बुलेट छब्या व सायलेंट वशा या बैलजोडीने प्रथम क्रंमाक पटकावत ५१ हजारचे बक्षिस मिळविले.**

द्वितीय क्रमांक कोथळीच्या अमोल करे यांच्या सरपंच व रुप्या या बैलजोडीने मिळविला . तर तिसरा क्रमांक शरद माने यांच्या करंजे गज्या व प्रकाश पाटील यांच्या दानवाड काळ या बैलजोडीने मिळविला.

स्पर्धा शुभारंभ नगराध्यक्षा सौ. सुहासिनी पाटील यांच्याहस्ते व उपनगराध्यक्षा रेखाताई मांगले. माजी नगराध्यक्ष नामदेव मेंडके , दिग्वीजय पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.पंच म्हणून पांडुरंग पुजारी सुखदेव पाटील अनिल शिंदे व समाधान बोते यांनी काम पाहिले . बक्षिस वितरण नगरसेवक सत्यजित पाटील यांच्या हस्ते व नगरसेवक राजेंद्र आमते बजरंग सोनुले यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.पांडुरंग पुजारी यांनी स्वागत केले . राजू चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले तर पृथ्वीराज कदम यांनी आभार मानले .स्पर्धेचे संयोजन स्पर्धा समितीने केले.